सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

दर्बी क्लॉथ मार्केट
सुटींग । शर्टींग । लिनन । सिल्क
१०६, गोल्डफिंच पेठ, (नवी पेठ) सोलापूर.
9130008644 | 9422459645

सोलापूर | मंगळवार, १४ ऑक्टोबर २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक ३३५ | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# महापालिका व जिल्हा परिषदेतील अनेक दिग्गजांना फटका

- महापालिकेची प्रभागरचना तर जि.प.गट, गणाचे आरक्षण जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर-**

गेल्या तीन वर्षांपासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा बिगुल वाजण्यास सुरुवात झाली असून सोमवारी सोलापूर महापालिकेची प्रभागरचना जाहीर झाली तर जिल्हा परिषदेच्या गट व गणांचे आरक्षण घोषित झाल्याने शहर जिल्ह्यातील राजकीय वातावरण तापायला सुरुवात झाली आहे. जुन्या दिग्गजांसह नव्या चेहऱ्यांच्या हालचाली वाढल्याचे चित्र सध्या दिसत आहे. महायुती आणि महाआघाडीचे आगामी निवडणुकांसाठी काय निर्णय असतील याकडे आता कार्यकर्ते आणि इच्छुकांचे लक्ष लागले आहे. अनेक दिग्गज माजी नगरसेवकांना नव्या प्रभागरचनेचा आणि माजी जिल्हा परिषद सदस्यांना आरक्षणाचा फटका बसला आहे. महापालिकेची प्रभागरचना चार नगरसेवक पध्दतीचीच असणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

प्रभागांची एकूण संख्या-२६ असून चार सदस्यीय प्रभाग २४ तर तीन सदस्यीय प्रभाग २ (प्रभाग क्र.२५ व २६) आहेत. सोलापूर महानगरपालिका क्षेत्राची २०११ च्या जनगणनेनुसार एकूण




लोकसंख्या -९ लाख ५१ हजार ५५८ आहे.

यामध्ये अनूसुचित जातीची लोकसंख्या-१ लाख ३८ हजार ७८, अनुसूचित जमातीची लोकसंख्या-१७ हजार ९८२ आहे. यासाठी चार सदस्यीय प्रभाग सरासरी ३७ हजार ३१६ लोकसंख्या तर तीन सदस्यीय प्रभागात सरासरी २७ हजार ९८७ लोकसंख्या धरण्यात आली आहे. निवडून दयावयाच्या महानगरपालिका नगरसेवकांची संख्या-१०२ आहे. मिनी मंत्रालय मानल्या जाणाऱ्या जिल्हा परिषदेमध्ये ६८ सदस्य असून पंचायत समित्यांचे १३६ गण सदस्य आहेत.

सोमवारी ६८ गट आणि १३६ गणांचे आरक्षण जाहीर झाले आहे. जिल्हा परिषदेसाठी इच्छुक असणाऱ्या अनेकांनी आरक्षण घोषणेनंतर राजकीय हालचाली सुरु केल्या आहेत. परंतु आरक्षणाचा जिथे अडथळा तिथे अनेकांचा हिरमोड झाला आहे. महिलांसाठी आरक्षित जागांवर होम मिनिस्टर्सना मैदानात उतरविण्यासाठी अनेकांनी हालचाली सुरु केल्या आहेत.

(प्रभागरचना व आरक्षणाच्या इतर बातम्या आतील पानांवर)

## विचारपुष्प



आपली अस्मिता ही आपली ओळख आहे. राजकीय पारतंत्र्य असतानाही आपली अस्मिता कधीही नष्ट झाली नाही. ही अस्मिता काय आहे, हे आपण ओळखले पाहिजे. कारण ती नष्ट झाली तर, आपण स्वतंत्र होऊनही नष्ट होऊ. जेव्हा माणूस स्वत:ची ओळख विसरतो, 'स्व'ला विसरतो तेव्हा तो नष्ट होतो. तीच गोष्ट राष्ट्राच्या बाबतीतही आहे.

**कौशल किशोर**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. सह बौद्धिक प्रमुख

# सोलापूर-मुंबई विमानसेवा उद्यापासून सुरु

## मुख्यमंत्री फडणवीसांच्या हस्ते मुंबईत शुभारंभ

- १० प्रवाशांना बोर्डिंग पास अन् पूरग्रस्तांना कीटचे वाटप
- सोलापुरात 'स्टार'कडून छोटेखानी सत्कारसोहळा!




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ ऑक्टोबर-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते दि. १५ ऑक्टोबर रोजी मुंबई विमानतळावर सोलापूर-मुंबई विमानसेवेचे उद्घाटन होणार असून, सोलापुरातील विमानतळावर स्टार या विमान कंपनी संचालकांकडून त्यांच्या सत्काराचे नियोजन करण्यात आले आहे.

बुधवारी दुपारी २ वाजता स्टार एअर कंपनीच्या विमानाने मुख्यमंत्री सोलापुरात दाखल होणार असून, दहा प्रवाशांना बोर्डिंग पास त्यांच्या हस्ते वितरित केले जाणार आहेत.

त्यानंतर पूरग्रस्तांना रेशन किट वाटप कार्यक्रमही पार पडणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली. दरम्यान, या कार्यक्रमाला केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या उपस्थितीची शक्यता व्यक्त केली जात आहे. मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर सोमवारी दुपारी दीड वाजता जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सोलापूर विमानतळावर आढावा बैठक घेतली. या बैठकीला पोलिस आयुक्त एम. राजकुमार तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. सुरक्षेच्या दृष्टीने सर्व आवश्यक तयारी करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या आहेत. विमानतळ परिसरात मंडप उभारणीचे काम सुरू असून, भाजपाचे स्थानिक आमदार आणि जिल्हाधिकारी यांनी सायंकाळी पाहणी करून तयारीचा आढावा घेतला.

सोलापुरातील कार्यक्रम आटोपल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस हे पंढरपूर तालुक्यातील श्रीपूर येथील श्री पांडुरंग सहकारी साखर कारखान्याच्या परिसरात स्व. सुधाकरपंत परिचारक यांच्या पुतळ्याचे अनावरण करणार आहेत. त्यानंतर ते मंगळवेढा परिसरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण करणार आहेत.

> भाजपाकडून विमानाचे होणार जंगी स्वागत
>
> सोलापूर–मुंबई विमानसेवेची सोलापूरकरांना लागलेली प्रतिक्षा आज संपणार आहे. स्टार विमान कंपनीद्वारे मुंबईहून येणाऱ्या पहिल्या विमानात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे येणार असून, त्यांच्या विमानाच्या स्वागतासाठी भारतीय जनता पार्टीकडून जंगी तयारी केली आहे. विमान सोलापुरात येताच आकाशात मोठ्या प्रमाणात फुगेही सोडण्यात येणार आहे. चौकाचौकात फटाके फोडून जल्लोष करण्यात येणार आहे.
>
> **– रोहिणी तडवळकर**
> शहराध्यक्षा, भाजपा, सोलापूर.

# एसटी कर्मचाऱ्यांना मिळणार बोनस

**मुंबई, १३ ऑक्टोबर**

राज्य सरकारने एसटी कर्मचाऱ्यांना बोनस जाहीर करून आनंदाची बातमी दिली आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत एसटी कर्मचारी संघटनांची बैठक झाली त्यात हा निर्णय जाहीर करण्यात आला. ऐन दिवाळीत एसटी कर्मचारी संपावर जाणार होते. ते एसटीसाठी परवडणारे नव्हते. त्या आधीच सरकारने एसटी कर्मचाऱ्यांच्या संघटनांसोबत चर्चा केली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षते खाली बैठक आयोजित करण्यात आली होती.

राज्य सरकारकडून ४८ हफ्त्यांमध्ये कर्मचाऱ्यांची दर महिन्याला ६५ कोटी रुपयांची रक्कम देण्यास मंजुरी देण्यात आली आहे. शिवाय यंदा दिवाळीनिमित्ताने ६ हजार रुपये कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान म्हणजेच बोनस देण्यात येणार आहे. असा निर्णय या बैठकीत घेण्यात आला आहे. तर, बोनस सोबतच १२ हजार ५०० रुपयांच्या उचलसंदर्भात देखील घोषणा करण्यात आली आहे. ही उचल एसटी कर्मचाऱ्यांना आता घेता येणार आहे.

## महत्त्वाचे

### चीनवरील टॅरिफने बाजार दबावाखाली



**मुंबई** : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनवर लादलेल्या नव्या टॅरिफमुळे जागतिक बाजारात चिंता वाढली आहे. याचे पडसाद देशांतर्गत बाजारातही दिसून आले. सलग काही सत्रांपासून तेजीत असणारा भारतीय शेअर बाजार या एका वृत्ताने पुन्हा विक्रीच्या दबावाखाली आला. दिवसभरातील कारभारानंतर निर्देशांकात १७४ अंकांची घसरण झाली तर, निफ्टी ५८ अंकांनी खाली आला. बहुतांश शेअर्स मंदीच्या सावटाखाली होते. टाटा मोटर्स, हिंदुस्थान युनिलिव्हर, इन्फोसिस, पॉवर ग्रीड आणि आयटीसी यांच्या शेअर्समध्ये सर्वाधिक घसरण झाली. या मंदीतही अदानी, बजाज फायनान्स, भारती एअरटेल, ॲक्सिस बँक आणि एनटीपीसी या कंपन्यांच्या शेअर्सनी बाजाराला मोठ्या घसरणीपासून सावरले. सोन्याच्या दरातील प्रचंड वाढही बाजारातील घसरणीच्या कारणांपैकी एक होते.

### किरकोळ महागाईचा आठ वर्षातील नीचांक

**नवी दिल्ली** : सप्टेंबरमध्ये किरकोळ महागाई दर आठ वर्षांच्या नीचांकी १.५४ टक्क्यांवर आला. जून २०१७ मध्येही तो याच पातळीवर होता. काही अन्नपदार्थांच्या किमतीत घट झाल्यामुळे हे घडले आहे. ऑगस्टमध्ये किरकोळ महागाई दर २.०७ टक्के होता. सरकारने १३ ऑक्टोबर रोजी अधिकृत किरकोळ महागाईचा डेटा जाहीर केला. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया चलनवाढ ४ ते २ टक्क्यांच्या आत ठेवण्याचे उद्दिष्ट ठेवते. महागाईच्या दरात सुमारे ५० टक्के वाटा देणाऱ्या अन्नपदार्थांचा महिना-दर-महिना चलनवाढीचा दर उणे ०.६४ वरून उणे २.२८ टक्क्यांपर्यंत कमी झाला. सप्टेंबरमध्ये ग्रामीण महागाई १.६९ टक्क्यांवरून १.०७ टक्क्यांपर्यंत कमी झाली, तर शहरी महागाई २.४७ टक्क्यांवरून २.०४ टक्क्यांपर्यंत कमी झाली.



### दहावी-बारावीच्या परीक्षा जाहीर

**पुणे** : विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनातील महत्त्वाचा टप्पा असलेल्या दहावी आणि बारावाची परीक्षांच्या तारखा महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाने जाहीर केल्या आहेत. मंडळाने दिलेल्या माहितीनुसार यावर्षी दहावी आणि बारावीच्या परीक्षा दोन आठवडे आधीच सुरू होणार आहेत. त्यानुसार बारावीची परीक्षा ही १० फेब्रुवारी २०२६ पासून सुरू होईल. दहावीची परीक्षा हा २० फेब्रुवारीपासून सुरू होईल. आतापर्यंत बारावीची परीक्षा ही फेब्रुवारी महिन्याच्या अखेरीस तर दहावीची परीक्षा ही मार्च महिन्याच्या सुरुवातीला सुरू होत असे. मात्र, शिक्षण मंडळाने यावर्षी या परीक्षा दोन आठवडे आधीच घेण्याचे नियोजन केले आहे. त्यानुसार बारावीची परीक्षा ही १० फेब्रुवारी रोजी सुरू होणार आहे.

# मतचोरीची चौकशी नाही

## सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली याचिका

**नवी दिल्ली, १३ ऑक्टोबर**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी भारतीय निवडणूक आयोग आणि भाजपावर मतचोरीचा आरोप करीत खळबळ उडवून दिली होती. या पृष्ठभूमीवर या प्रकरणी राहुल गांधी यांनी केलेल्या आरोपांचा तपास करण्याची मागणी करणारी जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल झाली होती. दरम्यान, या याचिकेवर सुनावणी करण्यास न्यायालयाने नकार दिला आहे.

न्या. सूर्यकांत आणि न्या. जॉयमाल्य बागची यांच्या न्यायासनाने याचिकेवर सुनावणी करण्यास नकार दिला आहे तसेच याचिकाकर्त्यांने याबाबत भारतीय निवडणूक आयोगाशी संपर्क साधण्याचा पर्याय अवलंबावा, असा सल्लाही न्यायासनाने दिला आहे. राहुल गांधी यांनी २०२४ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये बंगळुरू सेंट्रल लोकसभा मतदारसंघातील मतदारयादीत मोठ्या प्रमाणत फेरफार झाल्याचा आरोप केला होता. त्यांनी केलेल्या या आरोपांची चौकशी करण्याची मागणी करणारी याचिका एका वकिलाने दाखल केली होती. (वृत्तसंस्था)

# करूर चेंगराचेंगरी प्रकरणी सीबीआय चौकशी

**नवी दिल्ली, १३ ऑक्टोबर**

करूर येथील चेंगराचेंगरी प्रकरणाची सीबीआय चौकशी करण्यात यावी, असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी दिला. अभिनेता विजयचा पक्ष टीव्हीके आणि भाजपा नेत्या उमा आनंदन यांनी या प्रकरणाची सीबीआय चौकशी करण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर न्या. जे. के. माहेश्वरी आणि न्या. एन. व्ही. अंजारिया यांच्या न्यायासनाने निकाल दिला. मद्रास उच्च न्यायालयाने हा तपास एसआयटीकडे सोपवला होता.

सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्या. अजय रस्तोगी यांच्या अध्यक्षतेखालील तीन सदस्यीय समिती तपासाचे पर्यवेक्षण करेल, असे न्यायासनाने म्हटले आहे. त्यात पोलिस महानिरीक्षक दर्जापेक्षा कमी नसलेले दोन आयपीएस अधिकाऱ्यांचा (तामिळनाडू कॅडरचे, परंतु राज्यातील मूळ रहिवासी नाहीत) समावेश असेल. (वृत्तसंस्था)

# आयआरसीटीसी प्रकरणात लालू कुटुंबावर आरोपपत्र

## निवडणूक काळात मोठा झटका

**नवी दिल्ली, १३ ऑक्टोबर**

इंडियन रेल्वे कॅटरिंग ॲण्ड टुरिझम कार्पोरेशन अर्थात् आयरसीटीसीचे कंत्राट देताना झालेल्या कथित भ्रष्टाचाराच्या प्रकरणात राजदचे प्रमुख लालू प्रसाद यादव, बिहारच्या माजी मुख्यमंत्री राबडी देवी आणि त्यांचे पुत्र तेजस्वी यादव यांच्याविरोधात सीबीआयने सादर केलेले दोषारोपपत्र दिल्लीतील राऊस ॲव्हेन्यू विशेष न्यायालयाने स्वीकारले आहे. बिहारमधील विधानसभा निवडणुकीच्या काळात लालू यादवांना हा मोठा झटका आहे.

सीबीआयने विशेष न्यायालयाचे न्यायाधीश विशाल गोगणे यांच्याकडे आरोपपत्रात सादर केले. त्यात लालू, राबडी आणि तेजस्वी यांच्याविरोधात गुन्हेगारी कट रचणे, फसवणुकीचे आरोप नमूद आहे. सीबीआयने तपासलेला हा खटला बीएनआर रांची आणि बीएनआर पुरी या दोन आयआरसीटीसी हॉटेल्सच्या देखभाल कामाच्या कंत्राटांच्या वाटपामध्ये झालेल्या कथित भ्रष्टाचाराशी संबंधित आहे. या प्रकरणात सीबीआयने आरोप केला की, खासगी कंपनीला फायदा पोहोचविण्यासाठी कंत्राट जारी करण्यात आले. त्यात यादव कुटुंबीयांचा सहभाग होता. सीबीआयच्या आरोपपत्रानुसार २००४ ते २००९ दरम्यान लालू प्रसाद यादव यांच्या रेल्वेमंत्रीपदाच्या कार्यकाळात आयआरसीटीसी कंत्राटातील भ्रष्टाचाराचा कट रचण्यात आला. पुरी आणि रांची येथील भारतीय रेल्वेची दोन हॉटेल्स आयआरसीटीसीकडे हस्तांतरित करण्यात आली आणि त्यानंतर ही हॉटेल पाटणा येथील सुजाता हॉटेल्स प्रायव्हेट लिमिटेडला भाडेतत्त्वावर देण्यात आली. सुजाता कंपनीला कंत्राट मिळण्यासाठी अटी, शर्तीत बदल केला. आयआरसीटीसीचे महाव्यवस्थापक व्ही. के. अस्थाना, आर. के गोयल यांच्यासह सुजाता हॉटेल्सचे संचालक आणि चाणक्य हॉटेलचे मालक अजय कोचर यांनाही आरोपी केले. (वृत्तसंस्था)







राजदचे प्रमुख लालू प्रसाद यादव पाटणा येथे सोमवारी मॉर्निंगवॉक करताना. आजच त्यांना दिल्लीतील राऊस ॲव्हेन्यू न्यायालयात हजर राहायचे होते. दिल्लीत पोहोचताच त्यांना व्हीलचेयरचा आधार घ्यावा लागला.

# अर्थशास्त्राचे नोबेल तीन अर्थतज्ज्ञांना

**स्टॉकहोम, १३ ऑक्टोबर**

यावर्षीचा नोबेल पुरस्कार तीन अर्थशास्त्रज्ञांना देण्यात आला आहे. त्यात जोएल मोकिर, पीटर हॉविट (दोघेही अमेरिका) आणि फिलिप अघियन (ब्रिटन) यांचा समावेश आहे.

नोबेल समितीने म्हटले आहे की, या अर्थशास्त्रज्ञांनी नवोपक्रमामुळे आर्थिक विकास कसा होतो हे दाखवून दिले आहे. तंत्रज्ञान वेगाने बदलते आणि आपल्या सर्वांवर परिणाम करते.

नवीन उत्पादने आणि उत्पादन पद्धती सतत जुन्या उत्पादनांची जागा घेतात आणि ही प्रक्रिया कधीही संपत नाही. हा शाश्वत आर्थिक विकासाचा आधार आहे, ज्यामुळे जगभरातील लोकांचे जीवनमान, आरोग्य आणि राहणीमान सुधारते.

जोएल मोकिर यांनी सतत आर्थिक वाढ का शक्य आहे हे स्पष्ट करण्यासाठी इतिहासाकडे पाहिले. त्यांनी असा युक्तिवाद केला की, जर नवीन शोध आणि सुधारणा चालू राहायच्या असतील तर, काहीतरी कार्य करते हे जाणून घेणेच नव्हे तर, ते का कार्य करते हे देखील समजून घेणे महत्त्वाचे आहे.

फिलिप अघियन आणि पीटर हॉविट यांनी सतत आर्थिक वाढ कशी होते हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. १९९२ मध्ये त्यांनी 'क्रिएटिव्ह डिस्ट्रक्शन' नावाचे मॉडेल विकसित केले. (वृत्तसंस्था)

# देशातील एक लाख शाळांमध्ये एकच शिक्षक

## शिक्षण मंत्रालयाच्या आकडेवारीतून माहिती उघड ● आंध्रप्रदेश, उत्तरप्रदेशात परिस्थिती बिकट

**नवी दिल्ली, १३ ऑक्टोबर**

देशातील एक लाखांपेक्षा अधिक शाळांमध्ये केवळ एकच शिक्षक असून, या शाळांमध्ये ३.३ दश लक्षाहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेतात. आंध्र प्रदेशात एकच शिक्षक असलेल्या सर्वाधिक शाळा, तर दुसऱ्या क्रमांकावर उत्तर प्रदेश राज्य आहे. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने जारी केलेल्या आकडेवारीतून ही माहिती समोर आली.

शिक्षण मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात, देशात एकच शिक्षक असलेल्या १०४,१२५ शाळा होत्या आणि अशा शाळांमध्ये ३,३७६,७६९ विद्यार्थी शिक्षण घेत होते. तथापि, एक शिक्षक असलेल्या शाळांची संख्या २०२२-२३ मध्ये ११८,१९० वरून २०२३-२४ मध्ये



११०,९७१ पर्यंत कमी झाली आहे आणि याची टक्केवारी सहा टक्क्यांनी घटली. देशात आंध्रप्रदेशात एक शिक्षक असलेल्या शाळांची संख्या सर्वाधिक आहे, त्यानंतर उत्तरप्रदेश, झारखंड, महाराष्ट्र, कर्नाटक आणि लक्षद्वीप यांचा क्रमांक लागतो. याशिवाय पुद्दुचेरी, लडाख, दादरा आणि नगर हवेली, दमण आणि दीव आणि चंदीगडमध्ये एक शिक्षक असलेली शाळा नाही.

**प्रती शाळा नोंदणी संख्या घटली**

एक शिक्षक असलेल्या शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये उत्तरप्रदेश अव्वलस्थानी आहे, त्यानंतर झारखंड, पश्चिम बंगाल आणि मध्यप्रदेशचा क्रमांक लागतो. प्रति शाळा विद्यार्थ्यांच्या अत्यल्प नोंदणीत चंदीगड आणि दिल्लीचा समावेश आहेत. लडाख, मिझोराम, मेघालय आणि हिमाचल प्रदेशमध्ये, प्रति शाळा नोंदणी खूपच कमी आहे, जी अनुक्रमे ५९, ७०, ७३ आणि ८२ इतकी आहे. (वृत्तसंस्था)

**राज्य, केंद्रशासित प्रदेशातील एक शिक्षकी शाळा**

| राज्य | शाळांची संख्या | राज्य | शाळांची संख्या |
|---|---|---|---|
| आंध्रप्रदेश | १२,९१२ | मध्यप्रदेश | ७,२१७ |
| उत्तरप्रदेश | ९,५०८ | प. बंगाल | ६,४८२ |
| झारखंड | ९,१७२० | राजस्थान | ६,११७ |
| महाराष्ट्र | ८,१५२ | छत्तीसगड | ५,९७३ |
| कर्नाटक | ७,३४९ | तेलंगणा | ५,००१ |
| लक्षद्वीप | ७,२१७ | दिल्ली | ०९ |
| | | अंदमान-निकोबार | ०४ |

**एक शिक्षक शाळांमधील सर्वाधिक विद्यार्थी**

| राज्य | विद्यार्थी संख्या | राज्य | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| उत्तरप्रदेश | ६२४,३२७ | मध्य प्रदेश | २२९,०९५ |
| झारखंड | ४३६,४८० | कर्नाटक | २२३,१४२ |
| प. बंगाल | २३५,४९४ | आंध्रप्रदेश | १,९७,११३ |
| | | राजस्थान | १,७२,०७१ |

# चंद्रसेकरन् यांचा कार्यकाळ वाढवला

## २०३२ पर्यंत राहणार टाटा सन्सचे अध्यक्ष

**मुंबई, १३ ऑक्टोबर**

रतन टाटा यांच्या निधनानंतर समूहातील वादादरम्यान, टाटा सन्सचे अध्यक्ष एन. चंद्रसेकरन् यांचा कार्यकाळ २०३२ पर्यंत वाढवण्यात आला आहे. निवृत्ती धोरणापासून विचलित होण्याची कंपनीची ही पहिलीच वेळ आहे. चंद्रसेकरन् सध्या अध्यक्ष म्हणून त्यांचा दुसरा कार्यकाळ पूर्ण करीत आहेत, जो २०२७ मध्ये संपणार होता.

आता, विश्वस्तांनी चंद्रसेकरन् यांना टाटा सन्सचे अध्यक्ष म्हणून तिसऱ्या पाच वर्षांचा कार्यकाळ दिला आहे. ते २०३२ मध्ये वयाच्या ७० व्या वर्षी निवृत्त होतील. चंद्रसेकरन् पहिल्यांदा ऑक्टोबर २०१६ मध्ये टाटा सन्सच्या बोर्डात सामील झाले आणि चार महिन्यांनंतर जानेवारी २०१७ मध्ये त्यांची अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली.

टाटा ग्रुपची स्थापना जमशेदजी टाटा यांनी १८६८ मध्ये केली होती. ही भारतातील सर्वांत मोठी बहुराष्ट्रीय कंपनी आहे, ज्यामध्ये १० वेगवेगळ्या व्यवसायांमध्ये ३० कंपन्या जगभरातील १०० पेक्षा अधिक देशांमध्ये कार्यरत आहेत.

टाटा सन्स ही टाटा कंपन्यांची प्रमुख गुंतवणूक धारक आणि प्रवर्तक आहे. टाटा सन्सच्या इक्विटी शेअर भांडवलाच्या ६६ टक्के टाटा चॅरिटेबल ट्रस्टकडे आहेत, जे शिक्षण, आरोग्य, कला आणि संस्कृती आणि उपजीविका निर्मितीसाठी काम करतात. २०२३-२४ मध्ये टाटा ग्रुपच्या सर्व कंपन्यांचे एकूण उत्पन्न १३.८६ लाख कोटी होते. ते १० लाखांहून अधिक लोकांना रोजगार देते. (वृत्तसंस्था)

# महापालिका प्रभागरचना तर जिल्हा परिषद आरक्षण जाहीर



## महापालिका

| | |
|---|---|
| १. एकूण सदस्यांची संख्या | १०२ |
| २. चार सदस्यीय प्रभागांची संख्या | २४ |
| ३. तीन सदस्यीय प्रभागांची संख्या | ०२ |
| ४. एकूण प्रभागांची संख्या | २६ |



## जिल्हा परिषद - ६८ गट
## पंचायत समिती गण- १३६

अनुसूची

| प्रभाग क्रमांक व लोकसंख्या | प्रभागाचे नाव असल्यास | प्रभागाची व्याप्ती | निवडून द्यावयाच्या सदस्यांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| ८. लोकसंख्या एकूण- ३९०८६ अ.जा.-९१६ अ.ज.-१२१ | उत्तर कसबा (भाग) व दक्षिण कसबा (भाग), शुक्रवार पेठ, गणेश पेठ, साखर पेठ | व्याप्ती- उत्तर कसबा (भाग) दक्षिण कसबा (भाग), लक्ष्मी मार्केट, गुरुवार पेठ, शुक्रवार पेठ, साखर पेठ, विणकर बाग व परिसर. उत्तर- बाळीवेस चौक येथील गांधीनाथा रंगजी इमारतीच्या दक्षिण पूर्व कोपऱ्यापासून पूर्वेकडे, आग्नेयकडे व ईशान्येकडे मुख्य रस्त्याने भुलाभाई चौकापर्यंत व्हाया टिळक चौक मधला मारुती, कौतम चौक, कन्ना चौक. पूर्व- भुलाभाई चौकापासून दक्षिणेकडे मुख्य रस्त्याने तेलंगी पाच्छापेठ येथील घ.नं. १६० गाजुल नरसप्पा स्टोअर्स च्या उत्तर पूर्व कोपऱ्यापर्यंत म्हणजेच जमखंडी पुलापर्यंत व्हाया राजेंद्र चौक, जोडबसवण्णा चौक. … | ४ |

…

पूर्व- आसरा ब्रॉडगेज रेल्वे पुलापासून आग्नेयकडे ब्रॉडगेज रेल्वे रुळाने शहर हद्दीपर्यंत तेथून पुढे दक्षिणेकडे शहर हद्दीने कुमठे स.नं.-८५ च्या दक्षिणपूर्व कोपऱ्यापर्यंत.

दक्षिण- कुमठे स.नं.-८५ च्या दक्षिणपूर्व कोपऱ्यापासून म्हणजेच शहर हद्दीपासून पश्चिमेकडे शहर हद्दीने सोरेगांव जलशुद्धीकरण केंद्राच्या दक्षिणपूर्व कोपऱ्यापर्यंत म्हणजेच राष्ट्रीय महामार्ग क्र.-४६५ पर्यंत.

पश्चिम- सोरेगांव जलशुद्धीकरण केंद्राच्या दक्षिणपूर्व कोपऱ्यापासून म्हणजेच राष्ट्रीय महामार्ग क्र.-४६५ पासून उत्तरेकडे राष्ट्रीय महामार्गाने विजापूर रोड वरील नटराज गिफ्ट सेंटरच्या पश्चिम कोपऱ्यापर्यंत.

टीप :-

(१) मराठी व इंग्रजी अधिसूचनेमध्ये प्रभागाच्या वर्णनामध्ये तफावत असल्यास नकाशामधील हद्दीनुसार वर्णन ग्राह्य धरण्यात येईल.

(२) महानगरपालिकेच्या क्षेत्राच्या प्रभागांच्या सीमा दर्शविणारे नकाशे कार्यालयीन वेळेत पाहण्यासाठी महानगरपालिका कार्यालयात उपलब्ध राहतील.

### प्रेस नोट

दिनांक : 13/10/2025

दिनांक 13/10/2025 रोजी सकाळी 11.00 वाजता नियोजन भवन, सात रस्ता, सोलापूर येथे जिल्हा परिषद सार्वत्रिक निवडणुकीसाठी महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या (जागांच्या आरक्षणाची पध्दत व चक्रानुक्रम) नियम, २०२५ नुसार **जिल्हा परिषद सदस्य आरक्षण** सोडतीकामी श्री.कुमार आशीर्वाद, जिल्हाधिकारी सोलापूर यांचे अध्यक्षतेखाली सभा पार पडली. सदर सोडतीसाठी कु.नित्या रविराज नष्टे, वय-5 या बालिकेच्या हस्ते चिठ्ठया काढण्यात आल्या. जिल्हयातील सर्व गटांचे निघालेल्या आरक्षणाचा तक्ता सोबत आहे.

आरक्षण सोडतीवेळी सोलापूर जिल्हयातील नागरिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. आरक्षण सोडती यशस्वीपणे पार पाडणेसाठी उपजिल्हाधिकारी(महसूल) संतोष देशमुख, तहसिलदार श्रीकांत पाटील, नायब तहसिलदार सुरेंद्र परदेशीमठ, सहाय्यक महसूल अधिकारी दिपक खेंगल, मल्हारी नाईकनवरे, शोभा कुलकर्णी तसेच महसूल सहाय्यक प्रताप काळेल, पुष्पा साखरे, एस.बी.रुणवाल, आर.एस.नष्टे, के.डी.राचमाले व दरवानकर यांनी मेहनत घेतली.

(संतोषकुमार देशमुख)
उपजिल्हाधिकारी (महसूल)
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

### अनुसुचित जाती प्रवर्ग साठीचे आरक्षण.

| अनुसूचित जातीकरिता आरक्षित झालेले निवडणूक विभाग | सोडतीमध्ये अनुसुचित जाती महिलांकरिता आरक्षित झालेले निवडणूक विभाग |
|---|---|
| 41-माळीनगर | 34-भाळवणी |
| 37-दहिगांव | 66-मंगरूळ |
| 42-बोरगांव | 31-रोपळे |
| 35-टाकळी | 55-लक्ष्मीदहिवडी |
| 65-जेऊर | 43-वेळापूर |

### अनुसुचित जमाती प्रवर्ग साठीचे आरक्षण.

| अनुसूचित जमातीकरिता आरक्षित झालेले निवडणूक विभाग | सोडतीमध्ये अनुसुचित जमाती महिलांकरिता आरक्षित झालेले निवडणूक विभाग |
|---|---|
| ------------ | 62-भंडारकवठे |

### नागरिकांचा मागास प्रवर्ग साठीचे आरक्षण.

| नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता आरक्षित झालेले निवडणूक विभाग | सोडतीमध्ये नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्ग महिलांकरिता आरक्षित झालेले निवडणूक विभाग |
|---|---|
| 68-सलगर | 40-संग्रामनगर |
| 46-महुद बु. | 06-केम |
| 53-दामाजीनगर | 44-निमगांव |
| 59-वळसंग | 58-कुंभारी |
| 36-कासेगांव | 09-उपळाई बु. |
| 20-नान्नज | 47-एखतपूर |
| 14-उपळाई ठोंगे | 11-टेंभूर्णी |
| 64-वागदरी | 16-उपळाई दु. |
| 26-पोखरापूर | 52-घेरडी |

### सर्वसाधारण प्रवर्ग.

| सर्वसाधारण प्रवर्गाकरिता आरक्षित झालेले निवडणूक विभाग | सोडतीमध्ये सर्वसाधारण महिलांकरिता आरक्षित झालेले निवडणूक विभाग |
|---|---|
| 04-चिखलठाण | 02-वांगी |
| 08-मानेगांव | 01-पांडे |
| 10-कुर्डू | 63-चपळगांव |
| 17-पानगांव | 13-मोडनिंब |
| 21-दारफळ बीबी | 03-कोर्टी |
| 22-कोंडी | 07-भोसरे |
| 23-आष्टी | 19-शेळगांव आर |
| 24-नरखेड | 18-मालवंडी |
| 27-पेनूर | 25-कामती बु. |
| 28-कुरूल | 30-भोसे |
| 29-करकंब | 49-कडलास |
| 38-मांडवे | 33-वाखरी |
| 39-फोंडशिरस | 32-गोपाळपूर |
| 45-पिलीव | 54-हुलजंती |
| 48-जवळा | 60-हत्तूर |
| 50-चोपडी | 61-मंद्रूप |
| 51-कोळा | 15-पांगरी |
| 56-भोसे | 12-बेंबळे |
| 57-बोरामणी | 05-वांगी(1) |
| 67-नागणसूर | ------------ |

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# केवायसीची लिंक करतेय लाखाचे बारा हजार;
# क्लिक करताच बँक डिटेल्सची चोरी, खात्यातून पैसे गायब

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर -**

सायबर क्राईम हा मोबाईल अनिलाईनमुळीच होत असून, दिवसेंदिवस फसवणूक करण्याच्या पद्धतीमध्ये वाढ होत आहे. केवायसीच्या नावाखाली गंडा घातला जात आहे, केवायसी करायची असल्याची बतावणी करून एसएमएसमध्ये लिंक दिली जात आहे. त्यावर क्लिक होताच बँक डिटेल्सची माहिती चोरट्यांना मिळत अहे. त्यातूनच लाखाचे बारा हजार होत असल्याचे अनेक किस्से सोलापूर शहर आणि जिल्ह्यात समोर येऊ लागले आहेत,

सद्यस्थितीच्या काळात चोरटे स्मार्ट झाले आहेत. सायबर चोरटे मोबाईल टेक्नोसॅव्ही बनले असून अगदी परबसल्या सहज दुसऱ्यांच्या बँक खात्यावर दरोडा टाकत आहेत सायबर फ्रॉड ही आपोआप होणारी प्रक्रिया नाही. त्यासाठी सायबर बोरट्यांना कोणत्या ना कोणत्या माध्यमातून संवाद साधावाच लागतो. सायबर चोरटे यासाठी फोन करणे, मेसेज किया लिंक पाठवतात, आपणच आपले फोटो, माहिती सोशल मीडियावर पोस्ट करात असल्याने ज्यांना पासवायचे आहे त्यांची वैयक्तिक, सामाजिक माहिती देखील साया चोरट्यांना असते. केवळ मोहनाळात माहितीच्या आधारे व आमिष दाखवून सायबर चोरटे त्यांची मोहीम फत्ते करत आहेत.

केवायसी हा सध्या परवलीचा विषय, याप्रकारात एसएमएसमध्ये लिंक येते. बँकेचे केवायसी अपडेट करायचे आहे, असे सांगितले जाते. लिंकवर क्लिक केल्याबर डुप्लिकेट बेबसाईट उपडली जाऊन तुमचे सर्व बँक डिटेल्स घेतले जातात. यानंतर तुमच्या खात्यातून पैसे गायच होतात. सायबर क्राईममधील गुन्ह्यांचा तपास लावणे हे अतिशय जिकिरीचे आणि चिकाटीचे काम असते. सायबर पोलिसांचा विभाग कौशल्याने तांत्रिक बाबींवर तपास करत असतो, पण माणूस आयुष्यातून उठू शकतो इतकं गंभीर स्वरूप या सायबर गुन्हांच आहे. यामुळे फसवणूक होणाऱ्यांनी तत्काळ सायबर टोल फ्री १९३० किया १९४५ यावर संपर्क करावा. तसेच स्थानिक पोलिस स्टेशनशी किंवा सायबर पोलिस ठाण्याशी संपर्क साधावा. डिजिटल अरेस्ट आणि आर्थिक फसवणूक ही आज गंभीर समस्या बनली आहे, डिजिटल अरेस्ट अशी कोणतीच कारवाई कायद्यामध्ये नाही. आणखी एक आर्थिक फ्रॉड म्हणजे म्युच्युअल फंड, गुंतवणूक योजनांमध्ये जास्तीचा परतावा देण्याचे आमिष दाखवून लोकांना पैसे गुंतवण्यास भाग पाडले जाते. अनोळखी कंपनीमध्ये अथवा ॲपद्वारे आर्थिक गुंतवणूक करताना काळजी घ्या.



**इन्शुरन्स फ्रॉड...कस्टम गिफ्ट..**

कस्टम गिफ्ट फ्रॉड प्रकारात प्रामुख्याने स्त्रियाच जास्त फसल्या गेल्या आहेत. यामध्ये विशेष करून अविवाहित, एकल महिलांचा समावेश आहे. त्यांच्या सोशल मीडिया पोस्टवरून त्या एकाकी आहेत. याचा अंदाज घेतला जातो व ऑनलाईन मैत्रीचे जाळे फेकले जाते. थोडी मैत्री झाल्यावर मी तुला एक गिफ्ट परदेशातून पाठवतोय' म्हणून सांगितले जाते. मग दिला 'कस्टम डिपार्टमेंट च्या नावावर कॉल येतो आणि लाखो रुपये भरायला सांगून फसवणूक केली जाते. इन्शुरन्स फ्रॉडची कोरोनापासून जोरात चलती सुरु आहे. आरोग्य, इन्शुरन्स क्लोजरख्या नावाखाली फसवले जात आहे.

**दिवाळी, न्यू इअर फ्रॉड...**

तुम्हाला दिवाळी धमाका व न्यू इअर धमाका या प्रकारच्या लॉटरीमध्ये अमेझॉनवर बक्षीस लागलंय असा फोन येतो. पत्रही पाठवले जाते. फुकट मिळणारी वस्तु कोणाला नको असते. मग त्यांनी दिलेल्या वेव साईटवर आपण ऑनलाईन जाती आणि तिथेच फसतो. वर्षअखेर जवळ आल्यानंतर प्रसिद्ध उपहारगृहांच्या नावाने फेसबुकवर एका थाळीवर एक फ्री' अशाप्रकारच्या सवलतीच्या जाहिराती दिसतात. तिथे फॉर्म भरून आपण आपले बैंक डिटेल्स देतो. तिथेच जापली फसवणूक होते.

**लगीनघाई, पर्चेस फ्रॉड...**

मॅट्रिमोनियल साईटवरून वय वाढलेल्या एकल महिलांना सावज केले जाते. अनपेक्षितपणे एखाद्या देखण्या परदेशी स्थळाकडून विचारणा झालेली स्त्री हारखून जाते. मेल किंवा फोनवर वैयक्तिक गप्पा व्हायला लागतात, या गुन्हेगारांच्या लव्ह स्क्रिप्टस' या तयारच असतात. पैसे पाठवतो असे सांगून फ्रॉड कॉलद्वारे टेरर फंडीग असल्याचे सांगून महिलांकडून लाखो रूपये ऑनलाईन उकळले जातात. अशाप्रकारे लगीनघाई असणाऱ्यांना टोपी घातली जात आहे. पर्चेस फ्रॉड देखील सध्या बूम आहे. साड्या, दागिने, बॅग्ज अत्यंत कमी किमतीत दाखवून खोट्या वेबसाईट बनवल्या जातात. महिला तिथे पैसे भरतात पण वस्तू घरी येत नाहीत.

**लोन, फेक फेसबक प्रोफाईल फ्रॉड...**

कर्ज (लोन) हा सर्वांच्या जिव्हाळ्याचा विषय. यात मोठ-मोठ्या फायनान्स कंपन्यांच्या नावांचा वापर केला जाती. अगदी पंतप्रधानांचा फोटो वापरून वेबसाईट तयार करून पंतप्रधान कर्ज निधी' मधून कर्ज देण्याच्या जाहिरातीसुद्धा केल्या जातात. कर्जाच्या रकमेच्या काही टक्के रक्कम तुमच्याकडून आधीच घेतली जाते आणि सायबर चोरटे गायब होतात. सोशल मीडियावरील फेसबुक प्रसिध्द आहे. यामध्ये तुमच्याच फेसबुक प्रोफाईलवरील माहिती घेऊन दसरे प्रोफाईल तयार केले जाते आणि त्यावरून तुमच्या मित्र मंडळींना पैशाची मागणी केली जाते.

**जीवावर उठणारा मायनर गर्ल्स फ्रॉड...**

मायनर गर्ल्स फ्रॉड हा एक भयंकर प्रकार आहे. पालकांच्या नकळत कधीकधी अल्पवयीन मुली इन्स्टाग्रामवर आपण १८ वर्षाकरील असल्याचे दाखवून अकाऊंट उघडतात. या मुलीना हेरून एखाद्या मुलीच्या नावाने फ्रेंड रिक्वेस्ट पाठवली जाते. मैत्री झाल्यावर तिच्या शरीराविषयी बोलून तिच्याकडून व्हिडीओची मागणी केली जाते. तो दिला की मग ब्लॅकमेलिंग सुरू होतं.

# शहराचा पाणीपुरवठा पुन्हा एक रोटेशनसाठी एक दिवसाने पुढे

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर -**



शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी उपसा करण्यात येणाऱ्या दोन ठिकाणी वीज पुरवठा तब्बल ८ ते ९ तास खंडित राहिल्याने पाणीपुरवठा उपसा प्रक्रिया बंद होती परिणामी शहराचा पाणीपुरवठा पुन्हा एकदा एक रोटेशनसाठी एक दिवसाने पुढे जाणार आहे आणि यामुळेच संपूर्ण शहराचा पाणीपुरवठा पुढील आठवडाभरासाठी विस्कळीत होणार आहे.

शहरास पाणी पुरवठा करणाऱ्या सोरेगांव जलशुध्दीकरण केंद्रास महाराष्ट्र राज्य महावितरण मंडळाकडून होणारा विद्युत पुरवठा सोमवार, दि. १३ ऑक्टोबर रोजी पहाटे ५: ३० ते दुपारी १: १५ पर्यंत खंडीत झाला होता तर पाकणी जलशुध्दीकरण केंद्रास होणारा विद्युत पुरवठा सोमवार, दि. १३ ऑक्टोबर रोजी दुपारी १२: १० ते रात्री ९: ३० वाजेपर्यंत खंडीत झाला होता. यामुळे सोलापूर शहर पाणी पुरवठयासाठी टाकळी पंप हाऊसवरुन सुमारे ८ तास व उजनी पंप हाऊसवरुन सुमारे ९ तास पाण्याचा उपसा होवू शकला नाही. या कारणामुळे दि. १३ ऑक्टोबर रोजीचा नियोजित पाणीपुरवठा होवू शकलेला नाही. दोन्ही कारणामुळे संपूर्ण शहराचा दि. १४ ऑक्टोबर पासूनचा नियोजित पाणी पुरवठा एक रोटेशन एक दिवसाने पुढे जाणार आहे. शहरातील नागरीकांनी उपलब्ध पाण्याचा वापर काटकसरीने करुन महापालिकेस सहकार्य करावे असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. सोलापूर-उजनी दुहेरी जलवाहिनीचे काम पूर्ण होऊन शहराला आता अधिक पाणी मिळत असल्याने महापालिका प्रशासनाकडून शहरातील काही भागांमध्ये तीन दिवसाआड पाणीपुरवठा करण्यात आला होता. तर शहरातील आणखी काही भागांसह हद्दवाढ भागांमधील पाणीपुरवठा हा पाच दिवसाआडच ठेवण्यात आला आहे. यामुळे शहरातील त्या तीन दिवसाआड पाणीपुरवठा होणाऱ्या भागांना फारसा फरक पडणार नाही पण हद्दवाढ भागाला मात्र आता आठवड्यानंतर पाणी पुरवठा होणार असल्याने या भागातील नागरिकांची त्रेधातिरपट उडणार आहे.



# जैन सोशल फेडरेशनचा उपक्रम प्रेरणादायी : रविंद्र कर्वे

## दिवाळी फराळ महोत्सवाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि.१३ ऑक्टोबर-**

सामाजिक बांधिलकी जपत आणि नफ्याच्या गणितापलीकडे जाऊन दिवाळीचा गोडवा सर्वसमावेशक करण्यासाठी जैन सोशल फेडरेशनतर्फे राबविला जाणारा उपक्रम फ्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन ठाणे येथील सेवा सहयोग फाउंडेशनच्या विद्यार्थी विकास योजनांचे मुख्य प्रवर्तक रवींद्र कर्वे यांनी केले.

येथील डफरिन चौकीतील सारस्वत ब्राह्मण मंगल कार्यालयात आयोजीत ''भगवान महावीर भवन दिवाळी फराळ महोत्सव २०२५'' चे उद्घाटन श्री. कर्वे यांच्या हस्ते झाले. यावेळी ज्येष्ठ पत्रकार व विद्यार्थी विकास योजनांचे मार्गदर्शक अरुण करमरकर, एस.पी. इन्स्टिट्यूट ऑफ न्यूरोसायन्सेस व वळसंगकर हॉस्पिटलचे संचालक डॉ. अश्विन वळसंगकर, संयाजक पराग शहा उपस्थित होते. अध्यक्षपदी वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी होते. यावेळी ''श्री सुधा सागर एनएक्स'' या दालनाचेही उद्घाटन करण्यात आले. हा महोत्सव २३ ऑक्टोबरपर्यंत सुरू राहणार आहे. श्री. कर्वे म्हणाले, ''सातत्याने आणि निस्वार्थ भावनेने समाजासाठी काहीतरी करण्याचा आदर्श पराग शहा यांनी घालून दिला आहे. समाजातील सर्वांना गोडवा देणारा हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी आहे.'' डॉ. गांधी यांनी व्यवसायिक अनुभव नसतानाही केवळ सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून सोलापुरकरांना दर्जेदार आणि परवडणाऱ्या दरात मिठाई उपलब्ध करून दिली गेली. अशा उपक्रमांमुळेच सण साजरा होण्याचा खरा अर्थ उमजतो.'' पराग शहा यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन डॉ. संजय सरसमकर यांनी केले.

# मोहोळमध्ये अनेकांच्या आशा पल्लवीत

## ओबीसी गणातील सदस्य होणार सभापती

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.१३ ऑक्टोबर-**

जिल्हा परिषद गटातील ६ पैकी ५ गट सर्वसाधारण झाल्यामुळे अनेक इच्छुकांच्या आशा पल्लवीत झालेल्या असल्या तरी विधानसभा निवडणुकीत तालुक्यात बदललेली राजकीय समीकरणे पाहता कोणाला कुठल्या पक्षाकडून चान्स मिळणार आणि एकाच पक्षात किती गट राहणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

मोहोळ तालुक्यात जिल्हा परिषदेचे ६ गट असून पंचायत समितीचे १२ गण आहेत त्याचे आरक्षण सोमवारी जाहीर झाले आणि जिल्हा परिषदेचे चक्क ५ गट सर्वसाधारण झाल्यामुळे यावेळेस निवडणुकीमध्ये जत्रा भरणार का ? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. नवीन रचनेनुसार पेनुर,कामती बुद्रुक,कुरुल,नरखेड, आष्टी ,पोखरापूर असे ६ जि. प.गण झाले आहेत. यातील कामती बुद्रुक हा गट सर्वसाधारण महिलेसाठी राखीव झाला आहे उर्वरित पोखरापूर वगळता बाकीचे ४ गट सर्वसाधारण प्रवर्गासाठी राखीव आहे. मोहोळ पंचायत समिती सदस्याचे आरक्षण जाहीर झाले असून सभापतीपद ओबीसीसाठी राखीव असून पेनूर



कुरुल ओबीसीसाठी आहे तेथे महिला किंवा पुरुष उभारू शकतात त्यामुळे कुणाच्या ताब्यात पंचायत समितीची तालुक्याची सूत्रे जाणार याकडे सर्वांचे लक्ष असल्याचे चित्र दिसून येत आहे.

यामुळे जिपचे अर्थ आणि बांधकाम समितीचे माजी सभापती विजयराज डोंगरे, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष बाळराजे पाटील, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष उमेश पाटील, सौ.शैला गोडसे, माजी उपसभापती मानाजी माने, शिवसेना शिंदे जिल्हाप्रमुख चरण चवरे, आजिंक्यराणा पाटील,राजन पाटील समर्थक रामदास चवरे,पंचायत समितीचे माजी सदस्य ज्ञानेश्वर चव्हाण,जिल्हा दूध संघाचे उपाध्यक्ष दीपक माळी (कामती) भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष शंकरराव वाघमारे, भाजपाचे माजी तालुकाध्यक्ष सुनील चव्हाण,मोहोळ दक्षिण मंडल भाजपाचे विद्यमान अध्यक्ष रमेश माने,राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे राहुल मोरे (वडवळ) जकराया कारखान्याचे कार्यकारी संचालक सचिन जाधव,जालिंदर लांडे, माजी जि प सदस्य कै. तानाजी खताळ यांच्या पत्नी विमल खताळ, काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष राजेश पवार शिवसेना (उबाठा) तालुकाप्रमुख अशोक भोसले यांच्या पत्नी सुनिता भोसले,बाळासाहेब डुबे पाटील,रामचंद्र पतंगे रामराव भोसले, वाघोली सूतगिरणीचे अध्यक्ष अभिजीत ढोबळे,मोहोळ चे माजी सभापती यशवंत नरूटे, बब्रुवान (नाना) वाघमारे(माळी), भाजपाचे राज्य परिषद सदस्य संजीव दादा खिलारे, सोमेश आबा क्षीरसागर, पेनुर चे ग्रामपंचायत सदस्य गिरीश गवळी अशा अनेकांची नावे चर्चेत आली आहे.

जिल्हा परिषदेचा एकही गट यावेळी मागासवर्गीयांसाठी राखीव नाही. यामुळे मागासवर्गीय समाजात नाराजी आहे. बाळराजे पाटील यांचा मतदारसंघ उडल्यामुळे ते वगळता बाकीच्या जिल्हा परिषद सदस्यांना पुन्हा संधी मिळणार का ? पक्ष त्यांच्यावर विश्वास टाकणार का ? आणि पक्षाने विश्वास टाकला तरी जनता त्याला साथ देणार का ? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**पंचायत समितीचे आरक्षण असे :** आष्टी आणि खंडाळी (सर्वसाधारण), नरखेड (सर्वसाधारण महिला), शिरापूर सो (सर्वसाधारण महिला), सावळेश्वर (सर्वसाधारण महिला), कामती बुद्रुक (ओबीसी महिला), सय्यद वरवडे (सर्वसाधारण), पोखरापूर (अनुसूचित जाती महिला), कुरुल (ओबीसी) घोडेश्वर (सर्वसाधारण) टाकळी सिकंदर (अनुसूचित जाती महिला)
मोहोळ व अनगर नगर परिषद व नगरपंचायत झाल्याने मोहोळ आणि अनगर मधील दीपक गायकवाड, सीमा पाटील, अनगरचे बाळराजे पाटील अजिंक्यराणा पाटील हे आपोआप स्पर्धेतून बाहेर पडले आहेत.

**जिल्हा परिषद जागांचे आरक्षण असे** : आष्टी (सर्वसाधारण), नरखेड (सर्वसाधारण), कामती बुद्रुक (सर्वसाधारण महिला), पोखरापूर (ओबीसी), पेनुर (सर्वसाधारण), कुरुल (सर्वसाधारण).

# श्रीपूर साखर कारखान्याचा दिवाळीसाठी १२६ रुपयांचा हप्ता; कामगारांना १४ टक्के बोनस

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. १३ ऑक्टोबर-**

येथील सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याने ऊस उत्पादक सभासदांसाठी दिपावली सणासाठी १२६ रुपयांचा अंतिम हप्ता तर कामगारांना १४ टक्के बोनस देणार असल्याची माहिती चेअरमन प्रशांतराव परिचारक यांनी दिली. यावेळी उपाध्यक्ष कैलास खुळे, कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी उपस्थित होते.





कारखान्याच्या परंपरेप्रमाणे दिपावली सणासाठी गळीत हंगाम २०२४-२५ मध्ये गाळप केलेल्या ऊसास प्रति मे.टन रु. १२६ रुपयांप्रमाणे ऊस बिल ऊस उत्पादक सभासद शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर वर्ग केले आहे. ऊस बिलाचा अंतिम हप्ता दिला असून या हंगामात गाळप केलेल्या ऊसास प्रती मे.टन रु. २९०१ रुपये इतका दर दिला असल्याची माहिती चेअरमन परिचारक यांनी दिली. अधिक माहिती देताना परिचारक म्हणाले, कारखाना स्थापनेपासून ऊस उत्पादक सभासद शेतकऱ्यांना दिपावली सणासाठी पैशाची गरज असल्याने त्यांना ऊस बिलाचा अंतिम हप्ता देणेची परंपरा कारखान्याच्या व्यावस्थापनाने जतन केली आहे. त्याचप्रमाणे कारखान्यामध्ये काम करणाऱ्या कामगारांनाही दिपावली सणासाठी बोनस देणेची परंपरा जपली आहे. त्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये व कामगारांमध्ये आनंदाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. यावेळी कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ.यशवंत कुलकर्णी यांनी कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्यांने गळीत हंगाम २०२४ / २५ मध्ये गाळप केलेल्या ऊसास आज प्रती मे.टन रक्कम रु. १२६ रु .- प्रमाणे एकूण रक्कम रु.१० कोटी त्याचप्रमाणे कामगार दिपावली बोनस एकूण रक्कम रु. ३.९० कोटी बँकेत वर्ग केली आहे. कारखान्याने ऊस उत्पादकांना एफ. आर. पी. पेक्षाही ज्यादा रक्कम अदा केली आहे. गळीत हंगाम २०२५ / २६ मध्ये कारखान्याकडे सुमारे १५००० हेक्टर ऊस क्षेत्राच्या नोंदी असून त्यामधून सुमारे १२ ते १३ लाख मे.टन ऊस उपलब्ध होईल. या सर्व ऊसाचे गाळप करण्याचा कारखाना व्यावस्थापनाचा मानस आहे. त्यासाठी कारखान्याची ऑफ सिझन मधील सर्व कामे पुर्ण झालेली असून कारखाना गाळपासाठी सज्ज झाला आहे.

यावेळी कारखान्याचे संचालक दिनकरराव मोरे, उमेशराव परिचारक, दिलीपराव चव्हाण, ज्ञानदेव ढोबळे, तानाजी वाघमोडे, बाळासाहेब यलमर, भगवान चौगुले, लक्ष्मण धनवडे, भास्कर कसगावडे, भैरू वाघमारे, गंगाराम विभुते, सुदाम मोरे, विजय जाधव, हनुमंत कदम, किसन सरवदे, दाजी पाटील, दिलीप गुरव, शामराव साळुंखे, राणू पाटील आदी व कारखान्याचे अधिकारी उपस्थित होते.

# सोलापूर जिल्हा काँग्रेसची आज काँग्रेस भवनमध्ये बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ ऑक्टोबर-**

जिल्हा काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांची महत्त्वाची बैठक मंगळवार १४ ऑक्टोबर रोजी दुपारी १२:३० वाजता काँग्रेस भवन येथे आयोजित केली आहे. या बैठकीमध्ये स्थानिक स्वराज्य संस्था मधील जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषद,नगरपंचायत निवडणुकीच्या संदर्भात चर्चा करण्यात येणार आहे. या बैठकीस महाराष्ट्राचे सहप्रभारी बी. एम. संदीप खासदार प्रणितीताई शिंदे, सोलापूर जिल्ह्याचे प्रभारी मोहन जोशी, सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार व विधानसभा मतदारसंघाचे निरिक्षक उपस्थितीत राहणार आहेत.

सदर बैठकीसा सोलापूर जिल्ह्यातील सर्व तालुका, ब्लॉक, शहर अध्यक्ष, फ्रंटल,सेल, विभागाचे जिल्हाध्यक्ष, पदाधिकारी, आजी-माजी जिल्हा परिषद सदस्य, पंचायती समितीचे सदस्य, नगरपरिषद, नगरपंचायतीचे सर्व नगरसेवक, ग्रामपंचायतचे सरपंच,उपसरपंच, सदस्य व काँग्रेस कार्यकर्त्यांनी वेळेवर उपस्थित राहावे असे आवाहन सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.

# करमाळा तालुक्यात १२ गणांचे आरक्षण निश्चित

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.१३ ऑक्टोबर-**

करमाळा पंचायत समितीचे सभापतीपद यंदा ओबीसी महिलेसाठी राखीव असून, आरक्षण सोडत प्रक्रिया आज सोमवार, (दि. १३) रोजी पंचायत समिती सभागृहात झाली. यावेळी पर्यवेक्षण अधिकारी अंजली मरोड व तहसीलदार शिल्पा ठोकडे यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांच्या हस्ते चिठ्ठी काढून आरक्षण सोडत प्रक्रिया घेण्यात आली.

गत निवडणुकीत एकूण १० गण होते. यावेळी दोन नवीन गणांची निर्मिती झाल्याने यावेळी १२ गण झाले आहेत. त्यामुळे व गावांच्या फेरबदलामुळे अनेक इच्छुकांचे राजकीय गणित बदलले आहे. पांडे गटातील पांडे व रावगाव या दोन्ही ठिकाणच्या अनपेक्षित आरक्षणांमुळे चर्चांना उधाण आले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा परिषद व पंचायत समितीतील प्रारूप आरक्षणावर हरकती आणि सूचना सादर करण्याचा कालावधी १४ ते १७ ऑक्टोबर असा आहे.

| पंचायत समिती गणनिहाय आरक्षण पुढीलप्रमाणे | |
|---|---|
| १) रावगाव | अनुसूचित जाती, महिला |
| २) पांडे | अनुसूचित जाती |
| ३) हिसरे | सर्वसाधारण |
| ४) वीट | नागरिकांचा मागास प्रवर्ग, महिला |
| ५) कोर्टी | सर्वसाधारण |
| ६) केत्तुर | सर्वसाधारण |
| ७) चिखलठाण | सर्वसाधारण, महिला |
| ८) उमरड | नागरिकांचा मागास प्रवर्ग, महिला |
| ९) जेऊर | सर्वसाधारण, महिला |
| १०) वांगी (१) | सर्वसाधारण, महिला |
| ११) साडे | सर्वसाधारण |
| १२) केम | नागरिकांचा मागास प्रवर्ग |

# उत्तर सोलापूरचा सभापती ठरवणार मार्डी गण

## पंचायत समिती गण आरक्षण जाहीर; इच्छुकांची मोर्चेबांधणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर ..**

सोमवारी उत्तर सोलापूर पंचायत समिती आरक्षण सोडत जुन्या जिल्हाधिकारी कार्यालयात काढण्यात आली. उत्तर सोलापूर तालुक्यातील तीन जिल्हा परिषद गट तर सहा पंचायत समिती गणांचा यामध्ये समावेश आहे. सभापतीपद अनुसुचित जातीसाठी आरक्षित आहे. त्यामुळे अनुसुचित जातीसाठी आरक्षित मार्डी गणातूनच सभापती होणार हे निश्चित मानले जात आहे.

या आरक्षण सोडतीत तालुक्यातील नान्नज जिल्हा परिषद गट नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी)साठी तर नव्याने स्थापन झालेले कोंडी व बीबी दारफळ गट सर्वसाधारण प्रवर्गासाठी आरक्षित झाले. पंचायत समितीसाठी अनुसूचित जाती लोकसंख्या नुसार मार्डी गण अनुसूचित जाती करिता निश्चित झाले. उर्वरित पाच गणातून चिट्टीद्वारे वडाळा गण हा ना. मा.प्र महिला (ओबीसी) साठी आरक्षित झाला. नान्नज, कोंडी गण सर्वसाधारण झाले. बीबीदारफळ व ति-हे गणासाठी सर्वसाधारण महिला आरक्षण जाहीर झाले. यावेळी उपजिल्हाधिकारी निवडणूक अधिकारी गणेश निराळे, उत्तरचे तहसीलदार निलेश पाटील, उत्तर पंचायत समिती गटविकास अधिकारी राजाराम भोंग, मंडल अधिकारी प्रवीण घम उपस्थित होतै. मोठ्या गटातील विद्यार्थिनी अन्यथा वाघमोडे हिने आरक्षण सोडतीची चिट्टी काढली. जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूक आरक्षण सोडत जाहीर झाल्याने माजी आमदार दिलीप माने, राष्ट्रवादी माजी जिल्हाध्यक्ष बळीराम साठे, भाजपाचे शहाजी पवार, माजी आमदार यशवंत माने, बाजार समिती संचालक अविनाश मार्तंडे व इतर राजकीय पक्षांची राजकीय भूमिका निर्णायक ठरणार आहे.



| पंचायत समिती गण आरक्षण | |
|---|---|
| नान्नज | सर्वसाधारण |
| वडाळा | ना म प्र (ओबीसी) महिला |
| दारफळ बी बी | सर्वसाधारण महिला |
| मार्डी | अनुसूचित जाती |
| कोंडी | सर्वसाधारण |
| तिऱ्हे | सर्वसाधारण महिला |
| **जिल्हा परिषद गट आरक्षण** | |
| दारफळ बीबी | सर्वसाधारण |
| नान्नज | ना म प्र (ओबीसी) |
| कोंडी | सर्वसाधारण |

# दहा वर्षांपासून राज्यातल्या स्थानिक स्वराज्य संस्थांचे ऑडिट बासनात

**तभा वृत्तसेवा। विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १३ ऑक्टोबर-**

राज्यातील नागरी स्थानिक संस्थांचे लेखापरीक्षण (ऑडिट) गेल्या दशकभरापासून म्हणजे २०१५-१६ पासून पूर्ण झालेले नाही. लेखापरीक्षा संचालनालयाच्या या वर्षाच्या अंदाजपत्रकातून ही धक्कादायक माहिती समोर आली आहे.

२०१५-१६ चा ऑडिट अहवाल अजून तयार झालेला नाही. यामुळे पैशांचा हिशेब पारदर्शक ठेवणं आणि जबाबदारी निश्चित करणं कठीण झालंय, असं निरीक्षण नोंदवण्यात आलंय. कसे होते लेखापरीक्षण? स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय राज्यातल्या २८ हजार ९८९ संस्थांचे ऑडिट करते. यात १४५ नगरपंचायती, २४७ नगरपालिका, २९ महानगरपालिका, तसंच ग्रामपंचायती, पंचायत समित्या आणि जिल्हा परिषदा यांचा समावेश आहे. २०१४-१५ नंतरचा अहवाल विधिमंडळासमोर ठेवलाच गेला नाही. विशेष म्हणजे २०२३-२४ मध्ये १ हजार ३९२ आणि २०२४-२५ मध्ये सप्टेंबरपर्यंत ९७१ अपहाराची प्रकरणे समोर आली. यात कोट्यवधी रुपये गायब झालेत, असेही त्यामध्ये नमूद केले आहे. संचालनालयासाठी १ हजार ४२० कर्मचाऱ्यांची मंजूरी आहे. पण सध्या फक्त ९४५ कर्मचारी कार्यरत आहेत. लेखापरीक्षण रखडल्यामुळे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# सहन होत नाही, आणि...

काँग्रेसची सत्ता असताना केंद्र सरकारात दीर्घकाळ अर्थमंत्री राहिलेले व देशांतर्गत सुरक्षेच्या दृष्टीने काहीशा अस्थिर झालेल्या काळात केंद्रीय गृहमंत्रिपदी राहिलेले काँग्रेसचे नेते पी. चिदम्बरम् यांनी काही दिवसांच्या अंतराने पुन्हा एकदा पक्षनेतृत्वाच्या कमकुवत धोरणांवर प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष टीका केली. कळत नकळत केलेल्या वक्तव्याचे काही विपरीत राजकीय परिणाम होतात असे दिसले, तर परिपक्व नेता सारवासारव करतो, कधीकधी दिलगिरीही व्यक्त करतो आणि क्वचित त्यासाठीचे प्रायश्चित्तदेखील घेतो. त्यानंतर पुन्हा तशी चूक करण्याचे तो कटाक्षाने टाळतो आणि एकदा केलेली चूक कायमची लक्षातही ठेवतो. चिदम्बरम् यांनी काही दिवसांपूर्वीच एका वृत्तवाहिनीस दिलेल्या मुलाखतीत, २६/११ च्या भारतावरील दहशतवादी हल्ल्यानंतर काँग्रेस सरकारने घेतलेल्या कचखाऊ भूमिकेचा गौप्यस्फोट केला होता. मुंबईवरील त्या दहशतवादी हल्ल्यात शेकडो निरपराध लोकांची पाकिस्तानातून प्रशिक्षण घेऊन आलेल्या मूठभर अतिरेकी दहशतवाद्यांनी भीषण हत्या केली होती आणि देशाच्या सुरक्षा व्यवस्थेतील अक्षम्य त्रुटी व त्याकडे कानाडोळा करण्याचे बेजबाबदार प्रकारही उघड झाले होते. त्या वेळी मनमोहन सिंग सरकारने पाकिस्तानवर हल्ला करून देशातील त्या सर्वांत भीषण दहशतवादी हल्ल्याचा बदला घ्यावा अशी सर्वसामान्य जनतेची आणि केंद्र सरकारातील काही मंत्र्यांची व काही राजकीय नेत्यांचीही इच्छा होती. पण त्या वेळी मनमोहन सिंग सरकारने माघार घेतली व पाकिस्तानवर हल्ला न करण्याचा निर्णय घेतला, असे त्या मुलाखतीत चिदम्बरम् यांनी म्हटले होते. त्याच काळात भारत आणि पाकिस्तान दरम्यान तीव्र तणाव निर्माण झालेला असताना अमेरिकेच्या तत्कालीन राष्ट्रीय सल्लागार मेंडोलिसा राईस यांनी तातडीने भारतात येऊन पाकिस्तानवर हल्ला न करण्याचा सल्ला मनमोहन सिंग सरकारला दिला होता, असेही त्या मुलाखतीत चिदम्बरम् म्हणाले होते. काँग्रेसच्या सर्वेसर्वा असलेल्या सोनिया गांधी यांनीही तोच सल्ला दिल्याने, जनतेची इच्छा व लष्कराची तयारी असूनही भारताने पाकिस्तानचा बदला न घेण्याचा मार्ग मान्य केला, अशा आशयाच्या त्या मुलाखतीनंतर उठलेल्या राजकीय वादळानंतर चिदम्बरम् यांनी सारवासारव करण्याचा प्रयत्न केला, पण त्यांची ती विधाने काँग्रेस सरकारच्या व नेतृत्वाच्या चुका दाखवून गेलीच व नेतृत्वाच्या क्षमतेवरही बोट ठेवून गेली होती. त्याचे राजकीय परिणाम जे व्हायचे, ते त्यानंतर काँग्रेसला अनुभवावे लागले. तोवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका करत, अमेरिकेसमोर शरणागती पत्करल्याचा आरोप करणाऱ्या राहुल गांधी यांचा सूरही त्यामुळे मवाळ तर झालाच, पण काँग्रेस हाच शरणागत मानसिकतेचा पक्ष असल्याची बाबही अधोरेखित झाल्याने काँग्रेसी आक्रमक टीकेची धारदेखील बोथट झाली. त्या वेळी चिदम्बरम् यांनी हा मुद्दा बोलण्याच्या ओघात पुढे आणला असेल किंवा त्याचे पक्षावरील राजकीय परिणाम काय असतील याची त्यांना जाणीव नसेल असे मानणे भोळसटपणाचेच ठरेल. कारण आज काँग्रेसच्या नेतृत्वाच्या फळीत जे कोणी मोजके नेते समंजस व परिपक्व मानले जातात त्यामध्ये चिदम्बरम् यांचे स्थान वरचे आहे. तरीही, पक्षाच्या केंद्रीय स्तरावरील कार्यशैलीपासून त्यांना काहीसे दूर राखले जात असल्याचेही त्या मुलाखतीतील त्यांच्या काही सूचक संकेतांवरून स्पष्ट झाले होते. कदाचित ती त्यांची खंतदेखील असावी. त्या नाराजीतूनच त्यांनी काँग्रेसच्या त्या वेळच्या शरणागत मानसिकतेबद्दल उघड नाराजी व्यक्त केली असावी आणि त्याचे अपेक्षित राजकीय पडसाद उमटू लागताच त्यावर सारवासारव करण्याचा प्रयत्न केला असावा.

चिदम्बरम् यांच्या त्या वक्तव्याचे पडसाद अजूनही देशाच्या राजकारणात उमटत असताना व त्यामुळे काँग्रेसची अवस्था काहीशी अवघड झालेली असताना पुन्हा एक ताजे वक्तव्य करून काँग्रेसवर नवा हल्ला चढविण्याचे नवे, धारदार शस्त्र त्यांनी भाजपच्या हाती सोपविले आहे. खलिस्तानी चळवळीचा बीमोड करण्यासाठी जून १९८४ मध्ये अमृतसरच्या सुवर्ण मंदिरात लष्कर घुसवून तेथे आश्रय घेतलेल्या खलिस्तानवादी अतिरेक्यांना पकडण्यासाठी केलेली ऑपरेशन ब्लू स्टार ही कारवाई म्हणजे मोठी चूक होती व या चुकीपायी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या जिवाची किंमत मोजावी लागली अशी स्पष्टोक्ती करून पुन्हा एकदा चिदम्बरम् यांनी काँग्रेसला अडचणीत आणले आहे. ती कारवाई म्हणजे लष्कर, गुप्तचर विभाग आणि नागरी संरक्षण यंत्रणा यांचा संयुक्त निर्णय होता, त्यामुळे या चुकीचे खापर केवळ इंदिरा गांधी यांच्यावर फोडणे योग्य होणार नाही, हा खुलासाही त्यांनी या वक्तव्यानंतर लगेचच करून टाकला असला, तरी अशा निर्णयाचे अंतिम अधिकार देशाचे नेतृत्व करणाऱ्या नेत्यांवर असते, ही बाब त्यांनी अगोदरच्या मुलाखतीतूनच अधोरेखित करून ठेवलेली होती. २६/११ च्या अतिरेकी हल्ल्यानंतर पाकिस्तानवर लष्करी कारवाई न करण्याचा अंतिम निर्णय पंतप्रधान या नात्याने डॉ. मनमोहन सिंग यांनी घेतला होता, असे सूचित करून राजकीयदृष्ट्या काँग्रेसची कोंडी करणाऱ्या चिदम्बरम् यांनी ऑपरेशन ब्लू स्टारवरील कारवाईबाबत मात्र त्यावेळी पंतप्रधान असलेल्या इंदिरा गांधी यांना त्या चुकीच्या ठपक्यातून बाजूला ठेवण्याचा चाणाक्षपणा दाखविला आहे. हिमाचल प्रदेशातील कसौली येथे खुशवंत सिंग साहित्य उत्सवातील एका मुलाखतीत त्यांनी हे वक्तव्य केले आणि अपेक्षेप्रमाणे भाजपने काँग्रेसच्या नेतृत्वक्षमतेवर उमटलेले पक्षांतर्गत प्रश्नचिन्ह ठळक करण्याची नेमकी संधी साधली. आता या वक्तव्याबद्दल त्यांच्यावर काय कारवाई करावी यावर पक्षश्रेष्ठींचा खल सुरू झाला असेल, पण तशी काही कारवाई केलीच, तर पक्षातील काही जाणत्या नेत्यांची अगोदरच कमकुवत असलेली कुमक अधिकच दुबळी होईल याचीही पक्षश्रेष्ठींना जाणीव असेल. त्यामुळे, चिदम्बरम् यांची वक्तव्ये व त्याचे राजकीय पडसाद म्हणजे काँग्रेससाठी सहन होत नाही आणि सांगताही येत नाही अशीच काहीशी अवघडलेली स्थिती होऊन राहणार आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेसचे एकमेव सर्वेसर्वा नेते राहुल गांधी यांच्या क्षमतांबाबत पक्षात अगोदरच नाराजीच्या अनेक ज्वालामुखींचा उद्रेक झालेला आहे. सुमारे चार वर्षांपूर्वी, ऑगस्ट २०२० मध्ये कपिल सिब्बल यांच्यासह २३ ज्येष्ठ काँग्रेस नेत्यांनी थेट सोनिया गांधी यांना पत्र लिहून नेतृत्वाच्या क्षमतेविषयी शंका व्यक्त करून पक्षात पुकारलेल्या बंडाचा मोठा फटका काँग्रेसला व विशेषतः गांधी परिवाराच्या एकमुखी नेतृत्वाला बसला होता. उत्तर प्रदेश, पंजाब, गोवा, उत्तराखंड, मणिपूर या राज्यांतील दारुण पराभवानंतर हा गट अधिक आक्रमकपणे सक्रिय झाला आणि पक्षाचा वारसा जपण्याची गरज अधोरेखित करत त्यांनी क्षमतावान नेतृत्वाची गरज थेट सोनिया गांधींकडे मांडली. दुर्दैवाने काँग्रेसकडे अध्यक्ष नसल्याने पक्षाची स्थिती केविलवाणी होत असून, अनेक जण पक्ष सोडून चालले असल्याने पक्षाची कार्यकारिणी बैठक बोलवा, अशी मागणी कपिल सिब्बल यांनी केली होती. या गटाची ओळख पुढे जी-२३ या नावाने काँग्रेसवर सावटासारखी कायम राहिली होती. सर्वसमावेशक नेतृत्व नसल्याने पक्षाची संघटनात्मक रचना कमकुवत झाली असून यापुढे हुजरेगिरी करत पक्षात राहणार नाही अशी स्पष्टोक्तीही सिब्बल यांनी तेव्हा केली होती. एका परीने ते बंड म्हणजे गांधी परिवाराच्या नेतृत्वालाच आव्हान मानले गेले आणि ते बंड झाल्यामुळेच, पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदावर नामधारी का होईना, गांधी परिवाराचे एकनिष्ठ असलेले मल्लिकार्जुन खडगे यांची निवड पक्षाला करावी लागली. मात्र, खडगे यांच्याकडे पक्षाची धुरा असतानाही, राहुल गांधी हेच पक्ष चालवितात आणि त्यांच्या मर्जीखेरीज कोणत्याही निर्णयाचे, कृतीचे पान हलत नाही हेही वारंवार स्पष्ट झाले आहे. चिदम्बरम यांनी केलेले वक्तव्य ही तर केवळ सुरुवात आहे. २०१० पासून, म्हणजे अधिक नेमकेपणाने सांगावयाचे झाले तर राहुल गांधी यांना पक्षाचे नेतृत्व बहाल केले गेले तेव्हापासून देशातील अनेक निवडणुकांत सातत्याने हार पत्करावी लागत असताना, नेतृत्वाच्या क्षमतेवर बोट न ठेवता मूग गिळून स्वस्थ बसण्याची सहनशीलता आता कमी होत असल्याचे हे स्पष्ट संकेत आहेत.

## आंतरराष्ट्रीय

# व्याप्त काश्मीरमधील होरपळ

**प्रा. जयसिंग यादव**

व्याप्त काश्मीरमध्ये आंदोलक आणि सुरक्षा दलांमध्ये अलिकडेच झालेल्या हिंसक चकमकीत तीन पोलिस अधिकाऱ्यांसह नऊ जणांचा मृत्यू झाला. दोन्ही बाजूंचे डझनभर लोक जखमी झाले. परिस्थिती नियंत्रित करण्यासाठी संघीय सरकारने एक वाटाघाटी समिती पाठवली होती. नुकतीच व्याप्त जम्मू आणि काश्मीर संयुक्त अवामी कृती समिती (जेएएसी) सोबत महत्त्वपूर्ण चर्चा करण्यासाठी ती मुझफ्फराबाद येथे पोहोचली होती. ही समिती व्यापाऱ्यांचे आणि नागरी समाज गटांचे प्रतिनिधित्व करणारी एक प्रमुख संघटना आहे, जी संपूर्ण प्रदेशातील तळागाळातील असंतोषाचा आवाज म्हणून उदयास आली आहे. या प्रकरणात मिळालेल्या माहितीनुसार, कार्यकर्ते शौकत नवाज मीर यांच्या नेतृत्वाखाली 'जेएएसी'ने आयोजित केलेला बंद २९ सप्टेंबर रोजी सुरू झाला. त्यामुळे व्याप्त काश्मीरमधील अनेक जिल्हे, ज्यांना स्थानिक पातळीवर आझाद जम्मू आणि काश्मीर (एजेएके) म्हणून ओळखले जाते, ते पूर्णपणे ठप्प झाले. सरकारने तिथे २८ सप्टेंबरपासून संपूर्ण संप्रेषण ब्लॅकआऊट लागू केले आहे, रहिवाशांचे मोबाईल टेलिकम्युनिकेशन आणि इंटरनेट कनेक्शन खंडित केले आहे. मुझफ्फराबादमधील गजबजलेल्या बाजारपेठा बंद आहेत, तर रस्त्यावर विक्रेतेही नाहीत. सार्वजनिक वाहतूक ठप्प आहे. या गोंधळामुळे प्रदेशातील सुमारे ४० लाख रहिवासी अनिश्चिततेच्या स्थितीत बुडाले आहेत. सरकारने एका निवेदनात म्हटले आहे की, अधिकारी सुव्यवस्था पुनर्संचयित करण्यासाठी काम करत आहेत आणि जनतेला विशिष्ट अजेंडा घेऊन 'सोशल मीडिया'वर पसरवल्या जाणाऱ्या प्रचार आणि खोट्या बातम्यांनी प्रभावित होऊ नये, असे आवाहन केले आहे. गेल्या दोन वर्षांमधील या भागात हे तिसरे मोठे आंदोलन आहे. सरकारने समितीच्या ३८ सूत्री मागण्या मान्य न केल्यामुळे हे आंदोलन सुरू झाले. व्याप्त काश्मीरमधील स्थानिक सरकार आणि आंदोलकांमध्ये गेल्या दोन वर्षांपासून सुरू झालेला संघर्ष थांबायला तयार नाही. या संघर्षामागचे कारण जाणून घेतले पाहिजे. काश्मीर खोरे हा एक सुंदर; पण वादग्रस्त हिमालयीन प्रदेश आहे. १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यापासून पाकिस्तान आणि भारतात अनेक युद्धे झाली आहेत. चीनचेदेखील या प्रदेशाच्या उत्तरेकडील दोन भागांवर नियंत्रण आहे. भारताने व्याप्त काश्मीर परत घेण्याची भाषा वारंवार वापरली आहे. चीन पाकिस्तानचा मित्र असला, तरी पाकिस्तान चीनने व्यापलेल्या भागांशिवाय संपूर्ण काश्मीरवर दावा करतो. २०१७ च्या जनगणनेनुसार व्याप्त काश्मीरची लोकसंख्या ४० लाखांहून अधिक आहे. व्याप्त काश्मीरला पंतप्रधान आणि विधानसभेला अर्ध-स्वायत्तता आहे. सध्याच्या अशांततेचे मूळ मे २०२३ मध्ये आहे. या भागातील नागरिक गगनाला भिडणाऱ्या



वीज बिलांचा निषेध करण्यासाठी प्रथमच रस्त्यावर उतरले होते. पिठाची प्रचंड तस्करी आणि अनुदानित गव्हाच्या पुरवठ्यात तीव्र कमतरता असल्याच्या तक्रारी होत्या. ऑगस्ट २०२३ पर्यंत या वेगळ्या तक्रारींचे रूपांतर संघटित प्रतिकारात झाले. त्या वर्षी सप्टेंबरमध्ये शेकडो कार्यकर्ते मुझफ्फराबादमध्ये जमले आणि त्यांनी औपचारिकपणे 'जेएएसी'ची स्थापना केली.

मे २०२४ मध्ये निदर्शकांनी मुझफ्फराबादकडे 'लाँग मार्च' सुरू केला, तेव्हा या आंदोलनाची पहिली मोठी तीव्रता दिसून आली. आंदोलनाला हिंसक वळण लागले. त्यात एका पोलिस अधिकाऱ्यासह किमान पाच जणांचा मृत्यू झाला. पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी पिठाच्या किमती आणि वीजदरात कपात यासारख्या प्रमुख मागण्या मान्य केल्या, तेव्हाच हिंसक निदर्शने थांबली. पीठ परवडणाऱ्या दरात मिळावे आणि वीजदरात कपात करावी, यासाठी सरकारने अब्जावधी रुपयांचे अनुदान वाटप केले. तथापि, ही शांतता फार काळ टिकली नाही. त्याच वर्षी ऑगस्टमध्ये 'जेएएसी'ने आणखी एक टाळेबंदी लागू करण्याची घोषणा केली. 'जेएएसी'ने सादर केलेल्या मागण्यांमध्ये ३८ विशिष्ट मुद्दे समाविष्ट आहेत. या मागण्यांमध्ये मोफत शिक्षण आणि आरोग्य सेवा प्रदान करणे, मोठे पायाभूत सुविधा प्रकल्प सुरू करणे आणि प्रांतीय कायदेमंडळाची रचना बदलणे यांचा समावेश आहे. या यादीच्या वरच्या भागात सत्ताधारी वर्गाचे विशेषाधिकार संपवण्याची मागणी करण्यात आली आहे. ही मागणी मागील तक्रारींमध्येदेखील अधोरेखित करण्यात आली होती. 'जेएएसी' ने म्हटले आहे की, मे २०२४ च्या निषेधानंतर सरकारने वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या विशेषाधिकारांचा आढावा घेण्यासाठी न्यायिक आयोगाची स्थापना मान्य केली.

'जेएएसी'च्या यादीत पहिल्यांदाच समाविष्ट केलेली दुसरी प्रमुख मागणी स्वायत्त प्रदेशाच्या विधानसभेत निर्वासितांसाठी राखीव असलेल्या बारा जागा रद्द करण्याशी संबंधित आहे. 'जेएएसी'च्या मते १९४७ च्या फाळणीनंतर भारताच्या काश्मीरमधून गेलेल्या निर्वासितांनी आणि त्यांच्या वंशजांनी आता एक शक्तिशाली राजकीय गट तयार केला आहे. त्यांनी विकासनिधीची मक्तेदारी केली आहे. २०२३ आणि २०२४ च्या निषेधादरम्यान कार्यकर्त्यांवर दाखल केलेले कायदेशीर खटले मागे घेण्याची मागणीदेखील या सनदेत करण्यात आली आहे. मागण्यांमध्ये करसवलती आणि चांगल्या रोजगाराच्या संधींचा समावेश आहे. पायाभूत सुविधांचा विकास हा 'जेएएसी'च्या दृष्टिकोनाचा एक प्रमुख केंद्रबिंदू आहे. आंतरराष्ट्रीय विमानतळाव्यतिरिक्त समितीने बोगदे आणि पूल यासह नवीन प्रकल्पांची मागणी केली आहे, जे पर्वतीय प्रदेशाला उर्वरित पाकिस्तानशी जोडतील. मुझफ्फराबादमध्ये सध्या एक विमानतळ आहे; परंतु ते वर्षानुवर्षे बंद आहे. तथापि, या वर्षी एप्रिलमध्ये पंतप्रधान शरीफ यांनी या प्रकल्पाचे पुनरुज्जीवन करण्यासाठी एक समिती स्थापन केली.

ज्याअर्थी यातील अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ व ३ यांचे वडील अब्बास अब्दुलगनी मोरवे हे दि. ०१/०१/२०२५ रोजी माढेकर हॉस्पीटल, बार्शी, ता. बार्शी येथे मयत झाले असून, अर्जदार क्र. १ ते ३ हे मयत अब्बास अब्दुलगनी मोरवे यांचे कायदेशीर वारस आहेत. अब्बास अब्दुलगनी मोरवे हे मृत्युसमयी वाहक म्हणून राज्य परिवहन महामंडळ, बार्शी आगार, बार्शी, जि. सोलापूर येथे वाहक क्र. ८५३८३ म्हणुन कायमस्वरुपी नोकरीस होते. त्यांचे मृत्युपश्चात शासनाकडुन उपदान/पुरवणी उपदान, भविष्य निर्वाह निधी (पेंशन), शिल्लक रजा, मृत्यु फंड याची रक्कम देय होती व आहे. सदर रक्कम मिळणेकरीता, अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जाबाबत कोणाची कसलीही हरकत, तक्रार असल्यास त्यांनी सदर प्रकरणात प्रसिध्दीपासून ३० दिवसाच्या आत किंवा पुढील नेमलेल्या ११/११//२०२५ या तारखेस न्यायालयात हजर राहुन कागदपत्रांसह लेखी हरकत नोंदवावी. अन्यथा, कोणाची कसलीही हरकत नाही, असे समजुन सदर प्रकरणी न्यायालय पुढील योग्य ते निर्णय पारीत करतील.

हे जाहीर प्रसिध्दीकरण दिले असे. दि. १०/०७/२०२५.

सही/-
**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, बार्शी**

कोर्टाचा शिक्का

सही/-
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, बार्शी**

## सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

**पत्ता- इंद्रभुवन, पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद पथ, रेल्वेलाईन्स, सोलापूर ४१३००१**
**मंडई विभाग**

### जाहिर लिलाव

सोलापूर शहरातील लक्ष्मी मार्केट येथे उपलब्ध अत्तलेल्या मनपा मालकीचे दोन खुल्या जागेचे पार्किंग (पे ॲण्ड पार्क) करिता भाडे तत्वावर चालविणे या कामाचे सवित्तर माहिती (शर्ती व अटीसह) दि. १४/१०/२०२५ पानून मनपाचे अधिकृत संकेतस्थळ .. या संकेतस्थळावर पाहण्यास उपलब्ध आहे. तसेच याबाबतची अधिक माहिती करिता सोलापूर महानगरपालिके कडील मंडई विभाग/कार्यालयकडे संपर्क साधावा.

**संपर्क :** १) मल्लिनाथ तोडकर (मंडई अधीक्षक) - ९८६०००२०१०
२) चेतन प्रचंडे (कनिष्ठ अभियंता) ९६६५३२८७०४/७०२०३०२९१२

सही/-
**(तपन डंके)**
**नियंत्रण अधिकारी-१**
**मंडई विभाग**
**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**

## सभेची नोटीस

दि. १०/१०/२०२५

बार्शी बृ विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. बार्शी बृ. ता. बार्शी जि. सोलापूर या सहकारी संस्थेच्या सभासदांना सुचित करण्यात येते की, आपल्या सहकारी संस्थेच्या संचालक मंडळामध्ये सर्वसाधारण या मतदार संघातील रिक्त झालेल्या एक जागा भरण्यासाठी अध्यासी अधिकारी म्हणून सौ. एस. के. मुंढे सहकारी अधिकारी श्रेणी -२ अधिन सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, बार्शी यांचे अध्यक्षतेखाली दिनांक : १७/१०/२०२५ रोजी सकाळी ठिक ११.३० वाजता संस्थेच्या कार्यालयात संचालक मंडळाची सभा आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सर्व संचालकांना संचालक मंडळाच्या सभेस हजर राहण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे.

सही/-
**(सौ. एस. के. मुंढे)**
**अध्यासी अधिकारी तथा सहकारी श्रेणी-२ अधिन सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, बार्शी**

सही/-
**सचिव**
**बार्शी बृ विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर**

# पंढरपूर पोलिसांची अवैध वाळू विरुद्ध कारवाई; सहा जणांवर गुन्हा

## जेसीबी, हायवा आणि तीन ट्रॅक्टरसह सुमारे एक कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.१३ ऑक्टोबर -**

येथील तालुका पोलिसांनी सोमवारी पहाटे अवैध वाळू उपसा होत असलेल्या तालुका पोलिस ठाण्याच्या हद्दीतील चिंचोलीभोसे येथे अचानक धाड टाकून कारवाई केली. या कारवाई मध्ये जेसीबी, हायवा ट्रक आणि तीन ट्रॅक्टर असा सुमारे एक कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करुन सहा जणांवर कारवाईचा बडगा उगारण्यात आल्याची माहिती येथील तालुका पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक टी.वाय. मुजावर यांनी दिली.

या कारवाई संदर्भातील तालुका पोलिसांकडून मिळालेली सविस्तर माहिती अशी की, पंढरपूर तालुका पोलिसांनी



तालुका पोलीस ठाणेच्या हद्दीतील मौजे चिंचोली भोसे या भागात अवैध वाळूचा उपसा होत आहे अशा माहितीवरून या गावांमध्ये सोमवारी (दि.१३) सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास धडक कारवाई केली.

या कारवाई मध्ये वैध वाळू उपसा करण्यासाठी वापरण्यात येणारे जेसीबी त्याचप्रमाणे अवैध वाळू भरलेले हायवा ट्रक, तीन ट्रॅक्टर आणि एक जेसीबी अशी एकुण पाच वाहने व एकूण पंधरा ब्रास वाळू असा सुमारे एक कोटी रुपयांचा मुद्देमाल पंढरपूर तालुका पोलिसांनी जप्त केला. या बरोबरच या कारवाई वेळी धनाजी गंगाधर दगडे (वय ३६वर्ष रा.गुरसाळे ), विजय उर्फ राजू शंकर आढागळे (रा.गार्डी ), उमेश बाबुराव बोबडे ( रा.गुरसाळे ), गणेश बापू सोनवणे (रा.चिंचोली ),शंकर नवनाथ नवगिरे (रा.चिंचोली ) आणि किशोर शिवदास आवटे (रा. चिंचोलीभोसे) असे एकूण सहा संशयीत आरोपी विरुद्ध बीएनएस कलम ३०३, बीएनएस कलम ३०५ बीएनएस कलम ३,५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

या वाळू तस्करीच्या गुन्ह्यातील या सर्व आरोपींच्या विरोधात त्यांच्या पूर्वीच्या गुन्ह्याचा अभिलेख अवलोकन करून त्यांच्यावर कठोर अशी प्रतिबंधात्मक कारवाई करण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे. दरम्यान ही कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, पंढरपूर विभागाचे सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी.वाय. मुजावर, पोलीस उपनिरीक्षक भारत भोसले,पोलीस उपनिरीक्षक विक्रम वडणे,सहाय्यक फौजदार आबा शेंडगे, पोलीस हवालदार घंटे, पोलीस हवालदार सय्यद,पोलीस कॉन्स्टेबल बालाजी कदम, पोलीस कॉन्स्टेबल गुटल,पोलीस चालक नदाफ आणि घाडगे यांच्या पथकाने केल्याची माहिती तालुका पोलिसांकडून देण्यात आली.

## महत्वाचे...




### आपत्तीपूर्व सूचनांचे पालन केल्यास होणारे गंभीर धोके कमी करू शकतो : ढोले

**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर-**

आपत्ती येण्यापूर्वी शासनाच्या वतीने विविध प्रसार माध्यमांच्या द्वारे आपत्ती येणाऱ्या भागात आपत्तीपूर्व सूचना दिल्या जातात. या सूचना देण्यासाठी शासनाच्या वतीने वेगवेगळ्या वेबसाईट बनविण्यात आले आहेत. या सूचनांचे तंतोतंत पालन केल्यास आपत्ती व्यवस्थापनात होणारे गंभीर धोके कमी करू शकतो, असे प्रतिपादन सोलापूर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणचे अधिकारी शक्तिसागर ढोले यांनी केले. ते फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया संचलित स्प्रिंट ४ ह्युम्यॅनिटेरियन प्रकल्प अंतर्गत सोलापूर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण व इंडियन रेड क्रॉस सोसायटी शाखा सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने इंटरनॅशनल रिस्क रिडक्शन डे फॉर डिझास्टर या दिनाचे औचित्य साधून आपत्ती व्यवस्थापनात काम करणाऱ्या विविध सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधींच्या आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेचे मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर हे होते. यावेळी व्यासपीठावर चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी तेली, इंडियन रेडक्रॉस सोसायटीचे चेअरमन डॉ. राजीव प्रधान, लायन्स क्लब ऑफ सोलापूर सेंट्रलचे सचिव दीनानाथ धुळम, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, अमरजा थिठे, डॉ. कविता चंडक आदी उपस्थित होते. प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी अध्यक्ष समारोप करताना म्हणाले की, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेच्या व सोलापूर हाय फ्लायर्स राऊंड टेबल ३०९ व इतर सामाजिक संस्थांच्या संयुक्त विद्यमाने दक्षिण सोलापूर तालुक्यातील दि. १४ ऑक्टोबर रोजी होनमुर्गी, १५ ऑक्टोबर रोजी सिंदखेड, १६ ऑक्टोबर रोजी हत्तूर व १७ ऑक्टोबर रोजी वडकबाळ या गावी प्रजनन आरोग्य व कुटुंब कल्याण शिबीर व जीवनावश्यक वस्तूंचे वाटप कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. पोवाडा कार रमेश खडे यांनी आपत्ती व्यवस्थापना वरील पोवाडा म्हणून सर्वांशी म्हणजे जिंकली. कार्यक्रमाचे स्वागत आशालता मस्के यांनी केले. प्रास्ताविक सुगतरत्न गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन वीरेंद्र परदेशी यांनी केले तर आभार प्रा. डॉ. एन. बी. तेली यांनी मानले.



### वाशीतील वंचितच्या मेळाव्यात मांडली अक्कलकोटची समस्या

**अक्कलकोट, दि.१३ ऑक्टोबर-**

नवी मुंबईतील वाशी येथील विष्णुदास भावे सभागृहामध्ये वंचित बहुजन माथाडी कामगार आघाडीचा मेळावा झाला. यामध्ये अक्कलकोटचे तालुकाध्यक्ष सिद्धार्थ बनसोडे, अक्कलकोट युवक तालुका अध्यक्ष वंचित बहुजन आघाडी शीला मणी दादा, प्रशांत मडीखांबे उपस्थित होते. वंचितच्या माध्यमातून तालुक्यातील कामगारांना काम मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याचे यावेळी ठरवण्यात आले. राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर, सरचिटणीस सुरेश मोहिते व संघटक सुनील लोखंडे यांची भेट घऊन याबाबत चर्चा करताना तालुकाध्यक्ष बनसोडे यांनी तालुक्यातील व्यथा मांडली. समस्या जाणून घेत वरिष्ठांनी याबाबत उपाय करण्याचे आश्वासन दिले.



### अक्कलकोट तालुका म्युन्सिपल को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या सभासदांना ११% लाभांश

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १३ ऑक्टोंबर-**

तालुका म्युन्सिपल को ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीतर्फे सर्व सभासदांना संस्थेच्या नफ्यातून ११ टक्के लाभांश वाटप करण्यात आले . म्युन्सिपल क्रेडिट सोसायटीच्या कार्यालयात सदरचा कार्यक्रम घेण्यात आला.

अक्कलकोट तालुका म्युन्सिपल क्रेडिट सोसायटी ही गेल्या ६७ वर्षापासून कार्यरत आहे. याप्रसंगी सोसायटीचे अध्यक्ष अमित बनसोडे, सचिव नागेश कुरणे, संचालक मुकेश बनसोडे, नुरदीनपाशा खलिफा, बालाजी पारखे, संचालिका अनिता डांगे, हसीना बागवान आदींसह सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संस्थेने सर्व सभासदांना लाभांश वाटप केल्याने आनंद व्यक्त करण्यात आला .याप्रसंगी अध्यक्ष अमित बनसोडे यांनी अक्कलकोट तालुका म्युन्सिपल क्रेडिट सोसायटीच्या माध्यमातून सर्व कामगार सभासदांचे हित जोपासले जाईल असे यावेळी सांगितले.

# रतनचंद शहा बँकेचे चेअरमन; मॅनेजर, शाखा व्यवस्थापकाविरुध्द गुन्हा दाखल

### ४० लाखांचे कर्ज परस्पर उचलून परतफेड केली नाही; कर्जाची रक्कम गेली ३ कोटी ९० लाखांवर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर -**

कुरणवाडी (ता. मोहोळ) येथील दोन शेतकऱ्यांच्या नावावर ४० लाखांचे कर्ज मंजूर करून ते कर्जदारांना न देता बँकेचे चेअरमन, मॅनेजर व शाखा व्यवस्थापकाने कर्जाची रक्कम उचलली. त्याची परतफेड न केल्यामुळे कर्जाची रक्कम ३ कोटी ८९ लाख ३१ हजार ५८ रुपयांवर गेली. हा कर्जाचा डोंगर पाहून कर्जदार शेतकरी मरण पावला. याप्रकरणी रतनचंद शहा बँकेचे चेअरमन, मॅनेजर व शाखा व्यवस्थापकाविरुध्द मोहोळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत प्रसाद विलास पवार (वय ३०, रा. कुरणवाडी, ता. मोहोळ) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन रतनचंद शहा सहकारी बँकेचे चेअरमन राहुल शहा (वय ५०), जनरल मॅनेजर अरविंद नाझरकर (वय ५२), शाखा व्यवस्थापक अंबादास बेंद्रे (वय ४९) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सन २०१३ मध्ये रतनचंद शहा सहकारी बँकेचे चेअरमन राहुल शहा, जनरल मॅनेजर अरविंद नाझरकर, शाखा व्यवस्थापक अंबादास बेंद्रे यांनी प्रमोद पवार यांचे वडील विलास दिनकर पवार व दाजी सिध्देश्वर विष्णु गायकवाड यांचा विश्वास संपादन करून विलास पवार यांच्या नावे २० लाख रुपये व दाजी सिध्देश्वर गायकवाड यांच्या नावे २० लाख रुपयांचे कर्ज प्रकरण मंजूर केले. पवार व गायकवाड यांच्या कोऱ्या स्लीपवर सह्या घेऊन मंजूर झालेल्या कर्जाची संपूर्ण रक्कम राहुल शहा, नाझरकर, बेंद्रे यांनी काढून घेतली. त्यानंतर पवार यांनी कर्ज रक्कम भरण्याबाबत वारंवार कळवूनदेखील कर्ज रक्कम व व्याज भरले नाही. ४ जानेवारी २०१३ ते २८ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत रक्कम न भरल्यामुळे विलास पवार यांचे कर्ज प्रकरणाची रक्कम ही १ कोटी ९३ लाख ६५ हजार २५२ रुपयांवर गेली तर सिध्देश्वर गायकवाड यांची रक्कम १ कोटी ९५ लाख ६५ हजार ८०६ रुपयांवर गेली. शहा व त्यांच्या बँकेतील अधिकाऱ्यांनी कटकारस्थानाने ३ कोटी ८९ लाख ३१ हजार ५८ रुपयांचा अपहार केला. कर्जाच्या तणावातून विलास पवार हे मयत झाले. याबाबत मोहोळ पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक पुढील तपास करीत आहेत.

### ६ नोव्हेंबरपर्यंत पदवीधर, शिक्षक मतदार नोंदणी कार्यक्रम

**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर-**

पुणे विभाग पदवीधर आणि शिक्षक मतदार संघासाठी उत्तर सोलापूर तालुक्यामध्ये मतदार नोंदणीला प्रारंभ झाला आहे. मतदार नोंदणीची शेवटची तारीख ६ नोव्हेंबर आहे. या तारखेपूर्वी दोन्ही मतदार संघाकरिता पात्र व्यक्तींनी अर्ज करावेत, असे आवाहन पदनिर्देशित अधिकारी सदाशिव पडदुणे यांनी केले आहे. भारत निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार पुणे विभागाच्या पदवीधर व शिक्षक मतदार संध्याच्या निवडणूकांकरिता १ नोव्हेंबर या अर्हता दिनांकावर आधारित नवीन मतदार याद्या तयार करण्याचा कार्यक्रम जाहीर करण्यात आलेला आहे. उत्तर सोलापूर तालुक्यासाठी शहरात पदवीधर मतदार संघाकरिता २४ मतदान केंद्रे आणि शिक्षक मतदार संघाकरिता ५ मतदान केंद्रे तयार करण्यात आलेली आहेत. पदवीधर मतदार संघाकरिता फॉर्म नंबर १८ तर शिक्षक मतदार संघाकरिता फॉर्म १९ भरून द्यावयाचे आहे. नियुक्त करण्यांत आलेले पदनिर्देशित अधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्राचे वाटप करण्यात आले आहे.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार; एका वाहन चालकास अटक

**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा दि. १३ ऑक्टोंबर -**

एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलीस माझे तुझ्यावर खूप प्रेम असून तुझ्यासोबत लग्न करावयाचे आहे असे सांगून घराच्या पाठीमागे नेवून जबरदस्तीने वेळोवेळी शारीरिक अत्याचर केल्याप्रकरणी आबासाहेब जनार्धन अवघडे (वय २६,रा. जुनोनी) याच्या विरुध्द गुन्हा दाखल झाला असून पोलीसांनी त्याला तात्काळ अटक केली आहे.

पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील अल्पवयीन मुलगी मजुरीचे काम करते. आरोपी हा टेम्पो चालक असून तो परिसरातील महिलांना द्राक्ष बागेत, खुरपणी करणे, कामास कासेगाव शिवारात घेवून जात असे. यावेळी या महिला सोबत पिडीताही टेम्पोमध्ये बसून कामाला जात असे. त्यामुळे आरोपीची व पिडीतेची चांगली ओळख झाली होती. सहा महिन्यापर्यंत पिडीताही त्या टेम्पोतून प्रवास करत असल्यामुळे आरोपीने तिच्याशी मैत्री करुन जवळीकता निर्माण केली होती. दि.१० मे २०२५ रोजी सकाळी ८.३० वाजता कामासाठी कासेगावला जाताना पिडीताही आरोपीच्या शेजारी पुढील बाजूस बसली व इतर महिला सर्व पाठीमागे बसल्या होत्या. यावेळी पिडीतेने मी उद्या येणार नाही,लक्ष्मी दहिवडीची यात्रा असल्याने यात्रेला जाणार आहे असे म्हणाल्यावर आरोपीने पिडीतेला तू सोडून जावू नको? तू मला खूप आवडते, मी तुझ्यावर प्रेम करतोय असे म्हणाल्यावर यावर पिडीतेने काहीच उत्तर दिले नाही. त्या दिवशी आरोपीने पिडीतेला दोन हजार रुपये खर्चाकरिता दिले व तुला महत्वाचे बोलावयाचे आहे असे सांगून एक मोबाईल सीमकार्ड घेवून दिले. तसेच एक जुना मोबाईल पिडीतेकडे होता. या मोबाईलमध्ये सीमकार्ड टाकल्यावर आरोपी हा पिडीतेसोबत कॉल करुन बोलत होता. चार महिन्यापुर्वी रात्री ११ वाजता घरातील सर्वजण झोपल्यावर आरोपीने कॉल करुन पिडीतेस तुला भेटावयाचे आहे असे सांगून घराच्या पाठीमागे असलेल्या एका शेतात भेटायला बोलवले.

त्यावेळी पिडीता तेथे गेली असता बांधाच्या आडोशाला जवळीक करु लागला. त्यावेळी पिडीता म्हणाली,लग्न केल्यानंतर संबंध कर असे म्हणत असतानाही आरोपीने काहीही न ऐकता पिडीतेवर जबरदस्तीने शारीरिक संबंध वारंवार केले असल्याचे पिडीतेने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक विनोद लातुरकर हे करीत आहेत.


### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

सोलापूर येथील तमाम लोकांना जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की,

**मिळकतीचे वर्णन :-** डिस्टीक्ट व सब डिस्ट्रीक्ट सोलापूर तालुका दक्षिण सोलापूर पैकी मौजे होटगी ग्रामपंचायत हद्दीतील गट नं. ५३३/१/ब/१ यापैकी व्यंकटेश नगर मधील प्लॉट नं. ७ क्षेत्र ४.८० चौ.मी. व प्लॉट नं. २३ याचे क्षेत्र ३.२० चौ. मी. इतकी आहे. प्लॉट नं. ७ यांसी चतुः सिमा पुर्वेस - प्लॉट नं. ८, दक्षिणेस- रस्ता, पश्चिमेस - रस्ता, उत्तरेसः प्लॉट नं. २३. व प्लॉट नं. २३ यांसी चतुःसिमा पुर्वेस- प्लॉट नं. २२, दक्षिणेस - प्लॉट नं. ७, पश्चिमेस- रस्ता, उत्तरेस -रस्ता.

वर नमूद दोन्ही प्लॉट जागा अब्दुलहाफीज महमद इस्माईल दंडोती यांच्या मालकी व कब्जे वहिवाटीची आहे. त्यांनी संदर वर नमूद मिळकत आमचे अशिलांना विक्री करण्याचे ठरवून, आमचे अशिलांकडून रक्कम स्विकारुन कब्जा पावती व करारपत्राचा दस्त आमचे अशिलांचे नांवे लिहून दिला आहे.

वर नमूद दोन्ही प्लॉट जागा मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहे, अशी मिळकत मालकांनी आमचे अशिलांना खात्री व भरवसा दिले आहे. तरी परंतु वरील मिळकतीबाबत कोणाचा गहाण, दान, लिज, टाच, बक्षीस पत्र, साठेखत, खरेदीखत, कुलमुखत्यारपत्र, नोटरी करार-मदार, इसारा पावती, कब्जा साठेखत, पोटगी, कोर्ट केस, बँक कर्ज बोजा, तसेच सहकारी संस्था वगैरे कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसाचे आत लेखी कागदपत्राचे पुराव्यानिशी खालील नमुद पत्त्यावर येवून आमचे अशिलाची खात्री करुन द्यावी.

मुदतीत कुणाचीही तक्रार व हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहे असे समजून खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मग तद्नंतर सदर वर नमुद मिळकतीबाबत व मालकीबाबत कुणाचीही कसल्याही प्रकारची हरकत व तक्रार चालणार नाही. याची नोंद घ्यावी.

ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस दिली असे. ता. १३/१०/२०२५.

सही/-
अशिल

सही/-
ॲड. देविदास नारायण कोडम
बी. कॉम. एलएल. बी. ॲडव्होकेट
१०२ सी ६१ भवानी पेठ, सोलापूर.
मो.नं. ९८६०२०५११२
अशिलातर्फे ॲडव्होकेट



## IDFC FIRST Bank Limited

(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792
Registered Office: - KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

IDFC FIRST Bank

**वित्तीय मालमत्तेचे सुरक्षा आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज अंमलबजावणी कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वी कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांचे कर्ज एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) यांना त्यांच्याकडून देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून लागू होणाऱ्या कराराच्या दरानुसार आकारले जातील.

| अ. क्र. | कर्ज खाते क्रमांक | कर्जाचे प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना तारीख | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 133583139 | मालमत्तेवर कर्ज | १. मल्हारी कृष्णा पाटील<br>२. मंगल मल्हारी पाटील | 30/09/2025 | रुपये 7,07,815.62/- |

**मालमत्तेचा पत्ता** : मिलकट क्रमांक १०५३ येथे नोंदणीकृत निवासी घर बेअरिंगचा तो सर्व तुकडा आणि पार्सल, दगड, विटा आणि काँक्रीटने बांधलेले घर, तळमजला क्षेत्रफळ ५०० चौरस फूट, एकूण बांधलेले क्षेत्रफळ ५०० चौरस फूट, सोनके गावात स्थित, तालुका: पंढरपूर, जिल्हा: सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०४, आणि सीमा: पूर्व: समाधान मस्के पश्चिम: दत्तात्रय पाटील उत्तर: रामचंद्र पाटील दक्षिण: रस्ता

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

दिनांक : १४/१०/२०२५
ठिकाण : सोलापूर, महाराष्ट्र

सही/- अधिकृत अधिकारी
आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड
(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झाली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते)



## IDFC FIRST Bank Limited

(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792
Registered Office: - KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

IDFC FIRST Bank

**वित्तीय मालमत्तेचे सुरक्षा आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज अंमलबजावणी कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वी कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांचे कर्ज एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) यांना त्यांच्याकडून देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून लागू होणाऱ्या कराराच्या दरानुसार आकारले जातील.

| अ. क्र. | कर्ज खाते क्रमांक | कर्जाचे प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना तारीख | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 85755605 | मालमत्तेवर कर्ज | १. देविदास हनुमंत सरगर<br>२. संगिता देविदास सरगर | 30/09/2025 | रुपये 6,68,151.68/- |

**मालमत्तेचा पत्ता** : सर्व निवासी मालमत्तेचा तुकडा आणि पार्सल, सर्वे क्रमांक ९२/१/अ/१/ब/२, क्षेत्र १ एच १५.१४ आर, करनिर्धारण १ रु ७२ प, देवीदास हनुमंत सरगर क्षेत्र ० एच ०२ आर, करनिर्धारण ० रु ०३ प, यशवंतनगर येथे स्थित, यशवंतनगर ग्रामपंचायतीच्या स्थानिक हद्दीत, तालुका माळशिरस, जिल्हा सोलापूर, महाराष्ट्र-४१३१०१, आणि पूर्वेकडे: सामीक रोड दक्षिणेकडे: सर्वे क्रमांक ९२/१/अ/१/ब/२पश्चिमेकडे: सर्वे क्रमांक ९२/१/अ/१/ब/२ उत्तर: सर्वे क्रमांक ९२/१/अ/१/ब/२

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

दिनांक : १४/१०/२०२५
ठिकाण : सोलापूर, महाराष्ट्र

सही/- अधिकृत अधिकारी
आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड
(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झाली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते)



ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे
बी.ए.एलएल.बी.ॲडव्होकेट, कुर्डूवाडी
ता. माढा जि. सोलापूर

### जाहीर नोटीस

नि.नं. ७

**टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायालयात**

सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लिमीटेड पंढरपूर जि. सोलापूर -- अर्जदार/वादी
विरुध्द
धनाजी विठ्ठल सोलंकर वगैरे ५ -- जाबदार/प्रतिवादी

| अ. क्र. | लवाद अर्ज नंबर | प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | २४/२०२५ | १) धनाजी विठ्ठल सोलंकर, वय-५२, धंदा-कापड दुकान, रा.आनंद नगर, मळद बारामती ग्रामीण ता. बारामती जि.पुणे | ३००९०२ | १४/११/२०२५ |
| २ | २४/२०२५ | २) विठ्ठल शंकर सोलंकर, वय ६५, धंदा-शेतो, रा. पोंधवडी, मदनवाडी ता. इंदापूर जि.पुणे | ३००९०२ | १४/११/२०२५ |
| ३ | २४/२०२५ | ३) नितीन पंढरीनाथ कांबळे, वय-४२, धंदा-शेती, रा. भाटनिमगांव ता. इंदापूर जि. पुणे | ३००९०२ | १४/११/२०२५ |
| ४ | २४/२०२५ | ४) योगेश शंकर ठावरे, वय-३४, धंदा-शेतो, रा. सातपुते वस्ती, इंदापूर ता. इंदापूर जि. पुणे | ३००९०२ | १४/११/२०२५ |
| ५ | २४/२०२५ | ५) रुपेश दिनानाथ साळुंके, वय-४२, धंदा-शेती, रा. तरंगवाडी ता. इंदापूर जि.पुणे | ३००९०२ | १४/११/२०२५ |

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. १ ते ५ यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस प्रवादी नं. ५ ची नोटीस अपूर्ण पत्ता व प्रतिवादी नं. १ ते ४ चे नोटीसीचा रिपोर्ट आला नाही या कारणाने परत आल्याने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी वार शुक्रवार रोजी दिनांक १४/११/२०२५ सकाळी ११.०० वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे. सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार/प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक १०/१०/२०२५ रोजीचे मा. लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

सही/-
लवाद अधिकारी
सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., पंढरपूर

ठिकाण :- सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. पंढरपूर, कार्यालय प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर



ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे
बी.ए.एलएल.बी.ॲडव्होकेट, कुर्डूवाडी
ता. माढा जि. सोलापूर

### जाहीर नोटीस

नि.नं. ७

**टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायालयात**

सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लिमीटेड पंढरपूर जि. सोलापूर -- अर्जदार/वादी
विरुध्द
अझरुद्दीन राजू शेख वगैरे ४ -- जाबदार/प्रतिवादी

| अ. क्र. | लवाद अर्ज नंबर | प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | २६/२०२५ | १) अझरुद्दीन राजू शेख, वय-३१, धंदा-मटण शॉप, रा. निमगांव केतकी, इंदापूर ता. इंदापूर जि.पुणे | ३८९८७१ | १४/११/२०२५ |
| २ | २६/२०२५ | २) अबिदा राजू शेख, वय-५०, धंदा-मटण शॉप, रा.निमगांव केतकी, इंदापूर ता. इंदापूर जि. पुणे | ३८९८७१ | १४/११/२०२५ |
| ३ | २६/२०२५ | ३) आकाश कांतीलाल शिंदे वय-३२, धंदा-हॉटेल, रा.निमगांव केतकी, इंदापूर ता. इंदापूर जि. पुणे | ३८९८७१ | १४/११/२०२५ |
| ५ | २६/२०२५ | ४) अमोल भिमराव जाधव, वय-३६, धंदा-हॉटेल, रा. निमगांव केतकी, इंदापूर ता. इंदापूर जि. पुणे | ३८९८७१ | १४/११/२०२५ |

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. १ ते ४ यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस प्रवादी नं. १ ते ३ ची नोटीस सुचना दिली घर बंद कारणाने व प्रवादी नं. ४ ची नोटीस घर बंद स्वीकारण्यास नकार या कारणाने परत आल्याने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी वार शुक्रवार रोजी दिनांक १४/११/२०२५ सकाळी ११.०० वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार/प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक १०/१०/२०२५ रोजीचे मा. लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

सही/-
लवाद अधिकारी
सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., पंढरपूर

ठिकाण :- सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. पंढरपूर, कार्यालय प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर



नरेंद्र पवार



श्रीकांत हरनाळे

# जिल्हा क्रीडाधिकारी नरेंद्र पवार यांची बदली

## भूम तालुका क्रीडाधिकारी श्रीकांत हरनाळे यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर-**

सोलापूरचे जिल्हा क्रीडाधिकारी नरेंद्र पवार यांची जालनाचे जिल्हा क्रीडाधिकारी म्हणून बदली झाली आहे.

त्यांच्या ठिकाणी भूम (जि. धाराशिव) येथील तालुका क्रीडाधिकारी श्रीकांत हरनाळे यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे. हरनाळे यांच्याकडे याअगोदरच धाराशिव जिल्हा क्रीडाधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविला आहे. आता परत सोलापूरचा जिल्हा क्रीडाधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविला आहे.

धाराशिव व सोलापूर अशा दोन जिल्ह्याचा जिल्हा क्रीडाधिकारी पदाचा आतिरिक्त कार्यभार सोपविल्यामुळे त्यांची कसरत होणार आहे.

# प्रा.डॉ. आडसुळ यांना राष्ट्रीय जीवन गौरव पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ ऑक्टोबर-**



येथील श्री तुळजाभवानी बहुउद्देशीय समाजसेवी संस्था सदस्य प्रा डॉ बापूसाहेब आडसुळ यांना भारत सरकार यांचे वतीने राष्ट्रीय जीवन गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. प्रा. डॉ. आडसुळ यांनी गेली वीस वर्षे अनेक शैक्षणिक, सामाजिक कार्यामध्ये सक्रिय सहभाग घेऊन जिल्हा परिषद, पुणे उपसंचालक, मुंबई मंत्रालय येथे शिक्षक बांधवांना न्याय मिळवून दिला.

आतापर्यंत २००० शिक्षकांना पुरस्कार देऊन सन्मानित केले. या सर्व बाबींचा विचार करून त्यांना भारत सरकारच्यावतीने राष्ट्रीय जीवन गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला.

# वस्ती, रस्त्यांची जातीवाचक नावे बदलणार

**ग्रामविकास विभागाचा निर्णय**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर -**

ग्रामविकास विभागाने राज्याच्या ग्रामीण भागातील वस्त्यांची आणि रस्त्यांची जातीवाचक नावे बदलून नवीन नावे देण्याबाबतची कार्यपद्धती निश्चित केली आहे.

त्यानुसार संबंधित गावाला ग्रामसभेत तसा ठराव करून तो गटविकास अधिकाऱ्याला सादर करावा लागणार आहे. या प्रस्तावावर निर्णय घेण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. शहरी आणि ग्रामीण भागातील वस्त्यांची तसेच रस्त्यांची जातीवाचक नावे बदलून जातीवाचक नावाऐवजी महापुरुषांची, लोकशाही मूल्यांशी निगडित नावे देण्याचा शासन निर्णय सामाजिक न्याय विभागाने घेतला आहे. गावाचे नाव बदलण्याची कार्यवाही सामान्य प्रशासन विभागाकडून करण्यात येते. त्यामुळे ग्रामविकास विभागाने जातीवाचक नाव बदलून नवे नाव देण्याबाबतचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना असल्याचे गुरुवारी जारी केलेल्या शासन निर्णयात स्पष्ट केले आहे.

**कार्यपद्धती निश्चित...**

या पार्श्वभूमीवर ग्रामविकास विभागाने जातीवाचक नावे बदलण्यासाठी कार्यपद्धती ठरवली आहे. त्यानुसार एखाद्या वस्तीचे वा रस्त्याचे जातीवाचक नाव बदलायचे झाल्यास संबंधित गावाने ग्रामसभेत तसा ठराव करून त्याबाबतचा प्रस्ताव गटविकास अधिकाऱ्यांना सादर करावा. गट विकास अधिकारी यांनी प्रस्ताव तपासून तो जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना पाठवावा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी हा प्रस्ताव तपासून संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करावा आणि जिल्हाधिकाऱ्यांनी प्रस्तवाला मंजुरी द्यावी, असे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

# संगणकाच्या युगातही खतावणीची क्रेझ कायम

## ● वह्यांचा गठ्ठा आपल्या डोक्यावर घेऊन जाण्याची परंपरा आजही टिकून



**वह्यांचे प्रकार :** रोजमेळ, जमानावे, देशी खतावणी, इंग्लिश खतावणी, छापील खतावणी,कापडी कोयर बुक,पोणिया, मार्केट बुक, लेटर बुक, लक्ष्मी वही यांची किंमत कोयर नुसार ठरते. १ कोयर पासून मागणी प्रमाणे बनवून दिले जाते.

**जुन्या पारंपारिक वहयांचे प्रकार व साईझ :** ३पानी रोजमेळ व खतावणी, ४ पानी जांगड, एक्सरसाईझ उभा व आडवा टिपडा, २८३० रोज व खतावणी या वहयांना मागणीप्रमाणे गादीपुठ्ठा, पडमपुठ्ठा, खारवापुठ्ठयामध्ये बनविले जाते. यांचे दर दस्त्यावरून ठरते. या वह्यांना ६सळ, ८सळ, १० सळ असे पानावर सळ मारले जातात. पाव दस्त्या पासून ते मागणी नुसार बनवून दिले जाते.

**वह्या बांधणीचे प्रकार :** गादी पुठ्ठा व पडम पुठ्ठाचे वह्या डोकी शिलाई, मधी शिलाई, कुलकर्णी शिलाई, पंचकडी, कर्नाटकातील गदग बांधणीच्या वह्याही बांधणी केले जाते.

**तभा वृत्तसेवा । यशवंत गुरव**
**सोलापूर, दि.१३ ऑक्टोबर-**

हिंदू धर्मातील महत्वाच्या मानल्या जाणाऱ्या दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर सोलापूर शहरात खतावणी बनवण्याचे काम जोमाने सुरू आहे. कारागीर खतावणी, रोजमेळ बनवण्यात व्यस्त असल्याचे चित्र दिसून येत आहे. व्यापार असो अथवा संसार आज दररोजचा हिशोब ठेवावाच लागतो. त्याशिवाय आपला मेळ बसतच नाही. आज जरी संगणक युग असला तरी व्यापारी लोकांची ओढ रोजमेळ व खतावणीकडे कायम आहे. व्यापार कोणताही असो आपला रोजचा व्यवहारिक ताळमेळ व्यापारी रोजमेळमध्ये नोंद केल्यानंतरच समजतो. व्यापारी आपला व्यवहार डायरेक्ट संगणकावर करू शकत नाही. त्यासाठी आधी रोजमेळ लागतो. नंतर रोजमेळ वरून खतावणी वर त्याची नोंद होते. त्यामुळे आपला हिशोब लगेच सापडतो.

दरम्यान, अडत व्यापारी, किराणा भुसार व्यापारी,कापड दुकानं,सराफ व्यापारी व छोटे मोठे व्यापारी अशा वह्या वापरतात. श्रावण हा पवित्र महिना समजला जातो. म्हणून या कामाची सुरुवात श्रावण महिन्यापासून होतो.बाहेरगावचे व्यापारी आपली वह्यांची ऑर्डर श्रावण महिन्यात तर गावातील व्यापारी दसऱ्याच्या मुहूर्तावर ऑर्डर नोंदवतात व धनत्रयोदशीच्या मुहूर्तावर खरेदी करतात. व्यापारी वह्यांनाच आपली लक्ष्मी मानतात म्हणून धनत्रयोदशीच्या दिवशी धने, गूळ खाऊन खरेदी केलेले वह्यांचा गठ्ठा आपल्या डोक्यावर घेऊन जाण्याची परंपरा आजही टिकून आहे.



सोलापूर : शहरातील साडेतीनशे वर्षाच्या परंपरेची शिवलाल तेली समाजाच्या नवरात्र महोत्सवाची सांगता झाली. त्याप्रसंगी काढण्यात आल्यानंतर मधला मारुती परिसरात टिपलेले छायाचित्र.





सोलापूर : निलगार इस्टेट परिसरातील रस्त्यावरील हा खड्डा. दुसऱ्या छायाचित्रात अक्कलकोट रोड पाण्याच्या टाकीच्या जवळील रस्त्यावर धोकादायक खड्डा. (छाया : केवल तिवारी)

# खड्डेमय रस्त्यांकडे महापालिकचे दुर्लक्ष

सोलापूर : शहरातील विविध मुख्य आणि अंतर्गत रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य पसरले असून नागरिकांच्या दैनंदिन प्रवासाला धोका निर्माण झाला आहे. अनेक ठिकाणी खोल खड्डे निर्माण झाले असून अपघातांची शक्यता वाढली आहे. प्रशासनाकडून उपाययोजना न झाल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. रस्त्यांचे तातडीने दुरुस्तीचे काम हाती घेण्याची मागणी जोर धरत आहे.

# बोम्मारिल्लू सजवा अन् बक्षीसे मिळवा!

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ ऑक्टोबर-**



दिवाळीत तेलुगू संस्कृतीत बोम्मारिल्लू हा भातुकलीचा खेळ अविभाज्य घटक समजला जातो. यंदाच्या दिवाळीनिमित्त पद्मशाली सखी संघातर्फे बोम्मारिल्लू सजवा अन् बक्षीसे मिळवा या स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धेसाठी विविध आकर्षक बक्षीस ठेवण्यात आली आहेत.

प्रथम क्रमांक लेडीज घड्याळ, द्वितीय ट्रव्हल बॅग, तृतीय इस्त्री व उत्तेजनार्थ बक्षीसे आहेत. या स्पर्धेसाठी नियम पुढीलप्रमाणे आहेत. बोम्मारील्लूचे फोटो पाठवून त्यासोबत मोबाईल नंबरसह पत्ता पाठवणे आवश्यक आहे. परीक्षक फोटो पाहून किंवा गरज वाटल्यास प्रत्यक्षात भेट देतील. सजावटीसोबत सामाजिक संदेश द्यावे. परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील. फोटो ९०२१५५१४३१ या क्रमांकावर पाठवा. फोटो पाठवण्याची अंतिम तारीख शुक्रवार २४ ऑक्टोंबर असून ही स्पर्धा विनामूल्य आहे. ९०२१५५१४३१ या व्हाटसअ‍ॅप क्रमांकावर पाठवावेत, असे आवाहन फाउंडेशनचे संस्थापक गौरीशंकर कोंडा व सखी संघाच्या अध्यक्षा कल्याणी पेनगोंडा यांनी केले आहे.

# शिवदारे प्रतिष्ठानकडून पूरग्रस्तांना १००० किट वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ ऑक्टोबर-**



दक्षिण सोलापूर तालुक्यातील पूरग्रस्तांच्या आयुष्यातील अंधकार दूर करून त्यांच्या जीवनात पुन्हा एकदा आशेचा दीप लावण्यासाठी श्री. वि. गु. शिवदारे प्रतिष्ठान पुढे सरसावली आहे. पूरग्रस्तांना दिवाळीचा सण आनंदाने साजरा करता यावा, यासाठी माजी आमदार श्री. वि. गु. शिवदारे प्रतिष्ठानकडून १००० दिवाळी साहित्य किट वाटप करण्यात आले.

या उपक्रमाचा शुभारंभ प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजशेखर शिवदारे यांच्या हस्ते रविवारी करण्यात आला. रविवारी हत्तूर, वडगबाळ आणि व्हनमुर्गी येथील ग्रामस्थांना या दिवाळी किटचे वितरण करण्यात आले. या किटमध्ये जीवनावश्यक वस्तूंसह दिवाळी फराळासाठी लागणारे साहित्य देण्यात आले असून पूरग्रस्तांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याचा प्रयत्न प्रतिष्ठानने केला आहे.या प्रसंगी बोलताना राजशेखर शिवदारे म्हणाले, ''सीना नदीकाठावरील पंधरा गावांना पुराच्या पाण्याचा विळखा बसला होता. अनेकांच्या घरात, शेतात पुराचे पाणी गेल्यामुळे संसारपयोगी साहित्य वाहून गेले. खरीप आणि बागायत पिकांचे नुकसान झाले आहे. अशा पूरग्रस्तांना मदतीचा हात देण्यासाठी आमचे प्रतिष्ठान पुढे आले आहे.

चार दिवसांवर दिवाळीचा सण आहे, पण अनेक कुटुंबे अजूनही पुराच्या धक्क्यातून सावरलेली नाहीत. त्यांना दिवाळीचा सण आनंदाने साजरा करता यावा, यासाठी जीवनावश्यक वस्तू आणि फराळ साहित्य देत आहोत. आमचे प्रतिष्ठान नेहमीच सामाजिक बांधिलकी जपत आले आहे आणि ही संवेदना आम्ही पुढेही जपणार आहोत.'' यावेळी प्रतिष्ठानचे संचालक तथा माजी सभापती डॉ. चनगोंडा हविनाळे, नागरी बँक असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश वाले, श्री सिद्धेश्वर सहकारी बँकेचे अध्यक्ष नरेंद्र गंभिरे, ज्येष्ठ संचालक तुकाराम काळे, श्री सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याचे संचालक शिवानंद पाटील (कुडल), विद्यासागर मुलगे, श्री सिद्धेश्वर बाजार समितीचे संचालक नागण्णा बनसोडे, श्री स्वामी समर्थ सूत गिरणीचे संचालक राजशेखर भरले, सूर्यकांत पाटील, सोमनाथ कोळी, सिध्दाराम डुणगे, शकील कुडले (बरूर), बसवराज हसापुरे, रज्जाक निंबाळे, राजू कोळी, महेश नरसगोंडे यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

# धूळखात बंद पडलेल्या विद्यार्थ्यांच्या वस्तीगृहात होणार शेतकरी भवन

## सोलापूर बाजार समितीच्या संचालकांनी बैठकीत घेतला निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ ऑक्टोबर-**

राज्यात विक्रमी उलाढालीसाठी अव्वल क्रमांकाची असणाऱ्या सोलापूर बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांसाठी नव्याने शेतकरी भवन उभारण्यात येणार आहे. शेतकऱ्यांच्या मुलांसाठी यापूर्वी बनवण्यात आलेले विद्यार्थ्यांचे वस्तीगृह बंदाअवस्थेत आहे. त्या वस्तीगृहाचे नूतनीकरण करून त्या ठिकाणी शेतकरी भावांनो उभारण्याचा निर्णय सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळानी घेतला आहे.



या निर्णयामुळे बाजार समितीचा वेळ आणि पैशाची देखील बचत होणार आहे. दरम्यान, माजी सभापती विजयकुमार देशमुख यांच्या कार्यकाळात बाजार समितीची जुनी इमारत पाडून त्याठिकाणी शेतकरी भवन बांधण्याचा निर्णय संचालक मंडळानी घेतला होता. परंतु एका आडत्याने त्या निर्णया विरोधात न्यायालयात गेल्याने देशमुख यांच्या कार्यकाळात शेतकरी भवन बांधकामाचा मुहूर्त काही केल्या लागला नाही. मात्र सध्याचे सभापती दिलीप माने यांनी शेतकरी भावनासाठी आग्रही भूमीका घेतली आहे. सोलापूर बाजार समितीच्या विद्यार्थ्यांच्या जुन्या वस्तीगृहामध्ये शेतकरी भवनची सोय करण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या या वस्तीगृहामध्ये एकही विद्यार्थी राहत नाही. बाजार समितीची ही जागा गेल्या अनेक वर्षापासून तशीच धुळखात पडून आहे. त्यामुळे बाजार समितीने या जुन्या वस्तीगृहामध्ये आता शेतकरी भवन बांधून शेतकऱ्यांची सोय करणार आहे. त्यासाठी जवळपास ८४ खोल्या आहेत. शिवाय स्वच्छतागृहाची देखील व्यवस्था याठिकाणी आहे. शिवाय नव्याने शेतकरी भवन बांधकाम करायचे म्हणले तर जवळपास १० ते १२ कोटी रूपये इतका खर्च अपेक्षित आहे. मात्र वस्तीगृहाच्या ठिकाणी शेतकरी भवन बांधकामाची सोय केली. तर हा खर्च केवळ एक कोटीमध्ये होणारा आहे. त्यामुळे जुन्याचं इमारतीला नूतनीकरण करण्यात येणार असल्याचे सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्र.सचिव अतुल राजपूत यांनी सांगितले.

**जुन्या इमारतीचे नूतनीकरण करून शेतकरी भवनची निर्मिती**



सोलापूर बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांसाठी भवनची मागणी बऱ्याच दिवसापासून आहे. तरी आम्ही जुने वस्तीगृहाच्या ठिकाणी शेतकरी भवनची सोय करणार आहोत. त्या ठिकाणी शेतकऱ्यांसाठी सर्व सुविधा देता येणार आहे.

**-दिलीप माने, सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती**

**पूरग्रस्तांचा ५१ लाखाचा निधी शासनाला**

सोलापूर जिल्ह्यासह इतर जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक महापूर आल्याने शेतकऱ्यांचे आणि नागरिकांचे मोठे नुकसान झाले आहे. याच पूग्रस्तांना ५१ लाख रूपये देण्यात येणार आहे. त्यासाठी आम्ही वस्तू स्वरूपात पूरग्रस्तांना मदत करण्याचा निर्णय घेतला होता. परंतु जिल्हाधिकारी यांनी शासनाला तो निधी वर्ग करण्याबाबत चर्चा केली आहे. त्यामुळे सध्या पूरग्रस्तांना कीट पेक्षा इतर मदतीची आवश्यकता असल्याचेही सभापती माने यांनी सांगितले.

# गुप्तधनाचा हंडा काढून देणारा भोंदूबाबास दोन दिवस वाढीव पोलिस कोठडी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर -**

जमिनीतून गुप्त धनाचा हंडा काढून देतो असे सांगून ऑनलाईन सेवा केंद्रचालकाची १ कोटी ८७ हजार रुपयांची फसवणुक करणाऱ्या भोंदूबाबास न्यायालयाने दोन दिवस वाढीव पोलिस कोठडीमध्ये ठेवण्याचा आदेश दिला. मोहम्मद कादरसाब शेख (रा. आदिलशाही नगर, जर्मन बेकरीजवळ, विजापूर, कर्नाटक) असे पोलिस कोठडी मिळालेल्या भोंदूबाबाचे नाव आहे.

याबाबत गोविंद मल्लिकार्जुन वंगारी (वय ४२, रा. प्लॉट नं. २९, रा. कोंडा नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फसवणुक व महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ठ व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम २०१३ नुसार जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गोविंद वंगारी यांच्या कोंडा नगर येथील घरात गुप्तधानाचा हंडा असल्याचे आमिष दाखवून मोहम्मद शेख याने वंगारी यांना वेळोवेळी मंत्र-तंत्राचा वापर करून वंगारी व त्यांच्या कुटुंबातील लोकांना कोणतेतरी द्रव्य पिण्यास देऊन जादूटोणा करून गुप्तधन दाखवून ते काढण्यासाठी वंगारी यांच्याकडून ७ जून २०२३ ते ३० नाव्हेंबर २०२३ या कालावधीत १ कोटी ८७ लाख ३१ हजार ३०० रुपये घेऊन फसवणुक केली. त्यामुळे जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात येऊन शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी भोंदू बाबाचा शोध घेऊन त्यास अटक करून पोलिस कोठडी घेतली होती. तपासाम ध्ये शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी आयुब साहेबलाल रचभरे (वय ५०, रा. तेलंगी पाच्छा पेठ, सोलापूर), दाऊद इब्राहीम पठाण (वय ५०, रा. दक्षिण सदर बझार, सोलापूर), सादीक बाबा उर्फ सादीक हुसेनी फुलारी (वय ३८, रा. अन्सारी चौक, सोलापूर) आणि अ‍ॅड. सचिन रंगनाथ गायकवाड (वय ४६, रा. शिवाजी चौक, दक्षिण कसबा, सोलापूर) यांना अटक करून न्यायालयाकडून त्यांची पोलिस कोठडी घेतली आहे. मोहम्मद कादरसाब शेख या भोंदूबाबाची पोलिस कोठडीची मुदत संपल्याने सोमवारी त्यास पुन्हा न्यायालयात हजर करण्यात आले होते. त्यावेळी न्यायालयाने त्यास दोन दिवस वाढीव पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. पोलिस निरीक्षक अरविंद माने पुढील तपास करीत आहेत.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक **:प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

# सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## चॉकलेटचे आमिष दाखवून अल्पवयीन मुलीचा विनयभंग

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर -**
चॉकलेटचे आमिष दाखवून अल्पवयीन मुलीचा विनयभंग करणाऱ्यावर विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पिडीतेच्या फिर्यादीवरुन बसय्या स्वामी (रा. कुमारस्वामी मठ, इंदिरा नगर पोस्ट ऑफीस, विजापूर रोड, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १२ ऑक्टोबर रोजी दुपारी पिडीतेची मुलगी ही तिच्या वर्गातील मैत्रीणीसह कुमारस्वामी मठ येथे खेळण्यासाठी गेली होती. त्यावेळी बसय्या स्वामी याने पिडीत अल्पवयीन मुलीला घरामध्ये नेले.

पिडीतेच्या डोक्यावरून हात फिरवून तिचे गाल ओढून तिचा विनयभंग केला. तसेच ही बाब घरी कोणाला सांगू नको, मी तुला रोज चॉकलेट खायला देत जाईन असे सांगितले. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात पोक्सो व विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक मोहन पवार पुढील तपास करीत आहेत.



दसरा, दिवाळीनिमित्त
यल्लम्मा हॅण्डलूम 20% पर्यंत सूट
विविध कॉटन साड्या व ड्रेस मटेरियलचे एकमेव परिपूर्ण दालन
शाखा नं.१ : मार्कंडेय सहकारी रुग्णालय रोड, सोलापूर. मो.9371289887
शाखा नं.२ : अंत्रोळीकर शॉपिंग सेंटर, दत्त चौक, सोलापूर. मो.९३७२३५१८६०

# महापालिकेच्या १० प्रभागात झाले बदल मातब्बर माजी नगरसेवक डेंजर झोनमध्ये



- सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी अंतिम प्रभाग रचना जाहीर
- शहर मध्य विधानसभा मतदारसंघात ६ प्रभागात फेरबदल
- राजकीय चर्चा अन् तर्कवितर्कांना आले उधाण!

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ ऑक्टोबर-**
सोलापूर : सर्वांना उत्सुकता लागलेल्या सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी अखेर अंतिम प्रभाग रचना आज सकाळी १० वाजता महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी प्रसिद्ध केली.यामध्ये एकूण दहा प्रभागांमध्ये थोडाफार बदल करण्यात आला आहे. एक ते अडीच हजार मतदारांच्या फरकाने काही प्रभागात बदल दिसून येतात. शहर मध्ये विधानसभा मतदारसंघात मात्र तब्बल सहा प्रभागात बदल करण्यात आले आहेत. यामुळे राजकीय चर्चांना मोठे उधाण आले आहे. काही प्रभागात हे बदल केल्याने मातब्बर माजी नगरसेवक डेंजर झोनमध्ये आले असल्याची चर्चा आहे.




यामुळे आतापासूनच राजकीय मोर्चे बांधणीला सुरुवात अधिक गतीने येणार आहे. सोलापूर पालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी अंतिम प्रभाग रचना महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी सकाळी जाहीर केली. सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०१७ मधील चार सदस्यीय प्रभाग पध्दतीनुसार रचना होती. या प्रभाग रचनेमध्ये शहरातील दहा प्रभागांमध्ये थोडाफार फेरबदल करण्यात आला आहे. सार्वत्रिक निवडणूक २०२५ मध्ये चार सदस्यीय २४ प्रभाग व तीन सदस्यीय २ प्रभाग (प्रभाग क्र. २५ व २६) तयार करण्यात आले आहेत. सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता तयार करण्यात आलेली प्रारुप प्रभाग रचना दि. ३ सप्टेंबर २०२५ रोजी जाहीर करण्यात आली होती. त्यावर नागरिक, माजी नगरसेवक, तसेच विविध राजकीय पक्षांकडून एकूण ३८ हरकती दाखल करण्यात आल्या होत्या. या हरकतींची सुनावणी १३ ते २२ सप्टेंबर या कालावधीत जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात आली. त्यानंतर २३ ते २५ सप्टेंबर दरम्यान त्या संदर्भातील शिफारसी प्राधिकृत अधिकाऱ्यांनी नगरविकास विभागास पाठवल्या, तर २६ ते ३० सप्टेंबर या कालावधीत राज्य निवडणूक आयोगाकडे अंतिम अहवाल सादर करण्यात आला. त्यानंतर महापालिका आयुक्त डॉ. सचिन नंबर्स यांनी आज सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी अंतिम प्रभाग रचना जाहीर केली.

अंतिम प्रभाग रचनेमध्ये प्रभाग क्रमांक ६, १०, ११, १२, १४, १५, १६, १९, २० अशा दहा प्रभागांमध्ये फेर बदल झाला आहे. सुमारे एक ते अडीच हजार मतदारांमध्ये बदल झाला असल्याचे दिसून येतो. प्रभाग क्रमांक सहा मधील लक्ष्मी विष्णू चाळ क्रमांक एक आणि दोन ही प्रभाग १५ मध्ये जोडण्यात आली आहे. प्रभाग १५ मधील मुल्ला बाबा टेकडी परिसर हा प्रभाग १४ ला जोडला आहे. प्रभाग १४ चा अश्विनी हॉस्पिटल परिसर हा प्रभाग सोळाला जोडण्यात आला आहे. प्रभाग १६ चा विकास नगर हा परिसर प्रभाग २१ मध्ये जोडला आहे. प्रभाग २० मधील स्वागत नगर आणि त्या पाठीमागील परिसर हा प्रभाग १९ ला जोडला आहे. प्रभाग १९ मधील विनायक नगर हा भाग प्रभाग १२ मध्ये जोडला आहे. तर प्रभाग ११ मधील कोटा नगर परिसर हा प्रभाग दहाला जोडला आहे.

### काँग्रेसला फरक पडणार नाही : चेतन नरोटे

महापालिकेच्या अंतिम प्रभाग रचनेत जवळपास दहा प्रभागांमध्ये बदल करण्यात आला आहे. माझ्या प्रभागाचा दहा टक्के भाग अन्य प्रभागात समाविष्ट आहे तर दोन बूथ वाढले आहेत. यामुळे काँग्रेसला काहीच फरक पडणार नाही. काँग्रेसचे सर्व चार उमेदवार निवडून येतील. गत निवडणुकीत सर्वत्र भाजपची लाट असतानाही आमच्या प्रभागात काँग्रेसचे सर्व उमेदवार निवडून आले होते. यंदाच्या निवडणुकीबाबत लोकसभा, विधानसभेचे गणित मांडून अंदाज बांधले जात आहेत, मात्र महापालिकेची निवडणुकीत जनसंपर्क हा निकष आहे. तेव्हा लोकसभा व विधानसभेचे गणित या निवडणुकीत चालणार नाहीत, असे असे काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे यांनी सांगितले.

### प्रभागरचना शिवसेनेसाठी चांगली : अमोलबापू शिंदे

महापालिकेची नवीन प्रभागरचना शिवसेना शिंदेगटासाठी चांगली असून प्रभाग ६ आणि ७ तर आम्हाला आणखीन अनुकूल झालेले आहेत. महायुती होईल कारण आम्ही लोकसभा आणि विधानसभेला भाजपाचे मनापासून काम केलेले आहे. ही कार्यकर्त्यांची निवडणूक असल्याने महायुती झालीच पाहिजे. महायुती न झाल्यास नाईलाजास्तव स्वबळावरदेखील लढणार, असे शिवसेना जिल्हाप्रमुख अमोलबापू शिंदे यांनी सांगितले.

### अंतिम प्रभाग रचना पाहण्यासाठी महापालिकेत गर्दी

सोलापूर महापालिका निवडणुकीसाठीची अंतिम प्रभाग रचना आज सकाळी दहा वाजता महापालिकेच्या कौन्सिल हॉल सभागृहाचे आवारात नागरिकांना पाहण्यासाठी लावण्यात आली आहे. येथील व्यवस्थित महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी पाहणी केली. दि. १५ ऑक्टोबरपर्यंत या ठिकाणी रचना आणि नकाशा पाहता येणार आहे. दरम्यान महापालिका आवारात अंतिम प्रभाग रचना आणि नकाशे पाहण्यासाठी राजकीय नेते, माजी नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते, इच्छुक तसेच नागरिकांनी गर्दी केल्याचे दिसून आले. काँग्रेसचे शहर अध्यक्ष चेतन नरोटे, युवक काँग्रेसचे गणेश डोंगरे, शिंदे गटाचे अमोल शिंदेसह माजी नगरसेवक, पदाधिकाऱ्यांची उपस्थिती दिसून आली.

### शहर मध्य विधानसभा मतदारसंघातील प्रभागात फेरबदल

महापालिकेच्या अंतिम प्रभाग रचनेमध्ये सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघात सहा प्रभागांमध्ये फेरबदल करण्यात आला आहे. यामध्ये प्रभाग क्रमांक १२, १४, १५, १६, १९ आणि २० या प्रभागांचा समावेश आहे. दक्षिण सोलापूर विधानसभा मतदार संघातील प्रभाग क्रमांक १९ आणि २१ तर शहर उत्तर विधानसभा मतदारसंघातील प्रभाग क्रमांक ६, १० आणि ११ मध्ये बदल करण्यात आला आहे. या बदलामुळे भाजपच्या उमेदवारांना फायदा होणार असल्याचे बोलले जात आहे. काही माजी नगरसेवकांना याचा फटका बसून ते डेंजर झोन मध्ये जातील असे तर्कवितर्क लावण्यात येत आहेत. सत्ताधारी भाजपला ही प्रभाग रचना पोषक मानली जात आहे.

### नव्या प्रभागरचनेत नवीन चेहऱ्यांना संधी : खरटमल

महापालिकेची नवीन प्रभागरचना चांगली असून नव्या रचनेत नवीन चेहऱ्यांना चांगली संधी असणार आहे. गतवेळी आपण काँग्रेसमध्ये होतो. १०४ जागा लढविल्या त्यापैकी १४ निवडून आल्या होत्या. त्यावेळी तत्कालीन वरिष्ठांचा हस्तक्षेप होता म्हणून जागा कमी निवडून आल्या. यंदा शरद राष्ट्रवादीचे जास्तीत जास्त नगरसेवक निवडून आणू, असे शहराध्यक्ष सुधीर खरटमल यांनी सांगितले.

### नवीन प्रभागरचना राष्ट्रवादीसाठी अनुकुल : किसन जाधव

महापालिकेची नवीन प्रभागरचना अजित पवार राष्ट्रवादीसाठी अनुकूल असून यंदा जास्तीत जास्त नगरसेवक निवडून आणण्याचे ध्येय आहे. वरिष्ठांनी सांगितले महायुती तर युती त्यांनी सांगितले स्वबळावर तर तशीही लढायची संपूर्ण तयारी झालेली आहे. अजित पवार, सुनिल तटकरे, दत्ता भरणे जे आदेश देतील तो आमच्यासाठी अंतिम असेल, अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादीचे प्रदेश पदाधिकारी किसनभाऊ जाधव यांनी दिली.

### ३७ हजार ३१६ लोकसंख्येचा ४ सदस्यीय प्रभाग

प्रभागांची एकूण संख्या - २६ असून चार सदस्यीय प्रभाग २४ तर तीन सदस्यीय प्रभाग २ (प्रभाग क्र.२५ व २६) आहेत. सोलापूर महानगरपालिका क्षेत्राची २०११ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या - ९ लाख ५१ हजार ५५८ आहे. यामध्ये अनूसुचित जातीची लोकसंख्या - १ लाख ३८ हजार ७८, अनुसूचित जमातीची लोकसंख्या - १७ हजार ९८२ आहे. यासाठी चार सदस्यीय प्रभाग सरासरी ३७ हजार ३१६ लोकसंख्या तर तीन सदस्यीय प्रभागात सरासरी २७ हजार ९८७ लोकसंख्या धरण्यात आली आहे. निवडून दयावयाच्या महानगरपालिका सदस्यांची संख्या - १०२ आहे.

### महापालिकेत सन २०१७ मध्ये असे होते पक्षीय बलाबल

सोलापूर महापालिकेच्या स्थापनेनंतर प्रथमच सन २०१७ मध्ये सोलापूर महापालिकेत भाजपाची सत्ता प्रस्थापित झाली. यावेळी असलेले एकूण १०२ जागांपैकी पक्षीय बलाबल असे - भाजपा - ४९, शिवसेना - २१, काँगेस - १४, राष्ट्रवादी काँग्रेस - ४, एमआयएम - ९, बसपा -४, माकपा -१. यापूर्वी महापालिका निवडणूक २०१७ मध्ये चार सदस्यांचा एक प्रभाग होता. यात प्रत्येकी दोन जागा महिलांसाठी तर दोन जागा सर्वसाधारण अशी रचना होती. सर्वांना संधी उपलब्ध झाली होती.




### ३८ पैकी ३ हरकती सर्वसाधारण तर ३५ प्रभावशील

दि. ३ सप्टेंबर २०२५ रोजी प्रारूप प्रभाग रचना प्रसिद्ध करण्यात आली होती. नागरिकांकडून प्रभाग रचनेवर हरकती व सूचना सादर करण्यासाठी ३ ते १५ सप्टेंबर असा कालावधी देण्यात आला होता. या कालावधीत एकूण ३८ हरकती प्राप्त झाल्या. जिल्हाधिकारी यांनी दि. १९ सप्टेंबर २०२५ रोजी सुनावणी घेऊन संबंधितांना हरकती व सूचना सादर करण्याची संधी दिली एकूण प्राप्त ३८ हरकतीपैकी ३ हरकती सर्वसाधारण स्वरूपाच्या व प्रभागांच्या सीमांवर कोणताही परिणाम न होणाऱ्या होत्या तर ३५ हरकती या प्रभागरचनेवर परिणाम करणाऱ्या स्वरूपाच्या होत्या.

### संकेतस्थळावर अंतिम प्रभाग रचना उपलब्ध

राज्य निवडणूक आयोगाने मंजूर केलेल्या अंतिम प्रभाग रचनेनुसार आता सोलापूर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी पुढील प्रक्रिया राबविण्यात येणार आहे संबंधित नकाशे, प्रभागाची यादी व तपशील महानगरपालिका मुख्य कार्यालयातील कॉन्सिल हॉल व क्षेत्रीय कार्यालये येथे तसेच महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर www.solapurcorporation.gov.in नागरिकांच्या पाहणीसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केले आहे.

श्रीक्षेत्र नृसिंहवाडी येथे येणाऱ्या सर्व भक्तांचे हार्दिक स्वागत!
स्वागतोत्सुक
श्री ज्ञानेश्वर मंगल कार्यालय
आमच्याकडे लग्न, मुंज, वास्तूशांती, उदक शांती, कालसर्प शांती तसेच पिडा निवारण, त्रिपिंडी नारायण बली नागबली हे विधी शास्त्रोक्त पध्दतीने केले जातील.
प्रकाश गोपाळ वैद्य
एसटी स्टॅन्डमागे, मु.पो.नृसिंहवाडी, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर - 416104
MO.: 9766556223 / 7083732984

## महत्वाचे...

### ॲक्टीव्हाच्या डिक्कीतून ९० हजार लंपास

**सोलापूर, दि.१३ ऑक्टोबर-**
ॲक्टीव्हा गाडीच्या डिक्कीतून चोरट्यांनी ९० हजार रुपयांची रोकड चोरून नेली. याबाबत विठ्ठल सिद्रामप्पा दिंडोरे (वय ६२, रा. सन्मित्र नगर, शेळगी, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १० ऑक्टोबर दुपारी विठ्ठल दिंडोरे हे जुना बोरामणी नाका येथील एसबीआय बँकेच्या शाखेतून एलआयसी चे पैसे काढून ते एमएच १३ बीडब्ल्यू ६१७५ क्रमांकाच्या दुचाकीच्या डिक्कीत ठेऊन घराकडे जात होते. रुपाभवानी चौकात दिंडोरे हे चहा घेण्यासाठी कॅन्टीनमध्ये गेले असता अज्ञात चोरट्याने गाडीच्या डिक्कीतील रोख ९० हजार रुपये चोरून नेले. हवालदार शिवशरण पुढील तपास करीत आहेत.

### सर्पदंश झालेल्या महिलेचा मृत्यू

**सोलापूर, दि.१३ ऑक्टोबर-**
शेतामध्ये सर्पदंश झालेल्या चिवरी गावच्या महिलेचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात शनिवारी सायंकाळी मृत्यू झाला. शोभा किसन गवळी (वय ५५ वर्ष, रा. चिवरी, तालुका तुळजापूर) असे त्या मयत महिलेचे नाव असून त्या सात ऑक्टोबर रोजी सायंकाळी घराजवळील शेतात असताना त्यांच्या पायास सापाने चावा घेतला होता. त्यामुळे त्यांना नळदुर्ग च्या आरोग्य केंद्रात प्रथमोपचार करून येथील शासकीय रुग्णालयात संध्याकाळी पती किसन यांनी दाखल केले असता या महिलेचा उपचारादरम्यान शनिवारी सायंकाळी मृत्यू झाला.

### पतीच्या मारहाणीत जखमी पत्नीचा मृत्यू

**सोलापूर, दि.१३ ऑक्टोबर-**
पतीच्या मारहाणीत जखमी झालेल्या हवेली तालुक्यातील महिलेचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात शनिवारी रात्री मृत्यू झाला. घरगुती भांडणातून पतीच्या मारहाणीत जखमी झालेल्या हवेली तालुक्यातील महिलेचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात शनिवारी रात्री मृत्यू झाला. सुशीला बिरप्पा खांडेकर (वय ३९ वर्ष ,रा. गावडेवाडी, ता. दक्षिण सोलापूर, सध्या रा. वाघोली, ता. हवेली. जिल्हा पुणे) असे त्या मयत पत्नीचे नाव आहे. त्या सहा ऑक्टोबर रोजी वाघोली शिवारातील केसनंदगावात असताना घरगुती भांडणाच्या कारणावरून पती बिरप्पा खांडेकर याने तिला लाकडाने मारहाण केली होती. यात डोकीस जखम, दोन्ही हाताला मार लागल्याने तिच्यावर खाजगी दवाखान्यात प्रथम उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात दुसऱ्या दिवशी पहाटे भाऊ सिद्धप्पा याने बेशुद्ध अवस्थेत दाखल केले असता तिचा उपचारादरम्यान शनिवारी रात्री दहा वाजता मृत्यू झाला.



**चाहुल दिवाळीची... :** सोलापुरात दिवाळीनिमित्त फराळाच्या कामाला वेग आला आहे. मोठ्या प्रमाणात चिवडा, चकली, लाडू, करंज्या, शंकरपाळी, मैसूरपाक बनवण्याच्या कामात व्यस्त महिला.

## प्रा. राहुल होनकळस यांना पीएच.डी. प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ ऑक्टोबर-**
केगाव येथील एन. बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मेकॅनिकल अभियांत्रिकी विभागाचे असिस्टंट प्रोफेसर व वर्कशॉप प्रमुख प्रा. राहुल राजन होनकळस यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाकडून मेकॅनिकल इंजिनिअरिंगमधील पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे.



''इन्व्हेस्टिगेशन, ॲनालिसिस अँड इम्प्रूव्हमेंट इन वर्म अँड वर्म व्हील ऑफ गिअर मोटर'' हा त्यांच्या संशोधनाचा विषय होता. हे संशोधन वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूर येथील संशोधन केंद्रात, मेकॅनिकल विभागप्रमुख प्रा. डॉ. भाग्येश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करण्यात आले. या संशोधनास लक्ष्मी हायड्रोलिक्स प्रा. लि., सोलापूर यांचे प्रायोजकत्व लाभले होते. या संशोधनातून औद्योगिक यंत्रसामग्रीच्या ऊर्जाबचतीस महत्त्वपूर्ण दिशा मिळाली आहे. त्यांचे सिंहगड इन्स्टिट्यूटचे सचिव संजय नवले, प्राचार्य प्रा. डॉ. शंकर नवले, तसेच विभागप्रमुख प्रा. डॉ. रविंद्र व्यवहारे यांनी अभिनंदन केले.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी १२३७

बाईलेच्या गोता आवडीनें पोसी ।
मातापितयांसी दवडोनि ।।

स्त्रिविना पुरुष आणि पुरुषाविना स्त्री हे अधुरे मानले जातात. हा अधुरेपणा घालवण्यासाठी स्त्री पुरुष एकत्र येतात. एकत्र येण्याचा नैतिक मार्ग म्हणजे विवाह होय. या नैतिक मार्गाला समाजाची मान्यता असते. अत्यंत पवित्र समजल्या जाणाऱ्या विवाह बंधनाला सर्वांचे भरपूर आशिर्वादही मिळतात. पण वैवाहिक जीवनात दाम्पत्य जेव्हा जन्मदात्यांना विसरु लागतात, तेव्हा मात्र विवाहाच्या वेळी आशिर्वाद देणारा समाज शाप देऊ लागतो. अर्थात, अशांबद्दल छी-थू करू लागतो. बाईल अधिन झालेला पुरुष तिच्या इच्छापूर्तीसाठी किंवा तिला आनंद वाटावा, मुक्त राहता यावे म्हणून जन्मदात्याना दूर करण्यात मागेपुढे पाहत नाही. आस व्यक्ती पत्नीचे लाड तर पुरवतोच पण असा व्यक्ती तिच्या नातेवाईकांचे लाड पुरवण्यातही मागेपुढे पाहत नाही. आईवडीलांना दूर करून बायकोचे, तिच्या गोतवळांचे लाड करणाऱ्या व्यक्तीच्या अनुषंगाने नाराजी व्यक्त करतांना किंवा अशा आशयाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात,



बाईलेच्या गोता आवडीनें पोसी । मातापितयांसी दवडोनि ।।

पत्नी म्हणजे अर्धांगिणी होय. पुरुषाची ती जीवनसाथी असते, त्याच्या सुख-दु:खात ती पूर्णत: सहभागी असते. या सर्व विषयाची संतांना जाण असते. म्हणूनच संत, महात्मे पत्नीच्या इच्छा, अपेक्षा पूर्ण करूच नयेत, असे म्हणत नाहीत. पत्नीच्या योग्य त्या इच्छा पूर्ण करायलाच हव्यात. पण पत्नीच्या इच्छापूर्तीसाठी जन्मदात्यांना घराबाहेर काढणे, त्यांचे हाल करणे, त्यांचा अवमान करणे हे संतांना मान्य नाही. संतांप्रमाणे तुम्हा आम्हालाही मान्य नाही. पण दुर्दैवाने नमूद करावे लागते की आमच्या तुमच्या पैकीच कोणीतरी असे चुकीचे वागतो. निती नियमाला अनुसरून कर्तव्य म्हणून जे कांही करायला हवे ते धर्मपत्नीसाठी, तिच्या नातेवाईकांसाठी निश्चित करावे. मात्र कोणत्याही परीस्थितीत तिच्या हट्टापोटी जन्मदात्यावर अन्याय होईल असे कांही करू नये. याप्रसंगी दुर्दैवाने नमूद करावे लागते की, समाजात असे काही लोक आहेत की जे बाईल अधिन होऊन तिचे, तिच्या नातेवाईकांचे लळे पुरवतात आणि जन्मदात्यांच्या मात्र हालअपेष्टा करतात. विश्वास ठेवलेल्या स्त्रियांचा विश्वासघातही करतात. अशा लोकांत केवळ अशिक्षितांचाच नव्हे तर सुशिक्षितांचा, मोठ्या पदावरील लोकांचाही समावेश आहे. मी तर अनेक वरीष्ठ स्तरावरील अधिका-यांचे तसेच ज्यांचे नाव समाजात नामवंतात मोडते अशा लोकांचेही असे वाईट वर्तन जवळून पाहिले आहे. असो, संत श्री ज्ञानोबा-तुकोबांच्या भक्तांकडून असे अपवित्र कार्य होता कामा नये. कोणाचाही संसार आपल्या चुकीमुळे मोडला जाऊ नये, याची खात्री आपणच करावी. केलेल्या चुकीच्या कार्याची परतफेड कोणालाही चुकत नाही, हे सदैव लक्षात असावे. जय जय राम कृष्ण हरी ।।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : मंगळवार
दि. १४ ऑक्टोबर २०२५
विक्रम संवत् २०८२
शके - १९४७
संवत्सर - विश्वावसु
मास - अश्विन
कृ. सप्तमी (१२.२४)
ऋतु - वर्षा
नक्षत्र - आर्द्रा (१२.३६)
योग - परिघ (०८.०९)
करण - बालव (२३.४१)

दिनविशेष - चांगला दिवस, कालाष्टमी, कराष्टमी, बिरदेव यात्रा हन्नूर

....राहू काल....
रविवार : दु.४.३० ते ६.००
सोमवार : स. ७.३० ते ९.००
मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०
बुधवार : दु. १२ ते १.३०
गुरुवार : दु. १.३० ते ३.००
शुक्रवार : स.१०.३० ते १२
शनिवार : स. ९ ते १०.३०

# ही माझी शेवटची निवडणूक : काका साठे

### जिल्हा परिषद निवडणुकीच्या तोंडावर काका साठेंचा बॉम्ब

### उत्तर सोलापूर तालुक्यातील पदाधिकारी देणार सामूहिक राजीनामे



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर-**
आगामी जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांनी कुणाशीही तडजोड न करता निष्ठेने काम करावे. आपली ताकद दाखवून देण्यासाठी प्रयत्न करावेत. ही माझ्या आयुष्यातील शेवटची निवडणूक आहे, असे भावनिक उद्गार यावेळी बळीराम काका साठे यांनी आयोजित करण्यात आलेल्या कार्यकर्त्यांच्या बैठकीत काढले.

उत्तर सोलापूर तालुक्यातील शरद पवार राष्ट्रवादीचे सर्व पदाधिकारी राजीनामे देऊन आम्ही अपक्ष जिल्हा परिषद, पंचायत समितीची निवडणूक मोठ्या ताकदीने लढणार आहोत, अशी घोषणा ज्येष्ठ नेते बळीराम साठे यांनी केली आहे. ऐन जिल्हा परिषदेच्या निवडणुकीच्या तोंडावर काका साठेंनी बॉम्ब टाकला असून काका साठेंचे कार्यकर्ते देखील काका जसं तुम्ही म्हणाल तसं करू अशी हाक दिल्याने काकांच्या या निर्णयाने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत एकच खळबळ माजली आहे.दरम्यान, राष्ट्रवादी काग्रेस शरदचंद्र पवार पक्षात दखल घेतली जात नसल्याने पक्षाला सोडचिठ्ठी देण्याचा निर्णय घेतला होता. पुढील निर्णय घेण्यासाठी आयोजित समर्थक पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या बैठकीत ते म्हणाले, मी यापूर्वी जिल्हा परिषदेवर सत्तेत असताना मोहिते पाटील यांच्या सहा सदस्यांवर शिस्तभंगाची कारवाई केली होती. याची खुन्नस धरून धैर्यशील मोहिते-पाटील हे माझ्या विरोधात षडयंत्र रचत आहेत. त्यांच्या साथीला आमदार अभिजित पाटीलही आहेत. सर्वसामान्य कार्यकर्त्यांची कामे होण्यासाठी कोणत्या पक्षात प्रवेश करायचा, हा निर्णय सध्या स्थगित ठेवला आहे. यासाठी निवडणुकीनंतर या संदर्भात निर्णय घेतला जाईल. माजी आमदार यशवंत माने यांनी माझे राजकारण संपवण्याच आमिष दाखवून कार्यकर्ते फोडण्याचा जोरदार प्रयत्न करीत आहेत. यासाठी कार्यकर्त्यांनी सावधगिरी बाळगून आगामी निवडणुका जिंकण्यासाठी तयार व्हावे. यावेळी सोलापूर बाजार समितीचे माजी संचालक प्रकाश चोरेकर व प्रल्हाद काशीद यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी राष्ट्रवादी तालुका युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष शरद माने, उत्तर सोलापूर तालुका पंचायत समिती उपसभापती जितेंद्र शीलवंत उपस्थित होते.

## दिवाळीनिमित्त ग्राहकांसाठी विशेष माहीम

**सोलापूर दि.१३ ऑक्टोबर-**
पीएनजी ज्वेलर्स आपल्या भव्य दिवाळी मोहिमेची आनंदात सुरुवात करणार आहे. ही मोहीम २२ सप्टेंबर पासून २६ ऑक्टोबर २०२५ पर्यंत चालणार असून, ग्राहकांना आकर्षक दरांमध्ये अप्रतिम दागिने खरेदी करण्यासाठी एक अविस्मरणीय संधी उपलब्ध करून देणार आहे.या दिवाळी विशेष मोहिमेअंतर्गत, ग्राहकांना सोन्याच्या दागिन्यांच्या मेकिंग चार्जेसवर ५० टक्के पर्यंत सवलत, हिऱ्यांच्या दागिन्यांच्या मेकिंग चार्जेसवर १०० टक्के पर्यंत सवलत, तसेच जुन्या सोन्याच्या एक्स्चेंजवर ० टक्के घट मिळणार आहे. या ऑफर्स पीएनजी ज्वेलर्सच्या सर्व शोरूममध्ये तसेच ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म्सवर उपलब्ध असणार आहेत.या मोहिमेबाबत बोलताना,संचालक डॉ. सौरभ गाडगीळ म्हणाले,दिवाळी हा प्रकाश, समृद्धी आणि एकत्र येऊन साजरा करण्याचा सण आहे. आमच्या ग्राहकांनी पिढ्यानपिढ्या पीएनजी ज्वेलर्सवर दाखवलेल्या विश्वासामुळे हा सण आमच्यासाठी विशेष आहे.

# आजपासून उद्यमदीप एक्स्पोचे आयोजन

### विद्यार्थ्यांनी बनवलेल्या वस्तूंचे एकाच छताखाली प्रदर्शन व विक्री

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर-**
विद्यार्थ्यांमध्ये उद्योगशीलता आणि स्टार्टअप संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी वालचंद शिक्षण समूहाने १४ ते १६ ऑक्टोबर २०२५ सकाळी ९ ते रात्री ९ वाजेपर्यंत तीन दिवसीय उद्यमदीप ट्रेड फेअर व स्टार्टअप एक्स्पोचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती विभाग प्रमुख डॉ. प्रीतम कोठारी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

उद्यमदीप या उपक्रमाचे उद्घाटन मंगळवार, दिनांक १४ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ वाजता खा. प्रणिती शिंदे यांच्या हस्ते होणार आहे. याप्रसंगी वालचंद शिक्षण समूहाचे सर्व विश्वस्त आणि समूहातील सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य उपस्थित राहणार आहेत. दिवाळी सणासाठी लागणाऱ्या सर्व वस्तू - पणत्या, आकाश दिवे, सजावटीचे साहित्य, फराळाचे पदार्थ, मसाले, कपडे इत्यादी साहित्य एकाच छताखाली माफक दरात विक्रीसाठी उपलब्ध असणार आहेत.

या एक्स्पोमध्ये अनेक गुंतवणूकदार सहभागी होणार असून एक्स्पोमधील सर्वोत्तम स्टार्टअपमध्ये तब्बल १ कोटी रुपयांपर्यंत गुंतवणूक करण्याचा त्यांचा मानस आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या स्टार्टअप्सना मोठी संधी उपलब्ध होणार आहे. सर्वांना प्रवेश विनामूल्य आहे. सोलापूर शहर, ग्रामीण भागातील विद्यार्थी, पालक आणि नागरिकांनी या उपक्रमास भेट देऊन भरभरून खरेदी करावी आणि विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. सत्यजित शहा आणि प्राचार्य डॉ. संतोष कोटी यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेला प्रा. अजित देवसाळे, प्रा. बी. आर. पाटील आदी उपस्थित होते.

# मेहता शाळेकडून पूरग्रस्तांना मदत

### होनमुर्गी गावात अन्नधान्य किटचे वाटप



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर-**
दक्षिण सोलापूर तालुक्यातील होनमुर्गी पूरग्रस्त भागातील ग्रामस्थांना अन्नधान्य किट देण्याचा उपक्रम कै. वि. मो. मेहता शाळेकडून राबविण्यात आला.

सप्टेंबर महिन्यात गावात आलेल्या पुरामुळे गावात अतिशय भयानक परिस्थिती निर्माण झाली होती. घरांबरोबरच शाळा, सार्वजनिक ठिकाणे यांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. शाळांमध्ये पाणी शिरल्याने शाळेची अवस्था अत्यंत बिकट झाली होती.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन, मुख्याध्यपिका श्रुती बागेवाडी, शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांचे सहकार्य लाभले.

# विकसित भारत बिल्डथॉन उपक्रमात विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

### शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांचीही उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर-**
शिक्षण मंत्रालय भारत सरकार व अटल इनोव्हेशन मिशन यांच्या संयुक्त विद्यमाने देशभरात राबविण्यात येत असलेल्या विकसित भारत बिल्डथॉन २०२५ या उपक्रमाचे सोमवार १३ ऑक्टोबर रोजी युट्युब लाईव्ह प्रक्षेपण भारतभर आयोजित करण्यात आले होते.

विकसित भारत बिल्डथॉन २०२५ उपक्रमाद्वारे इयत्ता वी ते १२ वीच्या देशभतील सर्व विद्यार्थ्यांना विकसित भारत २०४७ या संकल्पनेच्या यशस्वीतेसाठी स्कूल इन्होव्हेशन इव्हेंट या प्रक्षेपनाव्दारे आयोजित करण्यात आला होता. यामध्ये एकूण ४ थिम्स आहेत. आत्म निर्भर भारत, स्वदेशी, व्होकल फॉर लोकल व समृध्द भारत या संदर्भात केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान, केंद्रीय शिक्षण सचिव संजयकुमार, आय आय टी दिल्लीचे प्रा. राव यांनी विद्यार्थ्यांना मागदर्शन केले. भरलो उडान, छू लो आसमान, नये भारत की ये है नई पहचान हे गीत गाऊन विद्यार्थ्यांच्या इनोव्हेशन इव्हेंटला प्रारंभ झाला.



यावेळी देशभरातील तीन लाख शाळांतून इयत्ता सहावी ते बारावीचे तीस लाख पेक्षा जास्त विद्यार्थी या इव्हेंटला लाईव्ह उपस्थित होते. विकसित भारत २०४७ हे महत्वकांक्षी ध्येय साध्य करण्यासाठी आपल्या तरुणांमध्ये नवोन्मेष, सर्जनशिलता आणी समस्या सोडवण्याचे कौशल्य वाढवणे आवश्यक आहे, शिक्षणाचा पाया असलेल्या शाळा ही मुल्ये लहानपणापासूनच रुजवण्यासाठी एक आदर्श ठिकाण आहे. म्हणून या उपक्रमाव्दारे सर्व शालेय विद्यार्थ्यांना एकत्र करुन राष्ट्रीय महत्वाच्या आत्मनिर्भर भारत , स्वदेशी, व्होकल फॉर लोकल लोकल, समृध्द भारत कल्पना, डिझाईन, प्रोटोटाईप तयार करतील. राष्ट्रीय स्तरावर १३ ऑक्टोबर ते २५ ऑक्टोबय पर्यंत प्रोजेक्ट व्हिडीओ सबमिशन करावयाचे आहेत. यास्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांना राष्ट्रीय प्रोजेक्ट व्हिडीओ सबमिशन करावयाचे आहेत. यास्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांना राष्ट्रीय पातळीवर १० विजेते राज्यस्तरीय १०० विजेते आणि जिल्हास्तरीय १००० विजेते या उपक्रमासाठी एक कोटी रुपयाची रक्कम देण्यात येणार आहे. या उपक्रमात सोलापूर जिल्हयातील २२५९ माध्यमिक शाळांतील इ. सहावी ते १२ वी मधील सर्व विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. या उपक्रमाचा भाग म्हणून सोलापूर जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) सचिन जगताप यांनी पंढरपूर येथील विवेक वर्धिनी विद्यालय व जुनिअर कॉलेज, पंढरपूर येथे भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांच्या नवोन्मेषी प्रकल्पांची पाहणी करून त्यांना मार्गदर्शन केले.

जगताप म्हणाले की, विद्यार्थ्यांनी समाजातील वास्तव समस्यांवर उपाय शोधण्यासाठी विज्ञान, तंत्रज्ञान व सर्जनशील विचारांचा उपयोग करून देशाच्या प्रगतीत हातभार लावावा. आत्म निर्भर भारताची उभारणी ही नव्या पिढीच्या कल्पकतेवर अवलंबून आहे. शाळांमध्ये झालेल्या या उपक्रमाला विद्यार्थ्यांसह शिक्षक, शिक्षिका यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. अनेक विद्यार्थ्यांनी पर्यावरण, आरोग्य, शिक्षण व डिजिटल तंत्रज्ञान या क्षेत्रांवर आधारित नाविन्यपूर्ण कल्पना सादर केल्या.या भेटीदरम्यान शिक्षणाधिकारी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांच्या संकल्पनांना प्रोत्साहन देण्याचे आवाहन केले. चवकसित भारत बिल्डथॉन २०२५ सारखे उपक्रम ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावर आपली प्रतिभा दाखविण्याची संधी देतात, असेही त्यांनी नमूद केले. या हा कार्यक्रम तीन लाख शाळांमधून तीस लाख विद्यार्थ्यांसमोर पार पडला कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष डॉ. मदन क्षीरसागर, सचिव वैभव टोमके, प्राचार्य यु आर मुंडे, प्रा. ए ए पवार, प्रा. मधुकर भोसले, प्रा. सि डी. चौगुले, मुख्य लिपिक मोरे एच. के व इतर मान्यवर उपस्थित होते.



# मीनानगर परिसरातील नागरिकांचा येण्या जाण्याचा मार्ग मोकळा

### प्रभाग २६ मध्ये सिमेंट कॉंक्रिटच्या रस्त्याने नागरिकांना मिळाला दिलासा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ ऑक्टोबर-**
शासनाच्या सुवर्ण जयंती नगरोस्थान योजने अंतर्गत ड्रेनेज लाईनची कामे पूर्ण झाल्यानंतर मीना नगरामध्ये महापालिकेच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून घेऊन सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे उद्घाटन करून प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यात आली.

जुळे सोलापूरातील प्रभाग क्रमांक २६ मधील मीना नगर परिसरातील नागरिक गेल्या अनेक वर्षांपासून मूलभूत सोई सुविधापासून वंचित राहत आहेत. महानगरपालिकेच्या तिजोरीत कर भरून सुद्धा त्यांना मूलभूत सोई सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या नाही.

पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन,ड्रेनेज लाईन,अंतर्गत रस्ते, दिवाबत्ती असे अनेक प्रकारचे गरजा पूर्णपणे बंद होत्या. माजी नगरसेविका राजश्री चव्हाण यांच्या पुढाकारातून पाण्याची पाईपलाईनचे काम करण्यात आले.

याप्रसंगी मीना नगरातील रहिवासी प्रकाश चव्हाण, रमेश रजपूत, रुपेश राठोड,शशिकांत शिंदे, साहिल चव्हाण, बिराप्पा बिराजदार, रेखा चव्हाण, अंबिका बंडगर, लंगोटे ताई, पवार, प्रशांत काळे, ठेकेदार अलकुंटे नागरिकांच्या मदतीला सदैव धावून येणारे भाजपचे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अनिल चव्हाण आदी कार्यकर्ते, पदसधिकारी उपस्थित होते.



# बिपीन पटेल, अशोक लांबतुरे यांच्या वाढदिवसानिमित्त २०१ जणांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर-**
अश्विनी सहकारी रुग्णालय आणि संशोधन केंद्र नियमित चेअरमन बिपीन पटेल यांच्या ७७ व्या वाढदिवसानिमित्त आणि संचालक अशोक लांबतुरे यांच्या ७५ व्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले.

यावेळी २०१ जणांनी रक्तदान केले आहे. शिबिराचे उद्घाटन चेअरमन बिपीन पटेल यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. याप्रसंगी संचालक अशोक लांबतुरे, चंद्रशेखर स्वामी, विलास पाटील, वैद्यकीय अधिक्षक डॉ. प्रशांत औरंगाबादकर, प्रशासकीय अधिकारी सचिन बिज्जरगी, पर्सोनेल एक्झिक्युटीव्ह एम.बी. जमादार, चीफ अकौंटंट कृष्णा घोडके, अकौंटंट विलास कारंडे, डेप्युटी पर्सोनेल एक्झिक्युटीव्ह स्वप्नशील लांबतुरे, ओपीडी इनचार्ज अवधूत कुलकर्णी, पीए मनोज परदेशी उपस्थित होते.

याप्रसंगी प्रमुख मान्यवर सुरेखा लांबतुरे, विद्या लांबतुरे, मधुकर गवळी, अलका गवळी, संगीता जाधव उपस्थित होते. तसेच अशोक लांबतुरे प्रतिष्ठान व श्री रविदास विश्व महापीठ, नवी दिल्ली यांचे पदाधिकारी व कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.

अश्विनी सहकारी कामगार युनियनचे अध्यक्ष अशोक कांबळे, उपाध्यक्ष सुर्यकांत कवलगी, सचिव विनायक अवदूत व इतर पदाधिकारी, कर्मचारीवर्ग उपस्थित होते. अशोक लांबतुरे अमृतमहोत्सव समितीचे प्रमुख पदाधिकारी सुरेश पाटोळे, उज्ज्वलकुमार माने, श्रीकांत बोरगांवकर, किरण व्हनकोरे, आप्पाशा सन्नके, विनायक भगत, दत्ता हरवाळकर, बाळू सुरवसे, बाळासाहेब राऊत, अविनाश चाबुकस्वार, प्रदीप घागरे आदी उपस्थित होते. प्रशांत गायकवाड व मित्रपरिवार यांनी सहभाग घेतला. शिबिरामध्ये सहभागी व्यक्तींना प्रमाणपत्र देण्यात आले.

# डेप्युटी सीईओ भुजबळांना कारवाईचे बळ मिळो

जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ यांनी ग्रामपंचायत विभागाचा पदभार घेऊन चार महिने झाले. या काळात डेप्युटी सीईओ भुजबळ यांच्या कार्याची चुणुक पहायला मिळाली नाही. ग्रामपंचायत विभाग हा जिल्हा परिषदेचा आत्मा आहे. त्यामुळे या विभागाच्या पारदर्शक कारभारावर जिल्हा परिषदेचा नावलौकिक अवलंबून आहे. त्यामुळे या विभागाचे प्रमुख म्हणून भुजबळ यांनी ॲक्शन मोडवर येऊन ग्रामपंचायतीच्या कामकाज सुधारणेसाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.



जिल्हा परिषदेतून
**अमोगसिध्द मुंजे**
मो. 9423535294

जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ यांनी पदभार घेतल्यापासून ग्रामपंचायत विभागाचा कामकाज प्रकाशझोतात आल्याचे दिसून येत नाही. शिवाय अनेक ग्रामपंचायतीच्या व ग्रामसेवकांच्या तक्रारी प्रलंबित असताना त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येते. त्यामुळे डेप्युटी सीईओ भुजबळ यांनी ग्रामपंचायतीच्या कामकाजात सुधारणा करण्यासाठी ठोस उपाययोजना राबविणे गरजेचे आहे. भुजबळ यांनी पदभार घेतल्यापासून ग्रामसेवक पदभार प्रक्रिया प्रलंबित आहे. नागरीकांकडून वारंवार याबाबत तक्रारी केल्यानंतरही डेप्युटी सीईओंकडून कारवाई होताना दिसून येत नाही. शिवाय त्यांचा अधिक काळ बैठक व व्हीसीमध्ये जात असल्याने नागरीकांच्या व अभ्यंगताच्या भेटी होत नाहीत. त्यामुळे ग्रामपंचायत विभाग सुधारणेसाठी अधिक वेळ मिळत नसल्याचे दिसून येते.

वास्तविक पाहता अनेक ग्रामपंचायतीमध्ये कोटींचा घोटाळा झाल्याची तक्रार केल्यानंतर व अधिकाऱ्याकडून चौकशी होऊनही त्याकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. सूर्यकांत भुजबळ हे तरूण व दबंग अधिकारी म्हणून ओळख निर्माण होण्यासाठी डॅशिंग भूमिका बजावणे महत्वाचे आहे. शिवाय प्रलंबित ग्रामसेवक पदभार प्रक्रीया पूर्ण करून स्वताची ओळख निर्माण करणे गरजेचे आहे. डेप्युटी सीईओ भुजबळ यांनी संघटना व अधिकाऱ्यांच्या दबावाखाली काम न करता कारवाईची मोहीम उघडणे अपेक्षित आहे. त्यामुळे भुजबळांच्या अंगी कारवाईचे बळ येवो, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### शहीद कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या विचारांना स्मरुन पूरग्रस्तांना मदत

**बार्शी, दि.१३ ऑक्टोबर-**

आयटक संलग्न गोकुळ दूध संघ कामगार संघटना कोल्हापूर तसेच माढा तालुका ग्रामपंचायत कर्मचारी संघटना, आयटक कामगार केंद्र बार्शी, यांच्या संयुक्त वतीने सीना नदीच्या पुराने नुकसान झालेले माढा तालुक्यातील उंदरगाव केवड या गावातील पूरग्रस्तांना सतरंजी - ब्लँकेट त्याचप्रमाणे किराणा साहित्याचे किट असे सर्व ६० हजार रुपयांचे साहित्य कॉम्रेड तानाजी ठोंबरे यांच्या नेतृत्वाखाली वाटप करण्यात आले. यावेळी रामचंद्र माने आयटकचे जिल्हा सचिव कॉम्रेड ए.बी. कुलकर्णी, माढा आयटक ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेचे सतिश गायकवाड, मुबारक मुलाणी, सुरेश कुंभार, ओहाळ, दिपक भोसले, अमर सय्यद, राजेश ढगे, संजय ओहोळ तसेच भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे कॉम्रेड प्रविण मस्तुद, बांधकाम कामगार संघटनेचे कॉम्रेड अनिरुद्ध नखाते आदी उपस्थित होते.

### दुचाकी घसरून अपघातात सहा वर्षांच्या बाळासह चार जण जखमी

**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर-**

दुचाकीवर बसून जाताना अचानक दुचाकी घसरून झालेल्या अपघातात सहा वर्षाच्या बाळासह चार जण जखमी झाले. हा अपघात रविवारी सायंकाळी ५.३० च्या सुमारास मंगळवेढा तालुक्यातील हन्नुर गावाजवळ घडला. श्रीशैल गणपती फुलारी (वय ६), विद्याश्री गणपती फुलारी (वय ११), भाग्यश्री गणपती फुलारी (वय १७) व सोमनाथ रायप्पा माशाळ (वय ३५, सर्व रा. नंदुर ता मंगळवेढा) अशी जखमी झालेल्यांची नावे आहेत. श्रीशैलसह इतर सर्वजण रविवारी सायंकाळी ५.३० च्या सुमारास दुचाकीवर बसून नदुंर येथून जाताना अचानक दुचाकीचे चाक घसरले. यात खाली पडल्याने सर्वजण जखमी झाले. सोमनाथ याच्या डोक्याला जखम झाली. विद्याश्रीच्या पायाला खरचटले तर भाग्यश्रीच्या पोटास व श्रीशैलच्या चेह-याला जखम झाली आहे. मंगळवेढा येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून रात्री ८.४० च्या सुमारास रायप्पा माशाळ यांनी उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### कानाच्या त्रासाला कंटाळून पिले विषारी औषध

**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर -**

कानाच्या सतत होणा-या त्रासाला कंटाळून तरुणाने तणनाशक औषध प्राशन केले. हा प्रकार मोहोळ तालुक्यातील वाळुज गावात सोमवारी सकाळी अकराच्या सुमारास घडला. शाम दत्तात्रय धनवे (वय २२, रा. पाकणी ता मोहोळ) असे तरुणाचे नाव आहे. शाम यास मागील काही दिवसांपासून कानाचा त्रास सुरु आहे. सततच्या या त्रासा मुळे शाम त्रासला आहे. यातूनच त्याने सोमवारी सकाळी अकराच्या सुमारास वाळुज गावात स्वत;च्या शेतात असताना, तणनाशक औषध प्राशन केले. यात त्रास होऊ लागल्याने भाऊ सारंग धनवे याने दुपारी १.१५ च्या सुमारास शासकीय रुग्णालयात दाखल केले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन

**बार्शी, दि. १३ ऑक्टोबर-**

येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयात आज दि. १३ ऑक्टोबर रोजी झालेल्या स्पर्धा परीक्षेबाबतच्या कार्यक्रमात पुणेच्या पेरा इन्स्टिट्यूटचे एन.श्याम व बीएन ॲकॅडमीचे अमोल पाटील यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षपदी प्राचार्य डॉ. दीपक गुंड होते. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज व कर्मवीर डॉ. माम



ासाहेब जगदाळे यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. प्रास्ताविक आणि प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ. जितेंद्र जळकुटे यांनी करुन दिला. एन.श्याम यांनी स्पर्धा परीक्षेचे बदलते स्वरुप याबाबत मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य गुंड यांनी या व्याख्यानाचा निश्चितच विद्यार्थ्यांना फायदा होईल असे सांगितले. सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.जे.पी. गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले. डॉ.आर. एन. साबळे यांनी आभार मानले.

### जन्मठेप शिक्षा झालेल्या आरोपीला उच्च न्यायालयात जामीन मंजूर

**बार्शी, दि. १३ ऑक्टोबर-**

सारोळे (ता. बार्शी) येथे पत्नी मिनाक्षी साबळे हिचा खून केल्याच्या आरोपावरुन जन्मठेप शिक्षा झालेला तिचा पती संतोष जगन्नाथ साबळे याची मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाने जामिनावर मुक्तता करण्याचे आदेश दिले. क्रेन घेण्यासाठी माहेरहुन २५ हजार रुपये का आणत नाही म्हणून मारहाण करुन रॉकेल ओतुन पत्नी मिनाक्षी हिचा खून केल्याच्या आरोपावरुन वैराग पोलिसांनी आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले होते. बार्शी सत्र न्यायालयाने आरोपीला जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. त्या शिक्षेविरुध्द आरोपीने मुंबई उच्च न्यायालयात ॲड. जयदीप माने यांच्यामार्फत अपिल व जामीन अर्ज दाखल केला होता. सदर जामीन अर्जाची सुनावणी मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाचे न्यायमुर्ती एम. एस. कर्णिक व न्यायमुर्ती शर्मिला देशमुख यांच्या खंडपिठासमोर झाली. आरोपीच्या जामीन अर्जाच्या सुनावणीदरम्यान आरोपीचे वकील ॲड. जयदीप माने यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणुन दिले की सदर प्रकरणातील मयताच्या मृत्युपूर्व जबाबात विसंगती आहेत. त्यामुळे सदरचा विसंगतपुर्वक जबाब विश्वासार्ह्य नाही. अनेक दिवसापासून आरोपी हा कारागृहात बंदीवासात आहे त्यामुळे तो जामीन मिळण्यास पात्र आहे. दोन्ही बाजुचा युक्तिवाद ऐकुन खंडपीठाने आरोपीची जामीनावर मुक्तता करण्याचा आदेश दिले. या प्रकरणी आरोपीतर्फे ॲड. जयदीप माने तर सरकारतर्फे ॲड. एस. एन. देशमुख यांनी काम पाहिले.

# अंधशाळेत बनताहेत मेणबत्या अन् ब्रेल लिपितील शुभेच्छापत्रे

## शहीद मेजर कुणाल गोसावी निवासी अंधशाळेत विद्यार्थ्यांची सुरु आहे दिपावलीची तयारी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १३ ऑक्टोबर-**

येथील लायन्स क्लब संचलित शहीद मेजर कुणाल गोसावी निवासी अंधशाळेतील विद्यार्थ्यांनी दिपावली निमित्त विक्रीसाठी डिझायनर मेणपणत्या तसेच खास ब्रेल लिपितील शुभेच्छा पत्रे तयार केलेली आहेत. गेल्या वीस ते बावीस वर्षापासून येथील अंधशाळे मध्ये हा उपक्रम राबविला जात आहे. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या डिझायनर मेणपणत्या तसेच शुभेच्छा पत्रांना पंढरपूर बरोबरच आसपासच्या गावांमधून देखील चांगली मागणी असते.



दिपावली सण अवघ्या चार ते पाच दिवसांवर येवु ठेपलेला आहे. दिपावली सणाच्या निमित्ताने संपूर्ण घर तसेच परिसर उजळून टाकणाऱ्या विविध आकाराच्या तसेच प्रकारच्या पणत्या आणि आपल्या नातेवाईकांना दिपावलीच्या शुभेच्छा देण्यासाठी खास शुभेच्छा पत्रांना देखील प्रचंड मागणी असते. बाजारा मधून अशा प्रकारच्या पणत्या तसेच शुभेच्छा पत्रे दुकानांमधून विक्रीसाठी सज्ज झालेली आहेत. बाजारा मध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या मेणपणत्या तसेच शुभेच्छा पत्रे विक्रीसाठी उपलब्ध असताना देखील पंढरपूरकर नागरिकांची



येथील अंधशाळेतील अंधमुला मुलींनी तयार केलेल्या खास ब्रेल लिपितील शुभेच्छा पत्रांना तसेच मेणपणत्यांना विशेष पसंती असते. या वर्षी देखील अंधशाळे मध्ये म ागील महिना भरापासून मेणपणत्या तसेच शुभेच्छा पत्रे तयार करण्याचे काम सुरु असून हे काम पुर्ण झाले आहे. या वर्षी प्रत्येकी दहा रुपये किंमतीला शुभेच्छा पत्र तर मेणपणत्यांचे दहा नगाच्या एका पाकिटाचे देणगी मुल्य पन्नास रुपये व डिझायनर मेणपणती अगदी १० रु पासून ते ९० रु पर्यंत आकर्षक व योग्य देणगी मूल्य आकारण्यात आलेले आहे. अशा प्रकारे या वर्षी दोन हजार शुभेच्छा पत्रे तसेच मेणपणत्यांची एक हजार पँकेट तयार करण्यात आलेली आहे. ब्रेल लिपितील शुभेच्छा पत्र असल्याने नागरिकांना पोस्ट खात्यामार्फत टपाल तिकीट न लावता ते विनामुल्य पाठविता येणार आहे. येथील अंधशाळेतील विद्यार्थ्यांच्या कलेस वाव मिळावा या उद्देशाने शहरातील नागरिकां बरोबरच विविध संस्था, समाजातील मान्यवर व्यक्ती मेणपणत्या तसेच शुभेच्छा पत्रे खरेदी करीत असतात. या वर्षी शाळेचे मुख्याध्यापक संतोष बारहाते, ज्येष्ठ शिक्षक महेश म्हेत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली कलाशिक्षिका ज्येष्ठ शिक्षिका रोहिणी घोडके,अश्विनी माने तसेच इतर शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी या अंध विद्यार्थ्यांना मेणपणत्या आणि शुभेच्छा पत्रे तयार करण्याचे प्रशिक्षण दिले आहे.

**मान्यवरांना शुभेच्छा**

येथील अंधशाळे मार्फत दरवर्षी देशाचे राष्ट्रपती, पंतप्रधान यांच्यासह राज्यातील खासदार, आमदार तसेच प्रसिध्द खेळाडू, वेगवेगळ्या क्षेत्रातील सेलिब्रिटी आणि इतर मान्यवर नागरिकांना खास दिपावली निमित्त शुभेच्छा देण्यासाठी ब्रेल लिपितील ही शुभेच्छा पत्रे पाठविली जातात हे विशेष आहे.

**माजी गृहमंत्री पाटील यांच्याकडून मदत**

राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते (कै.) आर.आर.पाटील यांनी राज्याचे उपमुख्यमंत्रीपदी असताना येथील अंधशाळेतील विद्यार्थ्यांनी पाठविलेल्या ब्रेल लिपितील शुभेच्छा पत्रांचे कौतूक केलेले होते. शाळे मार्फत राबविलेल्या या अनोख्या उपक्रमाचे कौतूक करुन त्यांनी अंधशाळेला पन्नास हजार रुपयांची मदत देखील केलेली होती.

# आनंद दवे यांना क्रांतीवीर वसंतदादा बडवे हिंदुत्व शौर्य पुरस्कार जाहीर

## रविवारी पुरस्काराचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१३ ऑक्टोबर-**

महाराष्ट्रात नामांकित असणारा क्रांतिवीर वसंतदादा बडवे हिंदुत्व शौर्य पुरस्कार यावर्षी पुण्याचे झुंजार हिंदुत्वनिष्ठ नेते आनंद दवे यांना जाहीर झाला असून येत्या १९ ऑक्टोंबर रोजी तो प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती येथील हिंदुमहासभेचे नेते तथा क्रांतीवीर वसंतदादा बडवे ट्रस्टचे प्रमुख अभयसिंह कुलकर्णी (इचगांवकर ) यांनी दिली.

श्री. इचगांवकर कुलकर्णी यांनी सांगितले की, पंढरपुरातील सशस्त्र क्रांतिकारक, गोवा मुक्ती वीर, हैद्राबाद सत्याग्रही, कट्टर सावरकरवादी, समाजसुधारक क्रांतीवीर वसंतदादा बडवे यांच्या पुण्यस्मरणा निमित्त दरवर्षी त्यांच्या नावे हा पुरस्कार दिला जातो. या वर्षीचा हा पुरस्कार पुणे येथील कडवे हिंदूत्ववादी आनंद दवे यांना देण्यात येणार आहे. आजपर्यंत हिंदूत्ववादासाठी श्री.दवे यांनी प्रखर भूमि का घेतलेली आहे. ब्राह्मण महासंघ, हिंदू महासंघ या माध्यमातून अनेक क्रांतिकारी आंदोलने त्यांनी हाताळली असून अनेक दूरचित्रवाणीच्या वाहिन्यांवरील चर्चांतून हिंदुत्ववादी बाजू त्यांनी प्रभावीपणे मांडली आहे. येथील विठ्ठल मंदिराजवळ असलेल्या रुक्मिणी





पटांगणातील क्रांतिवीर वसंतबाबाजी बडवे यांच्या पुतळ्यालगत येत्या १९ ऑक्टोंबर रोजी सायंकाळी सात वाजता हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. या सोहळ्यास हिंदुत्वप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन श्री.कुलकर्णी, विवेक बेणारे, विकास मोरे, महेश खिस्ते, प्रशांत खंडागळे, रामसखा बडवे आदींनी केले आहे.

**आतापर्यंत यांना मिळाला पुरस्कार पुरस्कार**

एस.एल.भैरप्पा, मिलिंद एकबोटे, शरद पोंक्षे, बंडातात्या कराडकर, हिरामण गवळी, प्रमोद मुतालिक, हिमानी सावरकर, अभय वर्तक, धनंजय देसाई, संजीव पुनाळेकर, आदी महनीय, देव देश अन धर्मासाठी लढणाऱ्या व्यक्तींना प्रदान करण्यात आलेला आहे.

**या पुरस्काराचे असे आहे स्वरुप**

अकरा सहस्त्र रोख, सन्मानपत्र, महावस्त्र तसेच कुंडलिनी कृपाणांकित हिन्दुध्वज, श्री विठ्ठल मंदिराशेजारी कै. बडवे दादांच्या पुतळ्यापाशी साधूसंतांच्या हातून जंगी सत्कारात हा पुरस्कार दिला जातो, की जणू साक्षात श्री विठ्ठलाचा आशीर्वादच.



# रूक्मिणी महोत्सवाच्या स्टॉलमधून बचत गटनिर्मित वस्तूंची विक्री

## नागरिकांनी महोत्सवातून वस्तू खरेदी करण्याचे सीईओंचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर-**

उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत सोलापूर जिल्ह्यातील स्वयंसहायता समूहानी उत्पादित केलेल्या वस्तू,दिवाळी पदार्थ,हस्तकला वस्तू, पणत्या इत्यादी उत्पादनाचे प्रदर्शन व विक्रीसाठी आयोजित केलेल्या रुक्मिणी दिवाळी महोत्सव २०२५ चे उद्घाटन सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी प्रकल्प संचालक चंद्रशेखर जगताप, उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ, उमेदचे जिल्हा अभियान व्यवस्थापक सचिन चवरे आदी उपस्थित होते.

बचत गटांनी उत्पादित केलेला सुकामेवा, हस्तकला साहित्य, फराळाचे पदार्थ व चॉकलेट, पणत्या, आकाश कंदील यांची खरेदी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी स्वतः करून सर्व अधिकारी कर्मचारी यांना खरेदी करण्याचे आवाहन केले तसेच सर्वच उपस्थित समूहातील महिला यांच्याशी संवाद साधून शुभेच्छा दिल्या.

रुक्मिणी दिवाळी महोत्सव मध्ये सोलापूर जिल्ह्यातून नावीन्यपूर्ण उत्पादनाचे ३३ स्टॉल लावण्यात आले आहेत. महोत्सव पार पाडण्यासाठी जिल्हा अभियान व्यवस्थापक सचिन चवरे, लेखाधिकारी शुभांगी देशपांडे, जिल्हा व्यवस्थापक राहुल जाधव, संतोष डोंबे, मीनाक्षी मडीवळी, दयानंद सरवळे, तालुका अभियान व्यवस्थापक, तालुका व्यवस्थापक, प्रभाग समन्वयक परिश्रम घेत आहेत.

### पैशाच्या कारणातून तरुणीच्या डोक्यात घातला टीव्ही

**सोलापूर :** पैशाच्या कारणातून झालेल्या वादानंतर तरुणीच्या डोक्यात टीव्ही घातल्याचा प्रकार मौलाली चौकातील कोंची कोरवी गल्लीत सोमवारी दुपारी दोनच्या सुम ारास घडला. अनुसया बाळू शिंदे (वय २९, रा. कोंची कोरवी गल्ली, सोलापूर) असे तरुणीचे नाव आहे. अनुसया आणि सचिन भिमराव नारायणकर यांच्यात सोमवारी दुपारी दोनच्या सुमारास शाब्दिक वाद झाला. हा प्रकार अनुसया हिच्या घरात घडला. त्यावेळी सचिन याने तिला सुरुवातीला लाथाबुक्यांनी मारहाण केली. त्यानंतर टीव्ही उचलून तिला मारल्याने तिच्या डोक्यात जखम झाली आहे. दुपारी २.५० च्या सुमारास बहिण गोदावरी हिने शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



## परमेश्वर माळगे यांच्या वाढदिवसानिमित्त ३२४ जणांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर-**

समाजिक कार्यकर्ते परमेश्वर माळगे यांच्या वाढदिवसानिमित्त घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात ३२४ जणांनी रक्तदान केले.

या शिबिराला आमदार सुभाष देशमुख, युवा नेते मनीष देशमुख, भाजपा शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, नगरसेवक अविनाश पाटील यांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या. यावेळी मान्यवरांनी माळगे यांच्या सामाजिक कार्याची प्रशंसा केली. माळगे मित्र परिवाराने परिश्रम घेतले. कार्यक्रमात अनेक स्वयंसेवक, तरुण आणि महिला कार्यकर्त्यांनीही उत्साहाने भाग घेतला. या शिबिरातून परमेश्वर माळगे यांनी पुन्हा एकदा दाखवून दिले की समाजसेवा हीच खरी पूजा असून, प्रत्येकाने आपल्या क्षमतेनुसार समाजासाठी काहीतरी योगदान दिले पाहिजे.

रक्तदानातून मिळणाऱ्या जीवनदायिनी मदतीमुळे असंख्य रुग्णांना नवजीवन लाभणार असून, या उपक्रमामुळे समाजात एक सकारात्मक व प्रेरणादायी संदेश पोहोचला आहे.



### देशभक्तीचा जयघोष करीत मेजर माने यांचा सपत्नीक सन्मान

**अक्कलकोट, दि. १३ ऑक्टोबर-**

भारत माता की जय! वंदे मातरम्! सह देशभक्तीचा जयघोष करीत भारतीय सैन्य दलातून सेवा निवृत्त झालेल्या दहिटणे (ता. अक्कलकोट) येथील मेजर नारायण उर्फ अमोल माने यांचा सपत्नीक अक्कलकोट येथे सन्मान करण्यात आला. प्रारंभी वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात मेजर अमोल माने, महेश इंगळे, प्रथमेश इंगळे आणि स्विमिंग सदस्यांसह स्वामींच्या महानैवेद्य आरतीस उपस्थित राहून समर्थाचे दर्शन घेतले. यावेळी चौका-चौकात फटाक्यांची आतषबाजी करीत मेजर माने यांची वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान ते कार्यक्रम स्थळापर्यंत शहरातून भव्य मिरवणूक काढली. मेजर माने यांनी पंजाब, राजस्थान, उरी, जम्मू कश्मिर, हैद्राबाद, उत्तर प्रदेश, अरुणाचल प्रदेश आदी ठिकाणी सलग १७ वर्षे देशसेवा केली. यावेळी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष मल्लिकार्जुन पाटील, नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी, शिवसेना तालुका प्रमुख बाबा पाटील, ठाकरे गटाचे तालुकाप्रमुख आनंद बुक्कानुरे, नीलकंठ हिंडोळे, संतोष पराणे, अविनाश मडीखांबे, नितीन मोरे, विकी चौधरी, दिलीप सिद्धे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष बंदेनवाज कोरबू, सुनील सिद्धे, मानसी दामले उपस्थित होते. यावेळी मेजर कुटुंबातील विलास माने, पुष्पा माने, दत्ता माने, निर्मला माने, संतोष माने, वैशाली माने, पत्रकार अरविंद पाटील, शिंदेंचा सत्कार करण्यात आला.

# सांगोल्यात बचत गटाच्या महिलांकडून पूरग्रस्तांना मदत

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१३ ऑक्टोबर-**

मागील काही दिवसांमध्ये अवकाळी पावसामुळे महाराष्ट्राम ध्ये विविध ठिकाणी पूर येऊन शेतकरी बांधवांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. यासाठी सांगोला नगरपरिषद अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या बचत गटांनी एक सामाजिक बांधिलकी म्हणून स्वप्रेरणेने ४५ हजार रुपये रक्कम जमा केली.

सदरची रक्कम पूरग्रस्तांना पोचविण्यासाठी सांगोला नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी यांच्याकडे सर्व बचत गटांचे प्रतिनिधी म्हणून कर्तव्य शहरस्तर संघाच्या अध्यक्षा सुनंदा घोंगडे, सचिव मनिषा हुंडेकरी,



सदस्य ज्योत्स्ना बनसोडे, शकुंतला खडतरे, स्वप्नाली धोकटे यांच्या हस्ते सोमवार दि.१३ ऑक्टोंबर रोजी धनादेश सुपूर्द करण्यात आला. यावेळी नगरपरिषदेचे कार्यालयीन अधीक्षक सचिन पाडे, सहा.प्रकल्प अधिकारी योगेश गंगाधरे, बिरप्पा हाके, शरद थोरात, जयश्री खडतरे, समूह संसाधन व्यक्ती सविता लोखंडे, कोमल चांडोले, सारिका लोखंडे उपस्थित होते.

बचत गटातील महिलांनी पूरग्रस्त शेतकरी बांधवांसाठी केलेली मदत हे समाजासाठी एक आदर्श उदाहरण आहे. पूरग्रस्तांच्या प्रती महिलांनी दाखवलेली सामाजिक बांधिलकी बद्दल नगरपरिषद आभारी आहे.

- डॉ. सुधीर गवळी, मुख्याधिकारी, नगरपरिषद सांगोला.

### पैशाच्या कारणावरून दगडफेक करणाऱ्यांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर-**

पैशाच्या कारणावरून दगडफेक करून नुकसान करणाऱ्यांवर एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत व्यंकटेश सोमण्णा कामुर्ती (वय ४५, रा. प्रजा नगर, देसाई नगरजवळ, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन सुरेश श्रीराम, बालाजी श्रीराम व इतर तीन बायका यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १२ ऑक्टोबर रोजी दुपारी १२ च्या सुमारास प्रजा नगर येथे सुरेश श्रीराम व त्याच्या साथीदारांनी व्यंकटेश कामुर्ती यांच्याकडून पिण्याचा सोडा घेतला होता. त्याचे पैसे दे असे म्हणाल्याने चिडून जाऊन सुरेश श्रीराम व त्याच्या साथीदारांनी कामुर्ती यांच्या घरासमोर बेकायदेशीर जमाव जमवून दंगा करून व्यंकटेश कामुर्ती, त्यांची पत्नी, मुलगा यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच कामुर्ती यांच्या घरावर, दुकानाचे शटरवर तसेच चारचाकी गाडीवर दगडफेक करून नुकसान केले. हवालदार गायकवाड पुढील तपास करीत आहेत.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## गाडीच्या हप्त्याचे भरलेले पैसे मागितल्याच्या कारणावरुन एकास केले गंभीर जखमी

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा, दि. १३ ऑक्टोबर -**

मोटर सायकलला भरलेल्या हप्त्याचे ३१ हजार रुपये परत दे असे म्हणाल्याच्या कारणावरुन एका ३२ वर्षीय युवकास लोखंडी पट्टीने मारुन गंभीर जखमी केल्याप्रकरणी रोहन सिध्दू खटकळे (रा.सप्तशृंगीनगर) याच्या विरुध्द पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे.

पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील जखमी फिर्यादी प्रविण माणिक सुरवसे (वय ३२) हा दि.४ ऑक्टोबर रोजी रात्री ११ वाजता मंगळवेढा शहरातील एमआयडीसी मध्ये राहणारा आरोपी यास माझी मोटर सायकल परत देत नाही तर मोटर सायकलच्या भरलेल्या हप्ताचे ३१ हजार रुपये तर दे असे म्हणाल्यावर आरोपीने तू मोटर सायकल किंवा हप्त्याचे पैसे मागणारा कोण? असे म्हणून शिवीगाळ करीत हातातील लोखंडी पट्टीने फिर्यादीच्या पाठीवर,कमरेवर मारुन गंभीर जखमी केल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास महिला पोलीस हवालदार सुनिताताई चवरे ह्या करीत आहेत.

# काका साठे, हसापुरे, पाटील व मल्लू पाटलांसह दिग्गजांना फटका

- जिल्हा परिषद गटांचे आरक्षण जाहीर
- जिल्ह्यातील राजकीय समीकरण बदलणार तरूणांना संधी तर दिग्गजांना मतदारसंघ शोधावे लागणार
- मिनी मंत्रालयावर सत्तेसाठी भाजपाची मोर्चेबांधणी सुरु

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ ऑक्टोबर-**

सार्वत्रिक निवडणुकीचा बिगुल वाजण्याच्या तयारीत असून जिल्हा परिषदेच्या ६८ गटांच्या आरक्षणाची सोडत चक्रानुक्रम नियमाने सोमवार, १३ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात झाली. यामध्ये जिल्ह्यातील माजी जिल्हा परिषद सदस्यांना आरक्षणाचा फटका बसला असून त्यांना नवीन मतदारसंघ शोधावा लागणार आहे तर नव्या चेहऱ्यांना संधी मिळणार आहे.

जिल्ह्यातील राजकीय समीकरण बदलण्याची शक्यता आहे. मोठ्या गॅप पडलेला असून जिल्ह्यात राजकीय घडामोडी देखील झाल्या आहेत. त्यामुळे जिल्हा परिषदेवर सत्तेसाठी भाजपाकडून मोर्चेबांधणी सुरु झाली आहे. ही आरक्षण प्रक्रिया जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यामध्ये अक्कलकोट तालुक्यातील पानमंगरूळ आणि जेऊर हे दोन जिल्हा परिषद गट अनुसूचित जातीसाठी राखीव झाल्याने त्या ठिकाणी माजी सभापती शिवानंद पाटील आणि जिल्हा परिषदेचे माजी सभापती मल्लिकार्जुन पाटील यांना धक्का बसला. तर माजी जिल्हा परिषद अध्यक्ष तथा राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते बळीराम काका साठे यांना पुन्हा जिल्हा परिषदेमध्ये येण्याची इच्छा होती परंतु त्यांचा नान्नज गट ओबीसी सर्वसाधारणसाठी राखीव झाला असल्याने त्यांचा हिरमोड झाला आहे. करमाळा तालुक्यात सहा जिल्हा परिषद गटापैकी पाच महिलांसाठी आरक्षित झाले आहेत. माजी सभापती विजयराव डोंगरे, उमेश पाटील यांचे जिल्हा परिषद गट सर्वसाधारण झाल्याने ते पुन्हा जिल्हा परिषदेमध्ये दिसण्याची शक्यता आहे. तर दक्षिण सोलापूर तालुक्यातील भंडारकवठा गट अनुसुचित जमाती महिलांसाठी आरक्षित झाल्याने माजी जिल्हा परिषद सदस्य सुरेश हसापुरे यांचा पत्ता कट झाला आहे. जिल्हाधिकारी आशीर्वाद, महसूल उपजिल्हाधिकारी संतोष देशमुख यांच्या उपस्थितीमध्ये ही आरक्षणाचे सोडत काढण्यात आली. ही प्रक्रिया पार पाडण्यासाठी नायब तहसीलदार सुरेंद्र परदेशीमठ, अव्वल कारकून दीपक ठेंगील, मल्हारी नाईकनवरे, पुष्पवती साखरे, प्रताप काळे यांचे सहकार्य लाभले. सदर सोडतीसाठी नित्या रविराज नष्टे, वय-५ या बालिकेच्या हस्ते चिठ्ठया काढण्यात आल्या. आरक्षण सोडतीवेळी जिल्हयातून नागरिक मोठया प्रमाणावर उपस्थित होते. आरक्षणासाठी अनेक दिग्गज नेत्यांनी देव पाण्यात ठेवले होते; मात्र त्यांच्या पदरी निराशाच आल्याचे दिसून आले.

**मागास प्रवर्गसाठीचे आरक्षण**

| नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता आरक्षित झालेले निवडणूक विभाग | सोडतीमध्ये नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्ग महिलांकरिता आरक्षित झालेले निवडणूक विभाग |
|---|---|
| ६८-सलगर | ४०-संग्रामनगर |
| ४६-महुच बु | ०६-केम |
| ५३-दामाजीनगर | ४४-निमगांव |
| ५९-वळसंग | ५८-कुंभारी |
| ३६-कासेगाव | ०९-उपळाई बु |
| २०-नान्नज | ४७-एखतपूर |
| १४-उपळाई ठोंगे | ११-टेंभूर्णी |
| ६४-वागदरी | १६-उपळाई पु |
| २६-पोखरापूर | ५२-घेरडी |



**या माजी सदस्यांचा पत्ता कट**

आजच्या आरक्षण सोडतीत अनेक दिग्गजांच्या मतदारसंघावर आरक्षण बदलण्यात आल्याने दिग्गजांना फटका बसला. यामध्ये माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष शिवानंद पाटील, माजी कृषी सभापती मल्लिकार्जून पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य सुरेश हसापूरे यांच्यासह अनेक माजी सदस्यांच्या हक्काच्या मतदारसंघात इतर प्रवर्गाचे आरक्षण पडल्याने त्यांना दुसरा मतदारसंघ शोधावा लागणार असल्याने त्यांचा पत्ता कट झाला आहे.

# पंढरपूर पंचायत समितीच्या गणांसाठी आरक्षण जाहीर

- महिलासांठी ८ जागा राखीव ; सर्वसाधारणसाठी ५ जागा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१३ ऑक्टोंबर -**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पंढरपूर पंचायत समिती गणासाठी सोमवारी (दि.१३) शेतकी भवन, पंचायत समिती पंढरपूर येथे १६ जागांसाठी आरक्षण जाहीर करण्यात आले.

पंचायत समिती गणासाठी प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसिलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी अमोल जाधव, निवडणूक नायब तहसिलदार वैभव बुचके यांच्या उपस्थित आरक्षण जाहीर करण्यात आले. यामध्ये १६ पैकी ११ जागा विविध प्रवर्गासाठी आरक्षित झाल्या असून, ५ जागा सर्वसाधारणसाठी आहेत. या आरक्षणात महिलांसाठी ८ जागा राखीव ठेवण्यात आल्या असून,



अनुसूचित जाती साठी २ व मागास प्रवर्गासाठी २ महिलांना प्रतिनिधित्व देण्यात आले आहे.

यामध्ये उंबरे (सर्वसाधारण), करकंब (सर्वसाधारण), भोसे (ना. मा. प्र. महिला), गुरसाळे (सर्वसाधारण), रोपळे (सर्वसाधारण महिला), सुस्ते (अनुसूचित जाती महिला), पुळुज (ना. मा. प्र. महिला), गोपाळपूर (सर्वसाधारण महिला), वाखरी (ना. मा. प्र.), पटवर्धन कुरोली (सर्वसाधारण महिला), भाळवणी (ना. मा. प्र.) पळशी (अनुसूचित जाती महिला), टाकळी (सर्वसाधारण), खर्डी (अनुसूचित जाती), कासेगाव (सर्वसाधारण), सरकोली (सर्वसाधारण महिला) या प्रकारे सोडत काढण्यात आली.

# माढ्यातील पाच गणात रस्सीखेच; सात गणात महिलाराज

- जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणासाठी आरक्षण जाहीर




**माढ्यातील जि.प.गट आरक्षण**

१) भोसरे- सर्वसाधारण महिला २) मानेगाव - सर्वसाधारण ३) उपळाई बुद्रुक - ना. मा. प्रवर्ग (ओबीसी) महिला ४) कुर्डू - सर्वसाधारण ५) टेंभुर्णी - ना. मा. प्रवर्ग (ओबीसी) महिला ६) बेंबळे- सर्वसाधारण महिला ७) मोडनिंब - साधारण महिला

**माढ्यातील पं.स. गण आरक्षण**

१) टेंभुर्णी - अनुसूचित जाती (महिला), २) भोसरे - अनुसुचित जाती, ३) लऊळ - ना.मा. प्रवर्ग (ओबीसी) महिला, ४) दारफळ ना. मा. प्रवर्ग महिला, ५) उपळाई (बु)-ना. मा. प्रवर्ग (ओबीसी) पुरुष, ६) कुर्डू - सर्वसाधारण महिला, ७) मोडनिंब - सर्वसाधारण महिला, ८) रांझणी - सर्वसाधारण महिला, ९) रोपळे (क) - सर्वसाधारण महिला, १०) भूताष्टे -सर्वसाधारण, ११) मानेगांव - सर्वसाधारण, १२) बेंबळे -सर्वसाधारण, १३) पिंपळनेर - सर्वसाधारण, १४)अकोले (खुर्द) - सर्वसाधारण,

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. १३ ऑक्टोंबर-**

माढा तालुक्यातील सात जिल्हा परिषद गटासाठी सोलापूर येथे जिल्हाधिकारी कार्यालयात आरक्षणाची सोडत झाली तसेच माढा पंचायत समितीसाठी १४ गणांची सोडत सोमवारी सकाळी ११ वाजता माढा येथील जगदाळे मंगल कार्यालयात प्रांताधिकारी जयश्री आव्हाड व तहसीलदार संजय भोसले यांच्या उपस्थितीत घेण्यात आली.

यावेळी आरक्षणाच्या चिठ्ठ्या गौरव जाधव या विद्यार्थ्यांच्या हस्ते काढण्यात आल्या. येथील पंचायत समिती सभापतीपद खुल्या गटासाठी असल्याने भूताष्टे, मानेगाव, बेंबळे, पिंपळनेर व अकोले (खुर्द)या सर्वसाधारणसाठी असलेल्या पाच गणात रस्सीखेच असणार हे निश्चित मानले जात आहे.

# माळशिरसमध्ये नऊ ठिकाणी महिलाराज

### पंचायत समितीच्या १८ गणाचे आरक्षण जाहीर



**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि.१३ ऑक्टोबर-**

माळशिरस पंचायत समितीच्या पंचायत समिती अठरा गणांची सोडत आज काढण्यात आली.उपविभागीय अधिकारी विजया पांगारकर, तहसीलदार सुरेश शेजुळ व नायब तहसीलदार अमोल कदम यांच्या उपस्थितीत जाहीर करण्यात आली. या सोडतीमध्ये अकरा पंचायत समिती गण हे सर्वसाधारणसाठी आरक्षीत झाले आहेत. त्यामध्ये पाच पंचायत समिती गण हे महिलांसाठी राखीव झाले आहेत तर नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी चार गण आरक्षित झाले आहेत. त्यामध्ये दोन गण हे नागरिकांच्या मागास प्रवर्गाच्या महिलेसाठी आरक्षित झाले आहेत.

तसेच अनुसूचित जातीसाठी तीन गण आरक्षित झाले आहेत. त्यामध्ये दोन गण अनुसूचित जाती महिलांसाठी आरक्षित झाले आहेत. एकूण अठरा पंचायत समिती गणापैकी नऊ गण महिलांसाठी आरक्षित झाले आहेत. या सोडतीच्या वेळी माजी पंचायत समिती सदस्य रणजीत जाधव, माऊली पाटील, प्रताप पाटील, अजय सकट, मामा पांढरे, लक्ष्मण पवार, बाळासाहेब सरगर, पांडुरंग वाघमोडे, बाबासाहेब माने, श्याम बंडगर, देविदास ढोपे यांच्यासह सर्व पक्षांचे कार्यकर्ते उपस्थित होते ही सोडत अर्णव आडके व स्वरा गुजर या दोन शालेय विद्यार्थ्यांच्या हस्ते काढण्यात आली.

**पंचायत समितीच्या अठरा गणाचे आरक्षण पुढील प्रमाणे**

- **सर्वसाधारण गण : गुरसाळे, कन्हेर, मेडद, वेळापूर, यशवंतनगर,निमगाव.**
- **सर्वसाधारण महिला : मांडवे, फोंडशिरस, लवंग, गोरडवाडी व पिलीव.**
- **नागरिकांचा मागास प्रवर्ग : भांबुर्डी, जांबुड.**
- **नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला : संग्रामनगर व तांदुळवाडी**
- **अनुसूचित जाती : माळीनगर**
- **अनुसूचित जाती महिला : दहिगाव व बोरगाव.**

# सांगोला पंचायत समितीत सात ठिकाणी महिलाराज

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१३ ऑक्टोंबर -**

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्या आदेशानुसार सोमवार दि.१३ ऑक्टोंबर रोजी सकाळी ११ वाजता सांगोला नगर परिषदेच्या पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर सभागृह येथे सांगोला पंचायत समितीच्या सदस्य पदाचे अनुसूचित जाती, अनुसुचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग व त्यामधील स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा निश्चित करण्यासाठी सोडत पध्दतीने कार्यक्रम घेण्यात आला. सांगोल्याचे तहसीलदार संतोष कणसे यांनी राखीव जागांचे सदस्य आरक्षण सोडत जाहीर केले. यावेळी निवडणूक निरीक्षक उपविभागीय



अधिकारी बी.आर.माळी, गट विकास अधिकारी उमेशचंद्र कुलकर्णी, नायब तहसीलदार ज्ञानेश्वर साळुंखे उपस्थित होते. सभागृहामध्ये सर्व राजकीय पक्षाचे पदाधिकारी, प्रतिनिधी व इच्छुक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर आरक्षण सोडतीकरिता सांगोला विद्यामंदिर प्राथमिक विद्यालयातील लहान मुले/मुली यांच्या मार्फत चिठ्ठ्या काढून जागांचे आरक्षण निश्चित करण्यात आले. सांगोला पंचायत समितीसाठी एकूण १४ सदस्य निवडून द्यायचे आहेत. त्यामध्ये ७ महिला व ७ पुरुष या जागांचा समावेश आहे.

**असे जाहीर झाले आरक्षण-**

महूद बु.गण-सर्वसाधारण (महिला), चिकमहूद गण- ना.मा.प्र, वाकी (शिवणे) गण-ना.मा.प्र.(महिला), एखतपूर गण-ना.मा.प्र.(महिला), वाढेगाव गण- अनुसूचित जाती (महिला), जवळा गण-सर्वसाधारण (महिला), कडलास गण-सर्वसाधारण, अजनाळे गण-अनुसूचित जाती, राजूरी गण-सर्वसाधारण, नाझरा गण-सर्वसाधारण, कोळा गण-सर्वसाधारण (महिला), हातिद गण-सर्वसाधारण, सोनंद गण- सर्वसाधारण (महिला), घेरडी गण-सर्वसाधारण.

# बार्शी पंचायत समितीचे आरक्षण जाहीर

**पंचायत समिती कार्यालयात प्रक्रिया पारदर्शकपणे पूर्ण**

**तभा वृतसेवा,**
**बार्शी, दि. १३ ऑक्टोबर-**

बार्शी तालुक्यातील पंचायत समितीच्या १२ निवडणूक गणांच्या आरक्षण प्रक्रियेची सोडत आज बार्शी पंचायत समिती कार्यालय, बार्शी येथे जाहीर करण्यात आली. या प्रक्रियेत सर्वसाधारण, अनुसूचित जाती तसेच महिला राखीव जागांचे वाटप निश्चित करण्यात आले असून, ही प्रक्रिया पारदर्शक वातावरणात पार पडल्याची माहिती तहसील एफ. आर. शेख यांनी दिली.

तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली तर तहसीलदार शिल्पा ओसवाल, गटविकास अधिकारी विवेक जगनाडे, निवासी नायब तहसीलदार सुभाष बदे, निवडणूक नायब तहसीलदार संजीवन मुंढे, महसूल नायब तहसीलदार सानप तसेच अधिकारी, लोकप्रतिनिधी व पत्रकार यांच्या उपस्थितीत आरक्षण जाहीर करण्यात आले. पंचायत समितीच्या निवडणुकांसाठी खालीलप्रमाणे आरक्षण निश्चित झाले आहे.

**क्र. निवडणूक गणाचे नाव आरक्षण प्रकार**

१) उपकाई ( ठों.) - सर्वसाधारण महिला २) आगळगाव - ना.मा.प्र. महिला ३) पांगरी - अनुसूचित जाती ४) कारी - ना.मा.प्र. ५) उपळे दुमाला - ना.मा.प्र. महिला ६) गौडगाव - सर्वसाधारण ७) बावी - सर्वसाधारण ८) पानगाव - सर्वसाधारण ९) मालवंडी - सर्वसाधारण महिला १०) सासुरे - सर्वसाधारण ११) मानेगाव - सर्वसाधारण महिला १२) शेळगाव (आर) - अनुसूचित जाती महिला या आरक्षण जाहीरनाम्यानंतर पंचायत समिती निवडणुकीसाठी तालुक्यातील राजकीय वातावरण तापले असून, विविध गावांमध्ये संभाव्य उमेदवारांच्या नावांवर चर्चांना सुरुवात झाली आहे. तर आरक्षणाच्या फेरबदलामुळे काही इच्छुक कार्यकर्ते सैरभैर झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

# अक्कलकोट : पंचायत समिती गण आरक्षण जाहीर

- **चपळगाव कुरनूर वागदरी शिरवळ खुला**
- **जेऊर नागणसूर मुगळी सर्व महिला**

**अक्कलकोट दि. १३ ऑक्टोबर**

तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समित्या जागाच्या आरक्षणाची पद्धत व चक्रनुक्रम नियम २००५ नुसार पंचायत समिती निर्वाचक गणांचे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग व त्यामधील स्त्रियासाठी राखून ठेवावयाच्या जागा सोमवारी सोडत काडण्यात आली.

पंचायत समिती अक्कलकोट १२ गण पैकी खुला ७ ,अनुसुचित जााती दोन 'नागरीकांचा माागस प्रवर्ग ३ असे गण आरक्षित झाले आहेत. १३ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता अक्कलकोट तहसील कार्यालय येथे विशेष सभा झाली चप्पळगाव , कुरनुर 'वागदरी, शिरवळ हे चार सर्वसाधारण व जेऊर सर्व साधारण महिला नागणसुर सर्वसाधारण महिला राखीव झाले आहे . दहिटण अनु जाती महिला सुलेरजवळगा अनुसुचित जाती मंगरुळ ना मागास प्रवर्ग महिला तोळणुर नागरिका चा मागास प्रवर्ग महिला व सलगर नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी मुगळी सर्वसाधारण महिला साठी राखीव आहे.

# दक्षिण सोलापूरमध्ये सभापतीसाठी असणार चुरस

### पं. स. गणांचे आरक्षण जाहीर

**तभा वृतसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर -**

अनेक दिवसांपासून प्रशासन राज्य असलेल्या दक्षिण सोलापूर तालुक्यातील बारा पंचायत समिती गणासाठी सोमवारी आरक्षण सोडत काढण्यात आली. पंचायत समितीच्या सहा जागा या महिलांसाठी राखीव झाले आहेत.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील बारा पंचायत समिती गणासाठी रंगभवन येथील छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात प्रांतधिकारी सुमित शिंदे आणि तहसीलदार तहसीलदार किरण जमदाडे यांच्या प्रमुख उपस्थित काढण्यात आले. यावेळी वोरोनोको प्रशालेतील सुमित शिंदे(वय १०)सुशील काळे( वय १२) या मुलांच्या हातून चिठ्ठी काढण्यात आली.

**या मतदारसंघात चुरस :** दक्षिण सोलापूरचे सभापतीपद सर्वसाधारणसाठी राखीव असल्याने सर्वसाधारण आरक्षण असर्णाया मतदारसंघात चुरस असणार आहे. यामध्ये हत्तूर, औराद, कुंभारी, कासेगाव यांचा समावेश आहे. मात्र या मतदारसंघातून कोण निवडणूक लढविणार ? हे निश्चित नाही.

**पंचायत समितीचे आरक्षण**

**हत्तूर, औराद, कुंभारी, कासेगाव: सर्वसाधारण**
**मंद्रूप : ओबीसी**
**कंदलगाव,होटगी :सर्वसाधारण महिला**
**भंडारकवठे : अनुसूचित जमाती महिला**
**निंबर्गी : अनुसूचित जाती महिला**
**वळसंग : अनुसूचित जाती**
**धोत्री व बोरामणी : ओबीसी महिला**